Impact Factor 5.604
www.sjifactor.com

p-ISSN 2454-7409
e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

वर्ष सातवे अंक दुसरा जानेवारी २०२२
Vol. 7 Issue 2
Jan. 2022
Regular Issue

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# MPSP

www.researchjournal.net.in
www.indiramahavidyalaya.com

Peer Reviewed Annual National Indexed Research Journal
in Marathi
Published as per UGC (India) Guidelines

मराठी भाषा,साहित्य, संस्कृती व अस्मिता जोपासणारे
मराठी विषयाचे प्राध्यापक, संशोधक आणि अभ्यासक यांच्या
संशोधनकार्याला चालना देणारे वार्षिक

Published By
DBMRC
INDIRA MAHAVIDYALAYA
KALAMB, DISTT. YAVATMAL, MAHARASHTRA 445 401 (India)

Impact Factor 5.604 p-ISSN 2454-7409 e-ISSN 2582-5305

डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र आणि
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद यांचा संयुक्त उपक्रम

# मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका

# (MPSP)

Peer Reviewed Annual National Research Journal as per UGC Guidelines
VOL 7 ISSUE 2 January 2022
वर्ष सातवे, अंक दुसरा, जानेवारी २०२२

**मुख्य संपादक**
डॉ. पवन मांडवकर
संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
अध्यक्ष, सं.गा.बा. अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद तसेच प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब
**Chief Editor**
**Dr. Pavan Mandavkar**
Chairman, DBM Research Centre
President, Sant Gadge Baba Amravati Vidyapeeth Marathi Pradhyapak Parishad, Amravati
Address: Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: marathipradhyapak@gmail.com Mobile No: +91-9422867658

**सहसंपादक व प्रकाशक**
प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर
संचालक, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र
इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
**Associate Editor & Publisher**
**Dr. Mrs. Veera Mandavkar**
Director, DBM Research Centre
Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra, India 445 401
E Mail: veeramandavkar18@gmail.com Mobile No: +91-9403014885

## संपादक मंडळ Editorial Board

डॉ. ममता इंगोले, प्रा. रेखा वाठ, डॉ. गणपत उरकुंदे, प्रा. नीलकंठ नरुले, प्रा. सरोज लखदिवे, डॉ. कैलाश नेमाडे
**1. Dr. M.J. Ingole,** Address: H.N. Sinha Mahavidyalay, Patur, Dist. Akola 444 001 (India)
E mail: mamtaingole2812@gmail.com Mobile No.: +91-9823392953
**2. Prof. R.M. Wath,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: rekhawath23@gmail.com Mobile No.: +91-9422153353
**3. Dr. G.P. Urkunde,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: urkundeganpat@gmail.com Mobile No.: +91-9765034097
**4. Prof. N.V. Narule,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: narulenilkantha3@gmail.com Mobile No.: +91-9923909296
**5. Prof. S.Y. Lakhadive,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: saroj20lakhadive@gmail.com Mobile No.: +91-9420199479
**6. Dr. K.R. Nemade,** Address: Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445 401 (India)
E mail: krnemade@gmail.com Mobile No.: +91-7020242364

## Invited Editors

**1. Vikram Raje,** 4, Alderman Willey Close, Wokingham – RG41 2AQ, Berkshire, UK
**2. Vishal Dahalkar,** 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
**3. Dr. Anita Gupte Patil,** Auckland, New Zealand
**4. Ranjit Raje,** 201/83 Whiteman Street, Southbank, Melbourne, VIC-3006, Australia

## Advisory Board

1. **Mrs. Sonali Dahalkar**, 20747, N Margaret Ave, Prairie View, IL 60069 USA
2. **Dr. J. Prabhash**, Former Pro-VC, Uni. of Kerala, Thiruvananthpuram, Director General of State institute of parliamentary affairs, Visiting fellow of diff. Uni. Australia, USA
3. **Dr. Ramesh Mangal**, NAAC Assessor, Ex. Principal, MKHS Guj. College & Director SVCC, Indore, M.P.
4. **Dr. Anil Gajbhiye**, Ex. Principal, Govt. college Sardarpur, Dist. Dhar, M.P.
5. **Dr. Shashikant Sawant**, Ex. H.O.D., Marathi, Vikram Vishwavidyalaya, Ujjain, M.P.
6. **Prof. Dineshkumar Joshi**, Ex. Registrar, S.G.B. Amravati University, Amravati
7. **Dr. P.W. Kale**, Ex. Dean, Faculty of Commerce, S.G.B. Amravati University, Amravati
8. **Dr. R.A. Mishra**, Principal, Amolakchand Mahavidyalaya, Yavatmal
9. **Dr. U.V. Navalekar**, Principal, Abasaheb Parvekar Mahvidyalaya, Yavatmal
10. **Dr. J.M. Chatur**, Principal, Smt. Nankibai Wadhwani Kala Mahavidyalaya, Yavatmal
11. **Dr. Dhanaji Gurav**, Principal, Dr.Babasaheb Ambedkar College, Mahad, Dist. Raigarh,
12. **Dr. Leela More**, Ex-Professor, Government College, Indore, M.P.
13. **Dr. Sindhu Mandavkar**, Ex-Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra



**मुद्रक :** सेवा प्रकाशन, विजय कॉलनी, रुक्मिणी नगर, अमरावती ४४४६०६

**मुखपृष्ठ व संगणक :** डॉ. पवन मांडवकर

Communication

Dr. Bhau Mandavkar Research Centre
Indira Mahavidyalaya, kalamb, Dist. Yavatmal, Maharashtra 445 401
E mail: marathipradhyapak@gmail.com
Alternate mail id: researchjournalofindia@gmail.com
Telephone: +91-7201-226147, 226129 Mobil No.: +91-9422867658, +91-9403014885
**Website:** 1) www.researchjournal.net.in 2) www.indiramahavidyalaya.com

**Online Access Free / Subscription for hard copy for a year including special issues Rs. 500/-**
by crossed Cheque or by DD or by RTGS/IMPS A/c in favour of **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre,** A/c No. 60175373000, Bank Of Maharashtra, Branch - Azad Maidan Road, Yavatmal, IFSC - MAHB0000047, MICR - 445014001



(सूचना : या नियतकालिकात प्रकाशित झालेल्या लेखांचे किंवा शोधनिबंधांचे अधिकार त्या त्या लेखकांकडे असले तरी इतरत्र प्रकाशनार्थ संपादक मंडळाची परवानगी घेणे गरजेचे आहे. संदर्भ वापरताना या नियतकालिकाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मात्र या लेखांमधून अथवा शोधनिबंधांतून प्रकाशित मतांशी संपादक मंडळ, सल्लागार मंडळ किंवा प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. मूळ संदर्भ तपासून घेण्याची विनंती वाचकांना करण्यात येत आहे. मुद्रणदोषासह कोणत्याही चुकांबद्दल दिलगिरी व्यक्त केली जाईल; मात्र कायदेशीर बाबी कळंब येथील न्यायालयांतर्गतच सोडविता येतील.)

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १ | प्रारंभीची मराठी ग्रामीण कविता | डॉ.लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव | ५–८ |
| २ | आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री चळवळीचे स्वरूप | डॉ. स्मिता प्र. खोंडे | ९–१२ |
| ३ | 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच'–एक चिंतन | डॉ. सविता अशोक माळी | १३–१७ |
| ४ | समकालीन मराठी कादंबरीकार | डॉ. लिंगप्पा गुळाळे | १८–२२ |
| ५ | नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील प्रवाह | डॉ. प्रताप गायकवाड | २३–२७ |
| ६ | संत नामदेवांचे व्यक्तिमत्त्व आणि काव्य | प्रा. डॉ. ज्ञानबा महादू गाडे | २८–३१ |
| ७ | उखाणा : एक भाषिक सणंग | प्रा.डॉ. कांत जाधव | ३२–३८ |
| ८ | संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक चिंतन | डॉ. प्रमोद दामोदर देवके | ३९–४३ |
| ९ | अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री चित्रणे | डॉ. निशा जोशी | ४४–४७ |
| १० | महात्मा फुले यांचे वाङ्मय | प्रा. दिलीप घोनमोडे –संशोधक<br>डॉ. जगदीश मेश्राम –मार्गदर्शक | ४८–५२ |
| ११ | साहित्यातील रसाची आस्वाद्यता | प्रा.डॉ. मीनाक्षी रा. देव | ५३–५७ |
| १२ | आंबेडकरी चळवळीतील आंतरिक घुसमट व सवर्ण पाटलांनी केलेल्या शोषणावर भाष्य करणारी 'तणकट' कादंबरी | प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम | ५८–६० |
| १३ | वैश्विक महामारीत तुकारामांचे मनोविज्ञान | डॉ. रवींद्र बेम्बरे | ६१–६४ |
| १४ | आदिवासी साहित्य: निर्मिती, प्रेरणा आणि वाटचाल | प्रा. डॉ. संदीप रतन कांबळे | ६५–६९ |
| १५ | मातृभाषेतून शिक्षण देणारे राष्ट्र – इस्रायल | डॉ. पवन मांडवकर | ७०–७६ |
| १६ | नवकथेच्या दुसऱ्या पर्वातील लेखिका | प्रा.डॉ.सौ. वीरा मांडवकर | ७७–८० |

# संपादकीय

'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'चा हा सातव्या वर्षीचा दुसरा अंक आपल्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी संशोधकांनी विविध विषयांवरील उत्तमोत्तम शोधनिबंध प्रकाशनार्थ पाठविले व पीअर रिव्ह्यू समितीकडून झालेल्या छाननीतून प्रकाशनयोग्य अशा निबंधांना हिरवी झेंडी मिळाल्यावर हा अंक तयार झाला आहे. आंतरराष्ट्रीय नियमावलीनुसार शोधनिबंध प्रकाशित करण्यासंदर्भात सर्व संशोधक, अभ्यासक लेखकांना आम्ही सतत आवाहन करतो आणि त्याला शोधनिबंधलेखकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो.यूजीसीचा नियतकालिकांसदर्भात जी नियमावली आहे, तिचे तंतोतंत पालन 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका' करते. हे नियतकालिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषदेच्या मार्गदर्शनात प्रकाशित होते. पी–आयएसएसएन व इ–आयएसएसएन प्राप्त या नियतकालिकाचा इम्पॅक्ट फॅक्टरही पाचच्या वर आहे.

शोधनिबंध लेखकांनी शोधनिबंध लेखनाच्या आंतरराष्ट्रीय पद्धती पाळून त्याचा मूल्यात्मक व वाङ्मयीन दर्जा सांभाळावा, ही आमची अपेक्षा असते. त्यात गोषवारा अथवा सारांश, बीजशब्द, प्रस्तावना, निष्कर्ष किंवा समारोप, संदर्भ यांचा समावेश अनिवार्यपणे करावा. शुद्धलेखनाच्या चुका नसाव्यात. शोधनिबंध पूर्णत: तपासूनच पाठवावा. जर्नल हे गूगल, एसएसआरएन, रिसर्च गेट यांच्याशी लिंक केले असल्याने आपल्या निबंधाचे शीर्षक, लेखकाचे नाव व गोषवारा युनिकोड फॉन्टमध्ये मराठीत व त्याखाली इंग्रजीत अनुवाद टाईम्स न्यू रोमन मध्ये पाठविल्यास त्याचा आपल्याला फार मोठा फायदा होतो.

हे जर्नल गूगल कनेक्ट असलेल्या www.researchjournal.net.in या व इंदिरा महाविद्यालयाच्या www.indiramahavidyalaya.com या वेबसाईटवर Research Journal या हेडमध्येही ठेवले जाते. त्यामुळे आपल्या निबंधाचे शीर्षक, विषय किंवा लेखकाचे नाव गूगलवर सर्च करताच आपल्यापुढे आपला निबंध किंवा त्यासंदर्भातील माहिती निबंध प्रकाशित झाल्यावर ओपन होते. गूगल स्कॉलर, रिसर्च गेट, एसएसआरएनवर आपण असल्यास, आपला शोधनिबंध दर्जेदार असल्यास, सायटेशन मिळाल्यास आपोआप तिथे नोंद होते. 'नॅक'मध्ये हे शोधनिबंध दाखवता येतात. आपल्याला दिलेली लिंक आपण नॅक SSR मध्ये, आपल्या महाविद्यालयाच्या संकेतस्थळावरील आपल्या रिसर्च पेपर्समध्ये तसेच आपल्या बायोडाटातील रिसर्च पेपर्ससह विविध ठिकाणी नमूद करू शकता. Peer Reviewed जर्नल असल्याने यातील शोधनिबंध विद्यापीठ कायदा २०१६ नुसार विविध प्राधिकरणांवरील नॉमिनेशन/को ऑपसाठी ग्राह्य धरले जातात. तसेच एपीआयसाठी Peer Reviewed जर्नलमधील शोधनिबंधांचे गुण ग्राह्य धरता येतात. हे १८ जुलै २०१८ रोजी यूजीसीच्या नियुक्ती व पदोन्नतीसंदर्भात प्रकाशित 'द गॅझेट ऑफ इंडिया' मधील गाइडलाइन्समध्ये पृ. क्र. १०५ वर टेबल क्र. २ मध्ये पहिल्याच क्रमांकावर आहे. हे बघण्यासाठी त्याची लिंक खालीलप्रमाणे आहे.

https://www.ugc.ac.in/pdfnews/4033931_UGC-Regulation_min_Qualification_Jul2018.pdf

आपल्या सर्वांच्या सहकार्याने अधिकाधिक दर्जेदार शोधनिबंध ऑनलाईन व ऑफलाईन प्रकाशित करण्याची संधी 'मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिके'ला मिळत राहील, हीच अपेक्षा!

— डॉ. पवन मांडवकर
व संपादक मंडळ

# प्रारंभीची मराठी ग्रामीण कविता

**डॉ. लोणे राजेंद्रकुमार लक्ष्मणराव**
सहयोगी प्राध्यापक,
श्री रेणुकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, माहूर जि. नांदेड
email - rajendrakumarlone510@gmail.com मो. क्र. 9421302534

## प्रस्तावना

मराठी ग्रामीण कविता ही ग्रामीण असली तरी तिची प्रेरणा इंग्रजी साहित्यातील पॅस्ट्रोल पोएट्रीवरून घेतलेली दिसते. ग. ल. ठोकळ यांनी थॉमस हार्डीच्या कवितेपासून प्रेरणा मिळाल्याचे स्वतःच कबूल केलेले आहे. ही प्रेरणाच उसनी असेल तर त्यातून निर्माण होणारे साहित्य कसदार कसे होईल? याचा दोष वि. स. खांडेकर तत्कालीन समाजव्यवस्थेला देतात. जातिभेद मोडण्यावर भर देणारे, हिंदू-मुसलमानांच्या एकतेवर पानेच्या पाने खर्ची घालणारे मराठी साहित्यिक साहित्यात मात्र नागर आणि खेडवळ असा भेद पाळतात. खेड्यात का कुठे ललित साहित्य असते का? ललित वाङमयात विनोदासाठी ग्रामीण बोलीचा आणि ग्रामीण वातावरणाचा वापर केलेला दिसून येतो. याचे कारण आमचे सांस्कृतिक मनच प्रगल्भ झालेले नव्हते. कलेसंबंधी, साहित्यासंबंधी आमच्या चुकीच्या धारणा होत्या. स्वतः वि. स. खांडेकर आणि प्रा. ना. सी. फडके कलावाद आणि जीवनवाद यात अडकून पडलेले होते. या दोघांनाही कलाही आणि जीवनही कळलेले दिसत नाही. कळले असते तर कला आणि जीवन हे वेगवेगळे असते असे त्यांनी म्हटलेच नसते. तरी पण तत्कालीन मराठी वाचक आणि मराठी साहित्य हे खोट्या, काल्पनिक वाङमयीन कल्पनेत अडकून पडलेले होते. याचे सुरेख वर्णन वि. स. खांडेकर 'सुगी' या कथासंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेत करतात. "कला म्हणजे सौंदर्य, हे सौंदर्य श्रीमंती व विलास यांचे एकुलते एक अपत्य आणि प्रणयवृत्ती या अपत्याची दाई, या त्रिकोणात वावरणाऱ्या कल्पनेचा ज्यांच्या मनावर पूर्णपणे पगडा बसलेला आहे. त्यांना बहुजन समाजाशी समरस होणे अगर खेड्यातल्या जनांचे, मनाचे आणि वनाचे विविध सौंदर्य आपल्या वाङमयातून कुशलतेने प्रगट करणे फारसे शक्य नाही." यामुळेच सुरूवातीची ग्रामीण कविता कल्पनारम्य, प्रणयभावना आणि खोटा आनंद यातच रममाण होताना दिसते. खेड्यातील दुःख, दैन्य, दारिद्र्य फारसे तिला जाणवतच नाही. हा इशारा वि. स. खांडेकर यांनी इ.स. १९३३ मध्ये दिलेला होता. त्यांच्याही पूर्वी शहरी मने, माणसे, गांधीजींचा आदेश मानून खेड्याकडे वळत होते. तिथे त्यांना सगळीकडे 'आनंदी आनंद गडेच' दिसत होता. महात्मा जोतीबा फुले यांनी केलेले बहुजन समाजातील कार्य आणि या कार्यामुळेच जागा झालेला बहुजन समाज आपले विचार, भावना शब्दात मांडू पाहत होता. रविकिरण मंडळाने त्यांना वाट मोकळी करून दिली.

## विषय विवेचन

केशवसुतांपासून सुरू झालेली मराठी कविता आपली स्वतंत्र वाट स्वीकारीत इ.स. १९२० पर्यंत आलेली होती. हा प्रवाह जोमाने वाहत होता. त्याला विविध फाटे फुटलेले होते. पण या पाण्याच्या किनाऱ्यावर बऱ्याच कारागीरांनी सुंदर घाट बांधले. कल्पनेचा फुलोरा फुलवून बांधलेल्या या घाटांनी घडीभर मनोरंजन केले, पण साचलेल्या पाण्याला प्रवाहित करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात नव्हते. मराठी साहित्य आवर्तात सापडल्यासारखे झालेले होते. त्यामुळे मराठी कविताही रंजनाच्या अंगानेच वाढू लागली आणि सत्त्वहीन बनली. यातूनच रविकिरण मंडळातील कवींनी काव्यगायनाचे प्रकार सुरू केले. कवितेला लोकांपर्यंत पोहोचविले, लोकप्रिय केले पण यामुळे एक हानीही झाली. मराठी कविता वाचकनिष्ठ बनली. वाचकांचा कल, आवड लक्षात घेऊन ही कविता लिहिली जाऊ लागली. त्यामुळे रविकिरण मंडळानेच मराठी कवितेची कोंडी करून टाकली.

या कोंडीची छाया त्या काळात लिहिल्या जाऊ लागलेल्या ग्रामीण कवितांवर अपडणे स्वाभाविक होते. ग्रामीण कविता लिहिणारे काही कवीही रविकिरण मंडळातील कवींचे आकलन करीत होते. ग्रामीण कवितेकडे ते एक हौस म्हणून, रूचीपालट म्हणून पाहत होते. गांभीर्याने कुणी पाहिलेच नाही. एक स्वतंत्र वाङमयप्रकार त्याच्या वेगळ्या प्रेरणा, अनुभवविश्व आणि वेगळा आविष्कार असेल असे कोणाला वाटलेच नाही. "अशा परिस्थितीत जन्मास आलेली आरंभीची स्फुट ग्रामीण कविता वेगळा संसार किंवा आपले स्वतंत्र अस्तित्व प्रभावीपणे प्रस्थापित करणे शक्य नाही. हौसेखातर नागर मुलीने खेड्यातील मुलीचा पोषाख घटकाभर धारण करावा आणि मिरवावे तसा हा केवळ रूचीपालटाचा प्रकार म्हणूनच ही कविता आरंभी जन्माला आली. रविकिरण मंडळकालीन कवितेत असे अनेक वरवरचे काव्यप्रकार जन्माला येत होते, हे ऐतिहासिक सत्य सर्वांना माहीत आहेच." असे आनंद यादव म्हणतात ते सार्थ वाटू लागते.

भा. रा. तांबे, गिरीश आणि यशवंत यांनी फुटकळ स्वरूप ग्रामीण भाषेत कविता लिहिली; परंतु ग्रामीण कवितेच्या जनकत्वाचा मान त्यांच्याकडे जात नाही. चंद्रशेखर यांनी 'काय हो चमत्कार आणि गिरीश यांनी 'आंबराई' हे शेतकऱ्यांच्या जीवनावर दोन खंड प्रसिद्ध केलेले आहेत आणि ते गाजलेलेही आहेत. शेतकरी जीवनावर ही पहिलीच पुस्तके म्हणूनही त्याला विशेष महत्त्व आहे. तीच तीच चावट आणि पांचट पुस्तके वाचून आपली वाचनाची आवड भागविणाऱ्या चाकोरीबद्ध मराठी रसिकतेला हा ग्रामीण हुरडा चमचमीत लागला नाही तरच नवल! केवळ नव्या नव्हाळीचे म्हणूनही दोन्ही पुस्तके त्या काळात गाजली. यांना खंडकाव्य म्हणण्यापेक्षा खरे तर कथाकाव्य म्हटलेले बरे, एखादे कथाबीज मनात ठेवायचे आणि क्रमाक्रमाने ओळी रचून ते पूर्ण करायचे असे तंत्र या दोघांनी केले. ही भाषेची केवळ कारागिरी होती. त्याचे स्वरूप पाहू गेल्यास सुरूवातीला निसर्गाचे समकालीन वर्णन, त्यानंतर कथाबीज आकार घेईल असा एखादा प्रसंग, प्रसंगानुरूप संवाद, शरीर पातळीचे तपशीलवार वर्णन, कधीकधी चिंतनाचा देखावा आणि उपदेश करण्याची प्रवृत्ती तर त्या काळात सगळ्याच वाङमयात दिसून येते. त्यात स्फूर्तीचा प्रेरणेचा अभाव दिसून येतो. जिथे स्फूर्तिचाच अभाव आहे तिथे जीवनाचे सखोल दर्शन कसे घडेल? सांकेतिक काव्यतंत्र दोघांनाही माहीत असल्यामुळे ही दोन्ही खंडकाव्ये बांधेसूद उतरलेली आहेत. पण ग्रामीण जीवनाचा अनुभव मुळातच कमी असल्यामुळे ग्रामीण वास्तव त्यात यथार्थपणे उतरलेले नाही. शहरी कवींनी आपल्या रोमँटिक कल्पना शेतकऱ्यांच्या जीवनातील अनुभवांवर आरोपीत केलेल्या आहेत.

यानंतर चांगला प्रयोग म्हणजे जानपद कवितांचा. इ.स. १९३३ मध्ये प्रसिद्ध झालेला प्रातिनिधीक काव्यसंग्रह "सुगी". जवळजवळ पस्तीस कवींच्या कविता या संग्रहात एकत्रित केलेल्या आहेत आणि या सर्व कवितांचा विषय ग्रामीण जीवन हाच आहे. मराठीतील ग्रामीण स्फुट कवितांचा हा पहिलाच काव्यसंग्रह. यातील नांवे अशी : गिरीश, भ. श्री. पंडित, वि. भी. कोलते, वा. गो. मायदेव, ना. घ. देशपांडे, कवी आनंद, सोपानदेव चौधरी आणि संपादन केलेले होते ग. ल. ठोकळ यांनी. या काव्यसंग्रहाकडे कटाक्ष टाकल्यास असे दिसते की, ही सर्व कवीमंडळी शहरी आहेत. अधुनमधून रूचीपालट म्हणून त्यांनी ग्रामीण कविता लिहिलेल्या आहेत. नाविन्याची हौस सोडली तर दुसरी प्रेरणा सापडणे मुश्किल आहे.

यातील बहुतेक सर्व कविता वर्णनपर आणि माहितीपरच आहेत. ग्रामीण शेतकऱ्यांच्या जीवनातील सर्वसामान्य प्रसंगच त्यांनी आपल्या कवितांतून रंगविलेले आहे. ग्रामीण भागातील माणसे, तेथील निसर्ग, पिके, सुगी, मोर, पेरणी, निंदणी, कापणी, सकाळ आणि संध्याकाळ यांचे रम्य वातावरण आणि या वातावरणात रंगणारे प्रियकर-प्रेयसी, पती-पत्नी यांचे रोमँटिक प्रेम इत्यादी विषय 'सुगी' या काव्यसंग्रहात आहेत. शेतकऱ्यांचे जीवन, त्यांची सुख दुःखे या कवींनी जवळून पाहिलेली नाहीत. त्यांची जगण्याची पद्धत, रीतीरिवाज यांची माहिती नाही. शेतात येणारी पिके कोणत्या मोसमात, कोणत्या वेळी येतात हेही त्यांना माहीत नाही. यामुळे यांच्या कवितेत तपशिलाचे बरेच घोटाळे झालेले दिसून येतात. ग्रामीण माणसांना, मनांना गंभीरपणे आविष्कृत करण्याचा प्रयत्न कुणीच केलेला नाही. ग्रामीण भाषेची खरी ताकद कुणालाच पूर्णपणे समजलेली नाही. या काव्यसंग्रहात ग्रामीण कवितेची शक्यता मात्र सुचित केलेली आहे. ही शक्यता ओळखून तिचा प्रातिनिधीक संग्रह काढण्याची संकल्पना

ग. ल. ठोकळ यांना सुचली. ग. ल. ठोकळ स्वत:ही अशा प्रकारची कविता लिहित होते. याच काव्यसंग्रहात पां. श्री. गोरे यांची कविता मात्र ग्रामीण जीवनाच्या वास्तवाला स्पर्श करणारी आहे. ग्रामीण जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्र्य आणि अज्ञान त्यातून येणारी असहयता हा त्यांच्या कवितांचा स्थायीभाव आहे. त्यांच्या कवितांची भाषा ग्रामीण नसली तरी तिची आंतरिक शक्ती ग्रामीणच आहे. ग्रामीण भाषेची शक्तीस्थाने तिला समजलेली आहेत. त्यामुळे आनंद यादव हे पां. श्री. गोरे यांना मराठीतील पहिले ग्रामीण कवी मानतात. त्यांच्या कवितांची संख्या कमी असली तरी आंतरिक त्या सच्च्या आहेत. शहरी व्यक्तिमत्वाने डागाळलेल्या नाहीत. त्यामुळे त्या अधिक प्रामाणिक वाटतात.

'सुगी' या काव्यसंग्रहात चार पाच कविता लिहिणाऱ्या ग. ह. पाटील यांनी इ.स. १९३४ मध्ये 'रानजाई' नावाचा स्वत:चा कवितासंग्रह प्रसिद्ध केला, काही विद्वान या कवितांचा समावेश ग्रामीण कवितेत करीत नसले तरी ग्रामीण कवितेची बरीच वैशिष्ट्ये 'रानजाई' या काव्यसंग्रहात दिसून येतात. ग. ह. पाटील हे स्वतः शेतकरी. त्यांचे बालपण खेड्यात, ग्रामीण परिसरात गेले. पण पुढे त्यावर शहरी संस्कार झाले. त्यामुळे त्यांच्या कविता शहरी संस्काराने डागाळलेल्या सारख्या वाटतात. असे असले तरी त्यांची कविता प्रामाणिक, प्रांजळ आणि प्रत्ययकारी झालेली आहे. ग. ह. पाटील यांनी बालपणी पाहिलेले खेडे, ज्यांच्या अंगाखांद्यावर ते खेळले, नदीत मनसोक्त डुंबले, झाडाझुडपावर चढले त्या खेड्याचा शहरात आल्यानंतरही त्यांना विसर पडत नाही. त्यामुळे 'रानजाई' या काव्यसंग्रहातील कवितांमध्ये ग्रामीण भागातील खेडे, तेथील जीवन, माणसे, या ग्रामीण माणसांची संस्कृती, परंपरा, लोककल्पना, तेथील रम्य निसर्ग, उघडेवाघडे डोंगर; तसेच अकृत्रिम मानवी जीवन इत्यादी विषय त्यांच्या कवितेत येतात.

'रानजाई' हा काव्यसंग्रह वाचल्यानंतर रूखरूख लागून राहते ती ही की, या कवीने आपले ग्रामीण व्यक्तिमत्व ओळखून, ग्रामीण कवितेची मौलिक प्रेरणा लक्षात घेऊन कविता लिहिली असती तर त्या काळात लोकप्रिय असलेल्या, खोटी नसलेल्या, मळलेल्या माहितीवर ग्रामीण कवितेच्या पलीकडची, प्रांजळ, सच्च्या आत्मनिष्ठेतून जन्मलेली, चिंतनाने युक्त, अधिक अंतर्मुख अशी ग्रामीण कविता जन्माला आली असती.

'रानजाई' वाल्यांनी ग्रामीण कवितेला जन्म दिला नसला तरी ग्रामीण कवितेसाठी रस्ता तयार करण्याचे कार्य केले हे नाकारता येत नाही. 'रानजाई' या काव्यसंग्रहानंतर दोनच वर्षांनी म्हणजे इ.स. १९३८ मध्ये 'मीठ-भाकर' हा काव्यसंग्रह ग. ल. ठोकळ यांनी प्रसिद्ध केला आणि मराठी साहित्याला एक वेगळीच लज्जत, चव दिली. मराठी साहित्याची अभिरूचीच बदलून टाकली. ग. ल. ठोकळ हे बऱ्याच दिवसांपासून ग्रामीण कविता लिहित होते. ग. ल. ठोकळ यांच्यावर आणि त्यांच्या कवितेवरही रविकिरण मंडळाची छाप दिसते. ग. ल. ठोकळ यांना ग्रामीण जीवनाची जवळून माहिती आहे. त्यामुळे त्यांच्या कवितेत ग्रामीण जीवनातील अनेक बारीकसारीक तपशील आलेले आहेत. त्यामुळे त्यांची कविता अधिक जिवंत व प्रत्ययकारी झालेली आहे.

खेडेगावातील माणसांच्या जीवनात निसर्गाला एक आगळेवेगळे स्थान असते. त्यांच्या जीवनाचा निसर्ग हा एक अपरिहार्य भाग असतो. हा निसर्ग एखाद्या घटनेची पार्श्वभूमी म्हणून येतो. सकाळ, दुपार, संध्याकाळ, रात्र, शिवार, पीकपाणी, झाडे, ओढे, नद्या, तळे यांचे वर्णन करतानाही निसर्ग त्यांच्या कवितेत येतो.. पती-पत्नी या विषयावर हजारो कवींनी कविता लिहिलेल्या आहेत. ग. ल. ठोकळ यांनीही पती-पत्नीतील प्रेमभावनेचा आविष्कार करणाऱ्या कविता लिहिलेल्या आहेत. पण ही प्रेमभावना शहरी, रोमँटिक नाही. खेड्यापाड्यातील बायका नवऱ्यावर प्रेम करतात, पण ही प्रेमभावना संयम ठेवून व्यक्त करतात. हे बारकावे ग. ल. ठोकळ यांच्या कवितेत येतात. मोटेच्या आजुबाजूला कोणी नाही असे पाहून त्यांचा शृंगार फुलतो. इतरांसमोर त्या आपली प्रेमभावना कृतीतून निमित्ताने प्रकट करतात.

'मीठभाकर' या काव्यसंग्रहासाठी वापरलेली भाषा ही बहुतेक करून ग्रामीण आहे. तिच्यात अधुनमधून शहरी शब्दही येतात; परंतु त्यामुळे कवितेच्या ग्रामीणतेला कुठलीही झळ पोहचत नाही.

## निष्कर्ष

इ.स. १९६० नंतर ग्रामीण समाजातील माणसे मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती करू लागले; परंतु तात्त्विक पायाच नसल्यामुळे साहित्य कलाकृतीमुळे समाजजीवनातील बदल, ताणतणाव असलेल्या समाजवास्तवाचा वेध त्यांना घेता येत नव्हता. तशी मूल्यदृष्टी त्यांना आलीच नाही. त्यामुळे मूल्यात्मक दृष्टी नसलेल्या ग्रामीण साहित्यिकांनी व्यक्तीकेंद्रीत साहित्य लिहिले किंवा किस्से सांगून हास्यनिर्मिती केली. समाज वास्तवाचा वेध घेऊन, त्यांची संगती लावून जीवनार्थ सांगणारी साहित्यकृती निर्माण करता आलेली नाही.

इ.स. १९६० च्या दरम्यान मराठी साहित्यावर शहरीपणाचाच प्रभाव होता. त्यानंतर मात्र ग्रामीण माणूस साक्षर झाला आणि त्याच्या अनुभवांचे, मानसिकतेचे नवे दालन मराठी साहित्यात उघडले गेले. ग्रामीण भागातील खरा माणूस आपल्या सुख-दुःखासहित पहिल्यांदा ग्रामीण कवितेत दिसू लागला. आज डॉ. आनंद यादव, ना. धों महानोर, विठ्ठल वाघ, इंद्रजित भालेराव, विलास पाटील, उत्तम कोळगावकर, प्रकाश होळकर, श्रीकांत देशमुख इत्यादी जुने नवे कवी ग्रामीण कवितेच्या प्रवाहाला समृद्ध करीत आहेत. बहिणाबाई चौधरी या तर ग्रामीण कवितेच्या आद्य कुलगुरू मानाव्या लागतात. ग. ल. ठोकळ, ग. ह. पाटील, गिरीश, चंद्रशेखर, ना. घ. देशपांडे हे त्या मानाने अतिशय सुमार व सवंग वाटतात.

## संदर्भ ग्रंथ :

१) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ 'ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि दिशा,' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, तृतीय आवृत्ती - २६ जाने.२००७.

२) डॉ. देशमुख गणेश, 'ग्रामीण समाजजीवन व साहित्य' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती-५ सप्टेंबर, २००८.

३) डॉ.मुलाटे वासुदेव, 'ग्रामीण साहित्य: स्वरुप व दिशा' कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती- जून १९९४.

४) डॉ. कोत्तापल्ले नागनाथ, 'साहित्याचा अन्वयार्थ' मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती सप्टेंबर, १९९६.

५) डॉ.मुलाटे वासुदेव, 'नवे साहित्य: नवे आकलन', मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती- जानेवारी, १९९६.

६) डॉ.मुलाटे वासुदेव, (संपा.) 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती - ९ ऑगस्ट २००५.

७) बोराडे रा.रं., 'ग्रामीण साहित्य', साकेत प्रकाशन प्रा.लि. औरंगाबाद, १ आवृत्ती - १९९२.

८) डॉ. जाधव गजानन (संपा.), 'पोशिंद्याची कविता' पैलू प्रकाशन, बुलडाणा, पहिली आवृत्ती एप्रिल २०१०.

❖❖❖

# आधुनिक मराठी साहित्यातील स्त्री चळवळीचे स्वरूप

डॉ. स्मिता प्र. खोंडे
एम. ए. (मराठी), बी.एड., पीएच.डी.
विद्यानिकेतन महिला महाविद्यालय, आर्वी,
ता. आर्वी, जि. वर्धा.
E-mail - sj28081974@gmail.com Mo.No. 9158975429

माणूस हा जन्मापासूनच स्वतंत्र असतो. त्याला बळाच्या जोरावर कुणीही गुलाम करु शकत नाही. या विचारांच्या प्रभावातूनच पारतंत्र्यात वावरणाऱ्या आणि स्वातंत्र्याची कास धरणाऱ्या चळवळीने वेग धरला. गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी दुर्बल घटकांनी अस्मिता जागी केली. याला स्त्रीयासुद्धा अपवाद नव्हत्या. याच काळात स्त्रीवादी चळवळीचा उदय झाला. स्त्रीवादाचा विकास म्हणजे स्त्रीयांचे हक्क व त्यांच्यावरील अन्याय, अत्याचार यांना विरोध करणाऱ्या विचारांची चळवळ आहे. जीवनामध्ये चळवळीला फार महत्वाचे स्थान असते. चळवळ हे मनुष्याच्या जीवनातील महत्वपूर्ण अंग आहे. कोणत्याही चळवळींची यशस्वीता तिच्या वैचारिक परिपक्तेवर अवलंबून असते. तिचा वैचारिक पाया जर सकस आणि स्पष्ट असेल तर ती चळवळ यशस्वी होते. स्त्रीवादाला ही एक सकस बैठक आहे. तिच्या विकासाचा इतिहास आहे. स्त्रीवाद या विचारसरणीचा उदय स्त्रीयांच्या चळवळीतून झाला. स्त्रीवाद या संकल्पनेचा उदय पाश्चिमात्य देशात झाला असे असले तरीही बदलत्या काळानुसार जगातील विविध राष्ट्रामधून स्त्रीवाद उत्तरोत्तर विकसित होवू लागल्याचे दिसते.

स्त्रीवाद या संकल्पनेचा उदय स्त्रीयांच्या कृतीशील चळवळीतून झालेला आहे. स्त्रीवाद केवळ बौद्धीक चर्चा न करता समाजातील विविध घटकांचा विचार मांडून विकसित झालेला दिसून येतो. त्याला अनुभवाची जोड आहे. सत्याच्या सिद्धांतावर तपासून हा विचार समर्थपणे मांडण्यात आला आहे. स्त्री ही माणूस आहे हा तिचा मध्यवर्ती विचार आहे. समाजात स्त्री जन्माला येत नाही तर ती घडवली जाते तिचा जन्म माणूस म्हणून होतो परंतु तिचे माणूस पण नाकारुन बाईपण तिच्या पदरात टाकते. तसेच परंपरेचे जोखड तिच्या मानगुटीवर ठेवते. पुरुषप्रधान विचाराला विरोध करुन स्वहक्काचे, स्वअधिकाराचे स्थान प्राप्त करुन घेणे याकरिता स्त्रीवाद विचारसरणी कार्यप्रवण आहे. मानवनिर्मित स्त्री आणि पुरुष संकल्पना नाकारुन स्वतःचे माणूसपण प्राप्त करण्यासाठी तिची धडपड आहे. लिंगभेदावर आधारीत विषमता नाकारणे हे तिचे पुढील आव्हान आहे. समाजामध्ये स्त्री पुरुष समानता निर्माण करणे हे स्त्रीवादाचे उद्दिष्टये आहे याकरिता स्त्रीवादाचा संघर्ष आहे.

भारतीय समाज व्यवस्थेत खऱ्या अर्थाने स्त्रीवादाची मांडणी प्रथमः महात्मा जोतिबा फुले यांनी केली आहे. याच काळात स्त्रीवादी विचारसरणी मांडणीचे श्रेय पंडिता रमाबाई, ताराबाई शिंदे, राजा राममोहन राय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनाही दयावे लागते. स्त्रीवादी या संकल्पनेचा स्वीकार करुन जरी त्यांनी कार्य केले नसले तरीही त्यांच्या साहित्यातून स्त्रीवादी विचारसरणीचे प्रतिबिंब प्रखरपणे प्रकटित झाले आहे. १९ व्या शतकात फुले दाम्पत्यांनी स्त्रीयांकरिता मुलींची पहिली शाळा पुण्याच्या भिडेवाड्यात काढून स्त्रीवादाची भक्कम पायाभरणी केली आहे. स्त्रीयांना शिक्षण मिळावे म्हणून सावित्रीबाई फुले यांना शिक्षित करुन पहिली शिक्षिका होण्यासाठी प्रवृत्त केले. त्यांच्या या कृतीचे यशस्वी फळ म्हणजे ताराबाई शिंदे यांनी परखड विचार स्त्रीपुरुषतुलना मध्ये मांडले आहे. पुरुषांनी लिहिलेल्या साहित्यातील पुरुषीकावा उघड करुन स्त्रीवादी विचारसरणीचा उत्तम नमूना त्यांच्या निबंधातून मांउला व भारतीय स्त्रीवादाची वाटचाल कशी असावी हा मार्गच दाखवून दिला आहे. महात्मा जोतिबा फुले यांचे कार्य स्त्रीवादाच्या संदर्भात मैलाचा दगड ठरणारे आहे. सर्वसामान्य घरातील स्त्रीयांनी शिक्षण घेवून आपल्या कुटूंबाचा विकास करावा हा विचार त्यांनी मांडला. त्याकरिता मुलींची शाळा काढली व अस्पृश्याकरिता शाळा काढली.

महात्मा फुलेंच्या तोडीचे स्त्री शिक्षण विषयक नवविचारांचा पुरस्कार करणारे विदर्भातील प्रज्ञाचक्षु गुलाबराव महाराजही होते. हे त्यांच्या स्त्री शिक्षण सभेच्या अध्यक्षीय भाषणावरुन स्पष्ट होते. १ जानेवारी १९१४ रोजी हर्दा येथे भडकमकर शास्त्रीची सुविदय विदुषी कन्या गोदावरीबाईचे 'स्त्री शिक्षण' या विषयावर व्याख्यान झाले. स्त्री शिक्षण सभेच्या या कार्यक्रमात श्री संत गुलाबराव महाराज अध्यक्ष होते. त्यांच्या अध्यक्षीय भाषणातून स्त्री शिक्षण विषयक उदार दृष्टिकोन व्यक्त होतो. ''विद्येपासून अविनय कधीच उत्पन्न व्हावयाचा नाही. विद्येपासून विनयच

उपन्न व्हावा असा तिचा स्वभाव आहे आणि जर शिक्षणापासून स्त्रिया अविनीत होतात अशी वस्तुस्थिती असेल तर तो दोष शिक्षण पद्धतीचा स्त्रियांच्या बुद्धीचा नव्हे. स्त्रीया लिहिणे वाचणे शिकण सगळा दिवस पुस्तके वाचू लागल्या तर घर कामाकडे दुर्लक्ष करतील अशी भिती बाळगण्याचे कारण नाही. तर घरची कामे सांभाळून फुरसतीच्या फावल्या वेळात पुस्तके वाचून ज्ञान मिळविता येईल. आपल्या विस्कळीत झालेल्या समाजाची घडण सुधराविण्याकरिता स्त्रियांना शिक्षण देणे आवश्यक आहे.'' हा त्यांचा सुधारणावादी विचार केवळ भाषणापुरताच मर्यादित नव्हता. त्यांनी स्वत:ची पत्नी मनकर्णिका हिला लग्नानंतर लेखनवाचन व्याकरणादि ग्रंथाचे शिक्षण दिले. हे त्यांचे शैक्षणिक कार्य नमूद करण्यासारखे आहे. पुरुषापेक्षा स्त्री ही कित्येक पुटीने श्रेष्ठ आहे असे यांनी म्हटले आहे. 'पतीव्रता चरित्रामृत' या ग्रंथामधून स्त्रीच्या अस्तित्वाची तिच्या अधिकाराची जाणीव करुन दिलेली आहे. ते म्हणतात व्यवहारदृष्टया स्त्री अबला वाटत असली तरी परमार्थदृष्टया तिचा अधिकार आणि तिला दिलेल्या सोयी फार मोठया आहेत. स्त्रीचे स्वाभाविक कर्म धर्मरुप आहे. उलट पुरुषाला, त्यांच्या स्वभावाला मुरड घालून कर्म व उपासना करावी लागते. धर्म, अर्थ, काम, मोक्ष या चार पुरुषार्थपैकीच ''स्त्री ही धर्माचे ठिकाणी दासी आहे, अर्थाचे ठिकाणी मैत्रिण आहे कामपुरुषार्थात स्वामिनी आहे आणि मोक्षपुरुषार्थात तर ती स्वतंत्र असून पुरुषापेक्षा कित्येक पटीने श्रेष्ठ आहे '' असे संत गुलाबराव महाराजांचे स्त्री विषयक विचार कृ. मा. घटाटे यांनी प्रतिपादन केले आहे.

वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी स्त्रीला शिक्षित करतांना तिला जीवनशिक्षण देण्यात यावर भर दिला आहे. कारण जीवन शिक्षणाच्या द्वारेच तिचा आंतरिक विकास घडवून आणता येतो.

महिलांचे उच्चतम शिक्षण।
शिक्षणात असावे जीवनाचे स्थान।
जीवनात असावे स्वारस्यपूर्ण।
शांति दयादि भावनांचे।

सामाजिक परिवर्तनाकरीता, राष्ट्रविकासाकरीता स्त्री शिक्षण फार महत्वाचे आहे. त्याशिवाय जग बदलू शकत नाही. शिक्षणासह कलाही तिला शिकवावी, जेणेकरुन तिला त्यातून स्वावलंबनाचा मार्ग, उदरनिर्वाहाचा मार्ग सापडेल, जेणेकरुन ती तीचे स्वतंत्रजीवन जगू शकेल. राष्ट्रसंत म्हणतात की, शिक्षण जीवनकला शिक्षणासह स्त्रीला शारीरिक शिक्षणही महत्वाचे आहे. आजपर्यंत तू नाजूक आहे, तू अबला आहेस असे संस्कार तिच्यावर बिंबविल्या गेलीत. या संस्कारांना सुंदरतेचे गोजीरवाने मुखवटे लावल्या गेले होते आणि तेच सत्य समजून स्त्रीया त्याला गोजांरत जगत होत्या आणि त्यातून तिचा विकास होण्यापेक्षा ती परावलंबी दुर्बल राहिली आणि त्यामुळे तिचा अध:पात होत गेला. हा अध:पात केवळ स्त्रीया पूरताच सिमित राहिला नाही तर तिच्या या प्रवृत्तीचा प्रभाव येणाऱ्या संततीवरही पडला. नवी पिढी ही प्रवृत्तीतून घडू लागली.

स्त्रीयांना स्वत:लाच स्वत:चे चरित्र सुद्धा सांभाळता येत नाही हे सर्व टाळायचे असेल तर स्वबळाकरिता, स्वउन्नतीकरिता व राष्ट्रविकासाकरिता स्त्रीयांनी स्वरक्षणाची विद्या व सोज्वळ बुद्धीच प्राप्त करण्याकरिता शारीरिक शिक्षण घेतलेच पाहिजे. राष्ट्राला बौद्धिक शिक्षणासह बलसंवर्धन करणाऱ्या शिक्षण घेतलेल्या स्त्रीयांची गरज आहे. या शिक्षणातून आत्मनिर्भर झालेल्या स्त्रियाचं राष्ट्रविकासाच्या प्रक्रियेला योगदान देऊ शकतात. स्त्रीयांचा कौटुंबिक कार्यामध्ये निर्णय, विचार, प्रक्रियेमध्ये सहभाग असायला हवा. कारण स्त्रीचे कौटुंबिक कार्य हे एक प्रकारची राष्ट्रसेवाच आहे. पण हल्ली सुशिक्षित झालेल्या स्त्रियांनाही निटपणे घर सांभाळता येत नाही. हे कार्य करणे त्यांना बंधनकारक किंवा कमीपणाचे वाटते. चूल आणि मूल सांभाळण्यातच राष्ट्राची सेवा आहे. या चूल आणि मूल सांभाळण्याच्या प्रक्रियेतून विक्रमशिल, उद्योग संस्कारपिढी घडविली जात असते आणि या पिढीकडूनच मग राष्ट्रविकास साध्य होत असतो. कुटूंबाप्रती असलेल्या तिच्या कर्तव्यात अपत्यांना योग्य शिक्षण देण्याची पात्रता समाविष्ट असते.

ज्याप्रमाणे राष्ट्रविकासाकरिता महिलांचा कौटुंबिक विचार निर्णय प्रक्रियेत सहभाग महत्वाचा आहे. त्याचप्रमाणे सामाजिक सहभागही महत्वाचा आहे. याबाबत राष्ट्रसंत असे म्हणतात की, स्त्रीयांना केवळ चूल मूल या कार्यापूरते मर्यादित ठेवले तर त्याचा राष्ट्रविकासाला कोणताही हातभार लागणार नाही. स्त्री फक्त एवढ्यापुरतीच मर्यादीत राहावी, तिला जग माहितच होऊ नये असे जर तुम्हाला वाटत असेल तर तो तुमचा दुराग्रहच आहे. त्यांच्या मते प्रसंगी पडेल ती उचित समाजसेवा करण्याचे व प्रतिपक्षियांशी लढा देण्याचे सामर्थ्य महिला वर्गात असायला हवे. जेव्हा सामाजिक प्रक्रियेमध्ये स्त्रीयांचा उत्स्फूर्तपणे सहभाग असेल तेव्हाच समाजाची प्रगती होऊ शकेल. म्हणूनच स्त्रियांच्या कार्यकर्तृत्वाला घरामध्ये डांबून ठेवण्याला राष्ट्रसंत विरोध करतात. कारण ज्या महिला

हुशार, समाजसेवी, शिक्षण घेतलेल्या निर्मळपणाने बोलणाऱ्या कलावान, उद्योगशिल, सैनिक शिक्षणात तज्ञ असतील तर त्यांचा देशाला बराच फायदा होतो. त्याकरिता सर्व समाजदार भारतीयांनी आपल्या स्त्रियांना, मुला—बाळांना, बहिणींना समाजात वावरण्याला वाव देऊन त्यांचा देशाला फायदा करुन देण्याचे श्रेय घ्यावे.

राष्ट्रविकासात स्त्रियांचा सहभाग हवा असेल तर त्यांना सामाजिक बांधिलकीची जाणिव करुन द्यावी लागेल असे राष्ट्रसंत म्हणतात. केवळ ते एवढे सांगूनच थांबत नाही तर ही सामाजिक बांधिलकी निर्माण करण्यासाठी उपक्रमही सांगतात. म्हणजे स्त्रियांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण होण्यासाठी सामुदायिक प्रार्थनेत त्यांचा सहभाग महत्वाचा मानला आहे. याबाबत ते असे म्हणतात की, महिलांनो आपणही सामुदायिक प्रार्थनेत त्यांचा सहभाग महत्वाचा मानला आहे. याबाबत ते असे म्हणतात की, महिलांनो आपणही सामुदायिक प्रार्थनेत आपल्या भगिनींना जागृत व संघटित करुन त्यांच्यात सीता—सावित्री, द्रोपदी, राणी लक्ष्मीबाईचे तेज निर्माण करा आणि आपल्या संततीसही ते शिक्षण द्या. असे कराल तर तुमचा या संघर्षाच्या काळात तरणोपाय आहे. यापुढे परावलंबी राहून अब्रूनिशी जगता येणार नाही.

ताराबाई शिंदे यांच्या व्यक्तिमत्वावर महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या विचाराच्या जबरदस्त प्रभाव होता असे अनेक लेखकांनी, समिक्षकांनी मान्य केले आहे, स्त्रीपुरुष तुलनातील प्रतिपादनावर म. फुले यांचा प्रभाव होता असे डॉ. सं.ग. मालशे यांच्यापासून ते विलास खोले यांच्यापर्यंत अनेक समीक्षकांचे मत आहे. ताराबाई स्त्रीपुरुषतुलना करीत असताना जे दुर्गूण स्त्रीयांत आहेत तेच पुरुषात आहेत किंवा नाहीत याची सिद्धता करण्याची आपली भूमिका स्पष्टपणे नोंदविली आहे. ताराबाईच्या या भुमिकेत आणि आजच्या स्त्रीवादी समीक्षेच्या भूमिकेत सूसंगती असलेली आढळून येते. ताराबाई शिंदे यांच्या स्त्रीपुरुषतुलना या पुस्तकात प्रामुख्याने विधवा पुनर्विवाह याला समर्थन, स्त्री—पुरुष च्या गुणदोषाच्या तुलनेवर विशेष भर, देशातील गिणीच्या संदर्भातील स्त्रीसापेक्ष चिकित्सका आणि सदाचाराने बीजारोपण संदर्भातील ताराबाई शिंदे यांच्या विचाराची बैठक यावर पुस्तकाचे लेखन आधारले आहे. ताराबाई स्वत:च प्रस्तावनेमध्ये या चार सुत्राचा विचार प्रामुख्याने मांडण्याचा निर्देश करतात.

स्त्रीवादी समीक्षा या अनुषंगाने स्त्री पुरुष तुलना याचे मूल्यमापण करताना याचे भान सतत ठेवावे लागते. स्त्रीवादी समीक्षेनुसार बायको किंवा पुरुषी या प्रकारे सांगितले जाणारे विशेष हे स्त्री वा पुरुष अशा जन्मामुळे त्या व्यक्तीत निर्माण होत नाहीत पितृसत्ताक समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या सामाजिक, सांस्कृतिक वातावरणाच्या परिणामातून स्त्री वा पुरुष असा लिंगातील फरक पडत असतो. स्त्री किंवा पुरुष म्हणून सांगितलेले दुर्गुण कोणत्याही लिंगाचा मतभेद व्यक्तीमध्ये असू शकतो असे स्पष्टमत ताराबाई शिंदे यांनी नोंदवले आहे. स्त्रीयांमधील दुर्गुण आणि पुरुष मधील दुर्गुण यांच्यामध्ये तुलना की भूमिका ताराबाईंनी घेतलेली दिसून येते. त्याकरिता विधवा पुनर्विवाह याचे समर्थन, त्याकरिता केलेला युक्तीवाद, दिलेली कारणे याची स्त्रीवादी समीक्षेशी सुसंगती जुळतांना दिसून येत नाही. विधवा पुनर्विवाह याला सशास्त्र—अशास्त्र अशा संकल्पनेत बसवून ताराबाईंनी मांडणी केली आहे.

भारतीय प्रबोधन चळवळीने स्त्रियांच्या प्रश्नांची विधायक चर्चा केली. त्यामुळे निदान उच्च वर्गात का होईना पण स्त्रियांच्या शिक्षणाला सुरुवात झाली. आधुनिक शिक्षणाच्या प्रभावातून स्त्रिया लिहायला लागल्या आणि यातूनच स्त्रिया आपल्या आत्मभानाचा आणि सामाजिक स्थानाचा शोध घेऊ लागल्या. स्त्रियांच्या वास्तव प्रश्नांचा समग्रतेने वेध घेणाऱ्या या कालखंडातील एक समर्थ लेखिका म्हणून विभावरी शिरुरकर यांच्याकडे पाहता येईल. आपल्या कथा—कादंबऱ्यामूधन तत्कालिक सुशिक्षित स्त्रियांच्या विविध प्रश्नांचा आढावा त्यांनी घेतला. एकंदरित सामाजिक परिस्थिती आली त्याचा स्त्रियांच्या आयुष्यावर होणारा विघातक परिणाम त्यामुळे स्त्री मनात निर्माण होणारी भावनिक आंदोलने यांचा अत्यंत वास्तव व प्रखर वेध त्यांनी घेतला. विभावरी शिरुरकर या टोपणनावाने लेखन करणाऱ्या मालती बेडेकर यांना तब्बल बारा वर्ष आपली ओळख लपवून ठेवावी लागली. कारण तत्कालीन समाजात जरी शिक्षणाचा प्रसार झाला तरी स्त्रियांकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टिकोन अजिबात बदललेला नव्हता. आपल्या आत्मिक स्वरांची प्रखर मांडणी करणारे आणि स्त्रियांच्या कौटुंबिक, सामाजिक स्थानाचा शोध घेऊ बघणारे त्यातील दुय्यमत्व शोधणारे विभावरीचे साहित्य तत्कालीन सुशिक्षित समाजाच्या पचनी पडणे ही अशक्य होते. सगळया सामाजिक विरोधाला आव्हान देऊन आपल्यातील माणूसपण सिद्ध करण्याचा प्रयत्न मोजक्याच स्त्रियांनी केला. विभावरी शिरुरकरांनंतर कमल देसाई यांनी आपल्या आतल्या स्वरांना साहित्यातून मुक्तपणे अभिव्यक्त केले.

स्वातंत्र्यापासून १९६० पर्यंतचा काळ हा सामाजिक आणि साहित्यिक दृष्टया देखील स्थितीशील कालखंड आहे. १९६० नंतर परत सामाजिक आणि साहित्यिक घडामोडींना वेग आलेला दिसतो. ग्रामीण साहित्य चळवळ,

स्त्रीवादी साहित्य चळवळ, दलित साहित्य चळवळ १९६० नंतर गतीशील झालेल्या दिसतात. १९६० नंतर स्त्रिया मोठया प्रमाणात लिहू लागल्या. पण हे सगळेच साहित्य स्त्रीवादी आहे असे म्हणता येणार नाही. १९७५ नंतर युनोने जाहीर केलेल्या स्त्री दशकाच्या निमित्ताने झालेली जनजागृती जगभरातल्या त्या स्त्रियांसाठी महत्वपूर्ण ठरली आहे. आपल्या आयुष्याकडे नव्या दृष्टीने बघण्याचे आत्मभान जागृत झाले. यातून साहित्यविषयक जाणिवा देखील बदलत गेल्या. स्त्रीमुक्ती संघटनेपासून स्त्रीउवाच पर्यंत अनेक भगिनींनी चळवळीत महत्वपूर्ण सहभाग नोंदवला. प्रेरक ललकारी मिळून साऱ्याजणी 'प्रतिबिंब' या सारख्या स्त्रीवादी नियतालीकांनी चळवळींची वैचारिक बाजू भक्कम करण्याचा प्रयत्न केला याचा अत्यंत चांगला परिणाम भारतीय स्त्रीजीवनांवर झाला. १९७५ नंतर स्त्रीवादी चळवळ गतिशील झाली. याच कालखंडात स्त्रिया खऱ्या अर्थाने आपल्या अधिकारासाठी आक्रमक झालेल्या दिसतात.

१९७५ नंतर ज्या लेखिका लिहित्या झाल्या त्यातील काही लेखिकांवर स्त्रीवादी चळवळीचा परिणाम अपरिहार्यपणे जाणवते पण यातील बऱ्याच स्त्रिया उच्चवर्गीय आहेत. उच्चवर्गात वावरतांना स्त्री म्हणून असलेल्या समस्या आणि या वर्गात स्त्रियांना मिळणारे दिखाऊ स्थान त्यांच्याकडे बघण्याचा भोगवादी दृष्टिकोन याची चर्चा गौरी देशपांडेयांच्या साहित्यात प्रामुख्याने झालेली दिसते. स्त्रीच्या माणूसपणाचा शोध हे त्यांच्या लघु कादबंऱ्याचे वैशिष्टये आहे. लैंगिक प्रश्नांपासून स्त्रियांच्या सगळयाच प्रश्नांकडे त्या निखळ मानवतावादी दृष्टीकोनातून बघतात. 'गौरी देशपांडे' यांच्या कुटूंबाला लाभलेली व्यक्तीस्वातंत्रवादी परंपरा यामागे निश्चित आहे. एक स्त्री म्हणून प्रत्येक प्रश्नांचे मुळापासून विश्लेषण करण्याची धाडसी प्रवृत्ती त्यांच्यात उपजतच आहे. त्यामुळे अत्यंत बुद्धिवादी पद्धतीने त्या स्त्रियांच्या प्रश्नांच विश्लेषण करु शकतात. तसेच मेघना पेठे यांनी आधुनिक स्त्रियांचे अनेक प्रश्न आपल्या कथा कादंबरीतून प्रभावीपणे मांडले. 'प्रिया तेंदूलकर' यांनी देखील आपल्या कथा साहित्यातून स्त्रियांच्या प्रश्नांची मुक्त अभिव्यक्ती केली आहे.

## संदर्भ ग्रंथ –

१) डॉ. घटाटे कृ. मा. – संत गुलाबराव महाराजांचा १३० ग्रथांचा सारांश
घटाटे यांच्या पीएच.डी. प्रबंधातून
२) लिंबाळे शिरणकुमार – मराठी वाड्ःमयातील नवीन प्रवाह
३) डॉ. महाजन वंदना – स्त्रीवाद आणि मराठी साहित्य
४) डहाके वसंत आबाजी – स्त्रीवाद समिक्षा, स्वरुप व व्याप्ती.
५) शिंदे ताराबाई – स्त्री पुरुष तुलना
६) डॉ. कडवे रघुनाथ – राष्ट्रसंत समग्र वाङ्मय.

❖❖❖

# 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच' – एक चिंतन

डॉ. सविता अशोक माळी
मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविद्यालय,
कडेगाव, जि. सांगली
संपर्कध्वनी ९७६६४५८४७६

स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्री अशिक्षित, दास्यत्व स्वीकारणारी, 'स्व'त्वाची जाणीव नसलेली अशी होती. नंतर मात्र स्त्रीच्या या स्थितीत बदल होऊ लागला. 'स्व'त्वाची जाणीव झालेल्या स्त्रीने समाजकार्यात व राजकीय क्षेत्रात जबाबदारीने पाऊल उमटविण्यास सुरुवात केली. शिक्षणप्रसार, प्रबोधन चळवळ, भारतीय स्वातंत्र्यलढयाची प्रेरणा समाजसुधारकांच्या विचारांचे स्रोत यातून उपलब्ध झालेल्या संधीचा फायदा घेत विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली आहे. कोणत्याही समाजाच्या विकासासाठी वैचारिकता महत्वाची असते. कारण समाजाच्या जडणघडणीचा इतिहास त्यांच्या वैचारिक साहित्यात प्रतिबिंबीत झालेला असतो. समाजाची ज्ञानधारणा, दृष्टिकोन, जीवनपध्दती आणि मूल्यविवेक यांचे उन्नयन करण्याचे कार्य वैचारिक साहित्य करत असते. मराठीत अव्वल इंग्रजी कालखंडापासून जोतीराव फुले, विष्णूशास्त्री चिपळूणकर, न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, ताराबाई शिंदे, इत्यादींनी वैचारिक साहित्याची निर्मिती केली आहे. १९९० नंतरच्या वैचारिक साहित्यात प्रतिमा इंगोले यांच्या साहित्याने मोलाची भर घातली आहे. वैचारिक वाङ्मयही याला अपवाद नाही. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या वैचारिक वाङ्मयामध्ये स्त्रीविषयक चिंतन केले आहे.

१९७५ ते १९८५ हे दशक 'आंतरराष्ट्रीय महिला दशक' म्हणून घोषित झाले. या कालखंडात स्त्रीचे क्षितिज विस्तारले आणि आत्मविश्वासाने ती अनेक क्षेत्रात आपला ठसा उमटवू लागली. असे असले तरी आज स्त्री खरच समस्यातून मुक्त झाली का? असा प्रशन पडतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील स्त्रीच्या समस्या वेगळ्या स्वातंत्र्योत्तर काळातील समस्या आणि २१ व्या शतकातील स्त्रीच्या समस्या वेगवेगळ्य आहेत. कारण प्रत्येक काळातील स्त्रीजीवनाने नवीन वळण घेतले आहे. स्त्रियांना त्रास देणारे प्रशन आता नाहीत, कारण स्त्रीला स्वातंत्र्य मिळाले, स्त्रियांच्या बाजूने आज अनेक कायदे झाले, स्त्री शिकली. परंतू आज समाजात तिचे स्थान काय? हा प्रश्न निर्माण होतो. त्या प्रश्नाचे उत्तर म्हणजे 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच'.

'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच' या वैचारिक लेखसंग्रहात प्रतिमा इंगोले यांनी स्त्रियांना भेडसावणाऱ्या अनेक समस्यांचे चिंतन केले आहे. तसेच त्या समस्यानिवारणासाठी उपायही सुचवितात.

## १. शिक्षण क्षेत्रात स्त्रीचे स्थान

आज स्त्री शिकली, स्वतःच्या पायावर उभी राहू लागली. पण नोकरी करत असताना तिला नेहमी दुय्यम वागणूक मिळते. ही दुय्यम वागणूक शिक्षण क्षेत्रात कशी मिळते यांचे चिंतन प्रतिमा इंगोले करतात. वेगवेगळ्या उदाहरणांनी ते पटवून सांगतात. आजपर्यंत कुलगुरुपद स्त्रीच्या वाट्याला क्वचितच आले आहे. प्राथमिक शिक्षणापासून महाविद्यालयापर्यंत स्त्रीवर अन्यायच झालेला दिसतो. याविषयीचे चिंतन प्रतिमा इंगोले या ग्रंथात करतात.

१९७५ च्या महिला वर्षाने स्त्रीविशयक विचारांना नवी चालना दिली. नोकरी करुन केवळ प्रपंचाला हातभार लावणारी स्त्री एवढी स्त्रीची प्रतिमा मर्यादित राहिली नाही. शिक्षणक्षेत्राचा एकीकडे विस्तार होत होता. जीवनाचे क्षेत्र पर्यायाने विकसित होत होते. त्यानुसार स्त्रियांची नोकरी आणि शिक्षण या दृष्टीनेही क्षेत्र विस्तार होत होता. शैक्षणिक क्षमता वाढल्याने स्त्रियांनाही सन्माननीय पदावर काम करण्याची संधी मिळू लागली. 'करिअर' ही बाब केवळ पुरुषांची नाही, स्त्रीही करिअर करु शकते, स्त्रीमध्ये क्षमता आहे, याविषयीची जाणीव स्त्रियांना आणि समाजालाही होऊ लागली.

मुलांची पहिली शिक्षिका आई असते. घरात जेव्हा मुलांच्या अभ्यासाचा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा पुरुषांच्या तुलनेत स्त्री शिक्षिकेची भूमिका प्रामाणिकपणे पार पाडते. इतर कामे आणि करिअर हे असतानाही ती मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष देते. याऊट पुरुष मात्र केवळ करिअरकडेच लक्ष देतो. असे असतानाही कुटुंबामध्ये तिला दुय्यम स्थान असते.

शिक्षण क्षेत्रात राजकारण्यांचे प्राबल्य दिसून येते. त्यामुळे शिक्षणापेक्षा इतर गाष्टींचे वर्चस्व वाढलेले आहे आणि ते शिक्षणालाच नख लावत आहेत. खाबूगिरी इतकी वाढली आहे की प्रामाणिक असलेली स्त्री तिथे टिकू शकत नाही किंवा संबंधितांना अडचणीचे ठरते. त्यामुळे तिथेही तिला दुय्यमत्वाला सामोरं जावं लागत.

विद्यार्थ्यावर योग्य संस्कार झाले तरच आजच्या अनीतीशून्य आणि हिंसक परिस्थितीवर मात करता येईल असे आपण बोलतो. प्रत्यक्षात मात्र शिक्षणक्षेत्रातहीअनीतीचेच वातावरण दिसून येते. मद्यपान करणाऱ्या पुरुष प्राध्यापकाचे महत्व स्त्रीप्राध्यापकाच्या तुलनेत जास्त आहे. प्रत्येक ठिकाणी विद्वत्ता व गुणवत्ता असतानाही स्त्रीला शिक्षणक्षेत्रात डावलंल जातं. याविषयीची तळमळ या लेखात जाणवते.

## २. स्त्रीला अंत्यष्टीचे अधिकार असावेत?

स्त्रीला इतर सर्व अधिकारांप्रमाणेच अंत्येष्ठीचे अधिकार असावेत हा वादाचा विषय नाही. इथे पुरुषांना तो मिळतो स्त्रीला तो मिळत नाही. म्हणून कुठे खंतही नाही. दुय्यमत्वाचा तर प्रश्नच नाही. या लेखात प्रतिमा इंगोले एक वेगळी समस्या मांडताना दिसतात. समाजामध्ये स्त्रीला अंत्यसंस्कार करण्याचे अधिकार अमान्य आहेत. अशावेळी एखाद्या निपुत्रिक पित्याच्या कन्येवर इतरांची मनधरणी करण्याची वेळ येते. मनधरणी करण्याची ती वेळ नसते. अशावेळी प्रश्न निर्माण होतो. अशा व्यक्तीचे अंत्यसंस्कार कोणी करावेत?

लेखिकेचे आजोबा पुरोगामी विचाराचे होते. त्यांना पुत्र नव्हता. तेव्हा त्यांनी लेखिकेच्या आईला सांगून ठेवले होते, 'माझे क्रियाकर्म करु नको, मला यांत्रिक वाहनातून न्या'. आजोबांच्या निधनानंतर लेखिका आईला म्हणते, "आई! तूच अग्निसंस्कार कर ना!" तेव्हा आई म्हणते, "मुलीला कोठे असले अधिकार असतात?"आईच्या या प्रश्नावर लेखिका चिंतन करते. खेडयात वैचारिक क्रांती होण्याला वाव नव्हता. पण लेखिकेच्या आजोबांच्या निधनानंतर तीनच महिन्यात नागपूरात महादेवराव गणपतराव जौजाळ ह्यांना त्यांच्या पंचकन्यांनी अंत्यसंस्कार केल्याची घटना घडते. या घटनेने समाजात त्यांचे कौतुक होते. चार–दोन पेपरात बातमी झळकते. महाराष्ट्रात इतरत्र घटनेचे पडसादही उमटले नाहीत.

कदाचित पूर्वीच्या काळी स्त्री सती जात होती. तेव्हा तिच्या किंकाळ्या इतर स्त्रियांनी ऐकू नयेत म्हणून त्यांना ही बंदी घालण्यात आली असावी आणि अंत्यसंस्काराचे सारे अधिकार मुलांनाच असतात असा अपसमज समाजात दृढमूल केला असावा असे प्रतिमा इंगोले यांना वाटते. स्त्रीलाही अंत्येष्टीचे अधिकार असावेत. धर्मशास्त्राने स्त्री–पुरुषांना अंत्येष्टी व श्राध्दादिकांचे अधिकार दिलेले आहेत. तसे पुरावेही धर्मग्रंथात आढळतात.

## ३. न्यायालयातील स्त्रीचे दुय्यमस्थान

न्यायसंस्था ही तशी सर्वोच संस्था आहे. अन्याय झाला तर न्याय मागण्याचा प्रत्येकालाच हक्क आहे. त्यामुळे न्यायालयात तरी सर्वांना समान न्याय मिळायला हवा. आज न्यायालयाचा व न्याय–अन्यायाचा विचार केला तर भ्रष्टाचाराने इथेही आपली पाळेमुळे रोवली आहेत. त्याबद्दल आज न बोललेलेच बरे. पण किमान लोकशाही राज्यात न्यायाच्या क्षेत्रात सर्वांना नि:पक्षपातीपणे वागणूक मिळायलाच हवी असे लेखिका म्हणते. 'शहाण्या माणसाने कोर्टाची पायरी चढू नये' असे म्हणतात. कारण माणसे वकील होतात ते न्याय मिळवून देण्यासाठी नाही तर पैसे मिळविण्यासाठी. जेव्हा दोघात भांडणे होतात आणि तिसरा मनुष्य निकाल देतो. तो खराच असतो. काय? असे कोणी सांगेल काय? खरा कोण हे दोघे पक्षाकारच जाणतात. आपण भोळसटपणे मानतो की तिसरा मनुष्य पैसे घेऊन न्याय देईल.

आज कायद्याने स्त्रीला हक्क मिळाले आहेत. नवऱ्याच्या मालमत्तेवर हक्क सांगण्याचा अधिकार तिला मिळाला. पण मालमत्तेसाठी कोर्टात जाताना दिसत नाही. याउलट नवऱ्याच्या विरुध्द घटस्फोट, फारकत, पोटगी मागणाऱ्या किंवा नवऱ्याने दुसरा विवाह केला म्हणून न्यायालयाची पायरी चढणाऱ्या स्त्रिया दिसून येतात. या सगळया समस्यावरुन समाजातील पुरुषांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन आजही बदलला नसल्याचे जाणवते.

न्यायालयात न्याय मागण्यासाठी गेलेल्या स्त्रीशी बहुतांश वेळा असभ्य वर्तन केले जाते. घटस्फोट, बलात्कार यासारख्या केसमध्ये विरुध्द बाजूचे वकील त्या स्त्रीला नको ते प्रश्न विचारुन बेजार करतात पण खुद्द न्यायाधीशही बरेचदा तिच्या नवऱ्याच्या वर्तुणुकीचे समर्थन करताना दिसतात."नवरा मारतोय ना! मग काय झाले? आम्हीही आमच्या बायकोला मारतो. मग ती कुठे घटस्फोट मागायला येते?"अशा भाषेत तिची टिंगल केली जाते. न्यायालयात येणाऱ्या 'स्त्रीलाच बदफैली' ठरवतात. अनैतिक संबंधाच्या बाबतीत स्त्री जेंव्हा 'नवऱ्याबद्दल तशी

तक्रार करते तेव्हा वकिलांकडून बरेचदा अष्लील प्रश्न विचारले जातात. लेखिका चप्पलमार प्रकरणाबद्दल सांगते. त्या प्रकरणामध्ये आपल्या बहिणीच्यासाठी साक्ष देण्यासाठी कोर्टात आलेल्या तरुणीला एकांतात बोलावून संबंधीत वकिलाने तिला स्पष्टपणे 'तू रात्री माझ्या घरी ये. मी तुला काही कमी पडू देणार नाही' अशी मागणी केली व अश्लील इशारेही केले. त्यावर चिडून जाऊन त्या तरुणीने त्या वकिलाच्या श्रीमुखात भडकावली. त्याचे पर्यावसन उलट ह्या तरुणीचे वकीलपत्र कोणीही न घेण्यात झाले. सर्व प्रसारमाध्यमांमार्फत त्या स्त्रीलाच दोषी ठरविण्यात आले. न्यायालयाचाअवमान झाला. असा कांगावा केला होता. वरील प्रसंगात न्यायालयातही स्त्रीकडे बघण्याचा दृष्टिकोण बदललेला नाही हे स्पष्ट होते.

## ४. स्त्रीच्या पोशाखाविषयी समाजाचे मत

'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?' या ग्रंथात प्रतिमा इंगोले स्त्रियांच्या पोशाखाबद्दल चिंतन करतात. स्त्री शिक्षित झाली तरी जाणीवपूर्वक व विचारपूर्वक पोशाख स्वीकारताना दिसत नाहीत. बरेचदा चित्रपटातल्या नट्यंच्या पोशाखांचे अनुकरण करण्याकडे स्त्रियांचा कल असतो आणि बरेचदा तो घातकही ठरतो असे लेखिकेला वाटते. बलात्कारासारख्या वाढत्या प्रवृत्तीला स्त्री व स्त्रीचे पोशाखच कारणीभूत आहे असे सर्रास बोलण्यात येते. पण त्याचे मूळ पुरुशी नजरेत दडले आहे. हे मात्र समाज विसरला आहे.

स्त्रीच्या पोशाखासंबंधी प्रतिमा इंगोले म्हणतात, "स्त्रीने स्वत:च्या व्यक्तिमत्वाशी सुसंगत असा पोशाख स्वीकारला तर इतर स्त्रियांनी त्यावर आक्षेप घेऊ नये." समाजाबरोबर त्या स्त्रियांनीही समजावून सांगतात. एका स्त्रीने दुसऱ्या स्त्रीच्या पोशाखाबद्दल हिणवू नये. स्त्रियामध्येच जर एकजूट झाली तर सर्वच स्त्रियांचा दृष्टिकोण तर सुधारेलच पण त्याचबरोबर स्त्रीत्वाची जाणीवही उजळून निघेल. अशी आशा लेखिकेला वाटते.

## ५. "बँडिट क्वीन"—फूलनदेवीचे बंड

"बँडिट क्वीन"हा चित्रपट एका स्त्रीवरील अत्याचाराचे चित्रण करणारा चित्रपट. पण या चित्रपटावर बंदी आली आणि प्रतिमा इंगोले यांच्यातली अन्याविरुध्द पेटून उटणारी स्त्री जागृत झाली. "बँडिट क्वीन"मधील विदारक सत्य तर कडू जहर आहे. शिवाय ते पुरुषप्रधान संस्कृतीची देण आहे. मग त्यावर बंदी येणारच. कारण फूलनदेवीने अत्याचाराला प्रतिउत्तर म्हणून राक्षसीवृत्तीच्या माणसांना मारले आहे. मग तिला डाकू न म्हणता देवी म्हणायला हवे आणि प्रत्येक स्त्रीने आपल्यावरील अन्याय—अत्याचाराविरुध्द आवाज उठवायलाच हवेत. फूलनदेवीचे बंड पाहण्याचा अधिकार समस्त स्त्रीवर्गाला आहे. मात्र त्यावर बंदी घातल्याने त्यांना खंत वाटते. कारणस्त्रीअत्याचाराचे भेदक चित्रण या चित्रपटामध्ये केले आहे. तिने जे भोगले ते प्रत्यक्ष त्या गावातील नागरिकांव्यतिरिक्त कोणी पाहू शकले नाही. पण आज ह्य चित्रपटामुळे तो मार्ग सर्व स्त्रीवर्गासाठी खुला झाला आहे. फूलन काय? हे स्त्रीवर्गाला समजायलाच हवे, तो पाहण्याचा हक्क समस्त स्त्रीवर्गाचा आहे. कारण अशा कितीतरी फूलन समाजात आज अन्याय—अत्याचार निमूटपणे सहन करीत आहेत. काही स्त्रिया अन्याय मुकपणे सहन करतात. कारण समाजात आपली बदनामी होईल अशी भिती त्यांना वाटते. त्यामुळे स्त्री अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अशा स्त्रियांचा प्रातिनिधीक आवाज "बँडिट क्वीन"मधून चित्रित केला आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून एक भयानक सत्य बाहेर आले आहे. पण ते जाणीवपूर्वक नाकारले जात आहे. तेव्हा स्त्रियांनी आवाज उठवून चित्रपटावरील बंदी हटवावी असे प्रतिपादन प्रतिमा इंगोले करतात.

समाजातील पुरुषप्रधान व्यवस्थेच्या प्रवक्त्यांना खरे तर फूलनचे बंड पटलेले नसते. कारण ती एक भोगदासी! ती हलक्या जातीची आहे. हलक्या जातीतील स्त्री उच्चवर्णीयांची भोगवस्तू ठरत असते. तसा इतिहास आहे. पण तो शिकवला जात नाही. पण सत्य आहे. त्यामुळे फूलनचा बंड पाहून इतर स्त्रियां बंड करतील, मग उपभोगत्यांचा हक्क हिरावला जाईल. हा बंड कोणालाच नको असतो. प्रतिमा इंगोले शेवटी प्रश्न निर्माण करतात. सती सावित्रीचे व पतिव्रता सीतेचे चित्रपट स्त्रिया किती दिवस पाहणार? आणि तुम्ही तिला"थांब लक्ष्मी कुंकू लावते"किंवा "माहेरची साडी"सारखे चित्रपट किती दिवस दाखवणार? आणि कशासाठी? तुमच्या संस्कृतीच्या कल्पना तिच्यावर लादल्या जाव्यात म्हणून? पण तिने काय पाहावे हे ठरविणारे तुम्ही कोण? असा प्रश्न प्रतिमा इंगोले विचारतात.

## ६. विद्यार्थिनींच्या हत्या– एक भयानक समस्या

आजच्या युगात शालेय विद्यार्थिनीच्या हत्येचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे मुलींचे शिक्षण धोक्यात आले आहे. म्हणूनच समाजात घडणाऱ्या ह्या घटनांकडे एक सामाजीक समस्या म्हणून बघायला हवे. किमान आता तरी सावध व्हायला हवे. दाताळ्याच्या भारती पाटील या बारावीच्या वर्गातील मुलीची भरवर्गात तिच्याच वर्गातील प्रेमवीराने अमानुष हत्या केली. ह्याआधी उल्हासनगरची रिंकू पाटील शाळेच्या आवारातच जाळली गेली. तेव्हा संपूर्ण महाराष्ट्रभर त्या हत्येचे पडसाद उमटले गेले. सामाजिक संघटना, स्त्री संघटना सर्वांनी त्या घटनेचा निषेध केला. मात्र रिंकू पाटीलला न्याय मिळाला नाही. जळगावची मनिषा पाटील आणि अमळनेरची वैशाली पाटील अशाच बळी गेल्यात. या बळी गेलेल्या उमलत्या आयुष्याची भरपाई कोण करुन देणार? किमान यानंतर अशी घटना घडू नये याचा तरी विचार करायला पाहिजे असे प्रतिमा इंगोले म्हणतात. संपूर्ण समाजव्यवस्थेचाच नव्यानेविचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. सामाजिक कर्तव्ये, कौटुंबिक कर्तव्ये, पाळायलाच हवीत. तशी जाण तरुणांमध्ये निर्माण व्हायलाच हवीत. इथे कुटुंब ह्याशब्दाचा अर्थ व्यापक आहे. संपूर्ण गाव एक कुटुंब किंवा संपूर्ण शाळा एक कुटुंब असे आज घडणे शक्य नाही. पण काही नीतिमत्ता तर हवीच ना! किमान प्रेम शब्दाचा खरा अर्थ तर कळायलाच हवा ना! आता शिक्षकच भौतिक सुखाच्या मागे धावणारा असेल तर तो विद्यार्थ्यांना नैतिक कर्तव्ये कशी शिकवणार? म्हणूनच विद्यार्थिनींच्या हत्येने शिक्षण क्षेत्रच धोक्यात आले आहे. त्याचा पुनर्विचार होणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील मुलींचे शिक्षण तर नक्कीच ढळमळीत झाले आहे.

## ७. स्त्रीचा राजकारणातील सहभाग

स्त्रीमध्ये राज्यकारभार उत्तमरित्या करण्याची उपजतच शक्ती आहे. पण आजच्या भ्रष्ट राजकारणातील मंडळींनी इतर सोकावलेल्या मुरब्बी लोकांना ही शक्तीच अडचणीची वाटते आहे. प्राचीन भारताच्या इतिहास पाहिला तर भारतात गणराज्ये होती. त्यावेळी मातृसत्ताक पध्दती असल्यामुळे ह्या गणराज्यांचे अधिपत्य स्त्रीकडेच होते. आपल्याला आज ज्या देवी म्हणून ज्ञात आहेत. त्या दुर्गा, काली, सरस्वती, लक्ष्मी, ह्यापूर्वी गणराण्याच होत्या. पण आर्य भारतात आले आणि भारतात पुरुष प्रधान संस्कृती रुजू लागली. हळूहळू मातृसत्ताक पध्दतीचा ऱ्हास होऊ लागला. राजकीय क्षेत्रातून तर स्त्री हद्दपारच झाली. बंदिस्त असे जीवन स्त्री जगू लागली. पुढे समाजकारण आणि ज्ञानापासून तिला वंचित ठेवण्यात आले.

"जाचू नको राया
तुमच्या पायाची मी दासी
राहीन उपासी
पन घास घलीन उपाशी"

असे म्हणत पुरुषांची दासी बनण्यातच स्व:ताला धन्य मानू लागली. पण काही अपवादात्मक कर्तृत्वान स्त्रियांनी या बंदिस्ततेच्या काळातही राजकीय क्षेत्रात आपला ठसा उमठविला आहे. कुंती, कैकयी, द्रौपदी ह्या रामायण, महाभारतातील स्त्रिया सर्वज्ञात आहेतच. यानंतरच्या काळात राजकीय क्षेत्रात सक्रिय असणाऱ्या व इतिहास घडविणाऱ्या राजकीय स्त्रियां म्हणजे जिजामाता, झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर व इंदिरा गांधी इ. आहेत.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र राजकारणातील स्त्रियांच्या प्रामाणात फारशी वाढझाल्याचे दिसत नाही. स्त्री–पुरुष समानता या कायद्याप्रमाणे काही स्त्रियां राजकारणात आल्या पण त्या केवळ नावापुरत्याच, कागदांची पूर्ती इथपर्यंत तिचे अस्तित्व राजकारणात दिसते. बाकी व्यवहार पाहण्याचे काम त्या स्त्रियांचे पतिदेव, वडील व भाऊ यापैकी कोणी तरी करते. बहुतेकवेळा तिचे मत घेण्याऐवजी तिला गृहीत धरले जाते. अर्थातच राजकारणामध्येही तिच्या मतांचा कोणी विचार करीत नाही. तिचे मत विचार गृहीत धरुनच कारभार केला जातो. स्त्री स्वभावत:च प्रामाणिक असते, त्यामुळे काही निर्णय तिच्या परस्पर तिचा पती किंवा घरातील इतर पुरुषवर्ग घेतात. त्यामुळे स्त्री राज्यकर्ती असली तरी स्त्रीविषयक समस्यावर विचार व प्रगती होताना दिसत नाही. एकंदरीतच राजकारणातील स्त्रीचे स्थान काय? या प्रश्नाचे उत्तर 'दुय्यमच' हे समजते.

प्रतिमा इंगोले स्त्रियांना आव्हान करतात की, स्त्रियांनी आता खंबीर व्हायला हवे. इतर स्त्रीसंघटनांनी तशी जागृती करायला हवी. तिला तिच्या प्राप्त अधिकारांची व कर्तव्याची जाणीव असेल तर स्त्रीचा राजकारणातील सहभाग चमत्कार करु शकतो. विषेश म्हणजे तिने निर्णयप्रक्रियेत सहभागी व्हायला हवे. तरच तिच्या स्त्रीत्वाचे व राजकारणातील सहभागाचे सार्थक होऊ शकते.

स्त्रीच्या राजकारणातील सहभागामुळे केवळ स्त्रीची स्थितीच बदलेल असे नाही, तर भष्ट राजकारणाच्या क्षेत्रातही नवे बदल घडून येतील. स्त्री दुसऱ्यांच्या समस्येकडे सहिष्णूपणे पाहू शकते. दुसऱ्यांच्या भावना जाणू शकते. भ्रष्टाचाराच्या बाबतीत स्त्रीचा सहभाग अनुकूल परिणाम दाखवू शकतो.स्त्री सत्तेमुळे स्त्रियांचे प्रश्न सुटतील अशी आशा प्रतिमा इंगोले यांना आहे. कारण स्त्री समस्येची दाहकता स्वत: स्त्रीने अनुभवलेली असते. त्या म्हणतात, स्त्री शिक्षणमंत्री झाली तर आदिवासी भागात असणारी महिलांची, मुलींची वसतीगृहे तर सुरक्षित राहू शकतील, वेश्यागृहांसारखा ह्यांचा वापर करण्याचा पायंडा नक्कीच बंद पडू शकतो. स्त्री आरोग्यमंत्री झाली तर गर्भारपणात व नंतर बालकामध्ये प्रामुख्याने असणारा कुपोषणाचा प्रश्न सुटू शकतो. कारण ह्या सर्वांकडे पाहण्याची पुरुषांची दृष्टी आणि स्त्रीची दृष्टी ह्यात फरक आहे. स्त्रीचा तो स्वभाव आहे. त्यामुळे त्याचा फायदा नक्कीच होऊ शकतो. स्त्री कायदेमंत्री झाली तर द्विभार्या प्रतिबंधक कायदा नक्कीच कडक करेल अथवा खापटी मिळण्याच्या मार्गात ज्या अडचणी सध्या आहेत, त्या दूर होऊ शकतील. स्त्री अर्थमंत्री झाली तर अधिक महिला उद्योजक नक्कीच तयार होतील. एवढं सगळं होण्यासाठी देशातील समस्त स्त्रियांनी भानावर यायला हवे असे लेखिकेला वाटते.

'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?' हा प्रतिमा इंगोले याचा दुसरा वैचारिक लेखसंग्रह आहे. या ग्रंथात लेखिकेने स्त्रियांच्या समाजातील स्थानाविषयी चिंतन केले आहे. जातीव्यवस्था आणि स्त्रीदास्य ह्या गोष्टी समाजात रुढझाल्या आहेत. त्यातून सुटण्यासाठी स्त्रीशिक्षण हाच एकमेव पर्याय आहे असे लेखिकेला वाटते. स्वातंत्र्योत्तर काळात कायद्याने स्त्रीला समानता मिळाली. तरी घरादारात स्त्रीला समान दर्जा मिळू शकला नाही. निर्णयप्रक्रिया, मालमत्तेतील वाटा, समाजातील तिचा दर्जा व दृष्टिकोन, राजकारण, इ. सर्वच ठिकाणी आपल्या क्षमता सिध्द करुनही तिला समाजात दुय्यमच स्थान मिळते. समाजात वावरताना लेखिकेला हे प्रकर्षाने जाणवत राहते. मनात प्रश्नांचे थैमान उठते, त्याचेच लिखित रुप म्हणजे, 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच?' ह्या पुस्तकातील लेख असावेत.

## निष्कर्ष

१. प्रतिमा इंगोले यांच्या वैचारिक वाङ्मयांचा विषय प्रामुख्याने 'ग्रामीण स्त्री' आहे.
२. प्रतिमा इंगोले यांनी वैचारिक लेखनामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, स्त्रीविषयक विचारांचे चिंतन केले आहे. सर्वच ठिकाणी स्त्रीचे दुय्यमत्व तीव्रतेने जाणवते.
३. स्त्रीजीवन, विविध स्तरांचे प्रश्न, समस्या, अडचणी सदर लेखनातून स्पष्ट होतात. स्त्रियांची कोंडी स्त्रीवरील अन्याय, पुरुषकेंद्री कुटुंबव्यवस्थेतील स्त्रियांची घुसमट, कायदे होऊनही परंपरेमध्ये अडणारी मनोरचना असल्याने फारसा फरक न पडणारे प्रत्यक्ष जीवन स्पष्ट होते.

## संदर्भग्रंथ

१. 'आजही स्त्रीचे स्थान दुय्यमच'—प्रतिमा इंगोले, लेखिका पुस्तक प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, मार्च २००९.
२. 'मराठी लेखिका: चिंता आणि चिंतन', भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, प्रथमावृती, मार्च १९८०.
३. 'स्त्रीविकासाचे नवे क्षितिज', प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती, मार्च २००८.

❖❖❖

# समकालीन मराठी कादंबरीकार

**डॉ. लिंगप्पा गुळाळे**
**संशोधक विद्यार्थी**
एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, पुणे
**मेल-** lingappagulale01@gmail.com **चलभाष - ८७९३५५१०७३**

**प्रस्तावना :**

१९९० नंतरची मराठी कादंबरी अनेकार्थाने परंपरा आणि नवतेच्या नव्या सीमारेषा आखताना दिसते. प्रस्तुत शोधनिबंधात याचाच आलेख मांडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठीतील गेल्या वीस वर्षातउल्लेखनीय लेखन करणाऱ्या कादंबरीकारांचा समावेश केला आहे. १९९० पासून पुढील काळात प्रकाशित झालेली मराठी कादंबरी या शोधनिबंधाचा केंद्रिभूत विषय असणार आहे. १९९० नंतर एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात अमूलाग्र बदल झाले, त्यामुळे सर्वच स्तरातील मानवी जीवन बदलू लागले. हे सर्व बारकाईने टिपण्याचे, त्याची चिकित्सा करण्याचे अतिशय महत्त्वाचे कार्य या काळातील कादंबरी करताना दिसते. या काळातील कादंबरीकारांचे सामाजिक अवधान व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांची कादंबरी दर्शवते. भालचंद्र नेमाडे,रावसाहेब रंगनाथ बोराडे, आनंद पाटील, किशोर सानप,बाबाराव मुसळे, विश्वास पाटील,श्याम मनोहर,रंगनाथ पठारे, राजन गवस,त्रं. वि. सरदेशमुख,नामदेव कांबळे,शरण कुमार लिंबाळे, सदानंद देशमुख, मिलिंद बोकील, नंदा खरे, शेषेराव मोहिते, कृष्णात खोत,प्रवीण बांदेकर याशिवायबालाजी मदन इंगळे, रमेश इंगळे उत्रादकर, किरण गुरव, आनंद विंगकर,रवींद्र पांढरे, भारत काळे, जी. के. ऐनापुरे, अनिल दामले, मकरंद साठे, सुरेंद्र पाटील, शंकर सखाराम, अशोक कौतिक कोळी, गणेश आवटे, प्रकाश देशपांडे केजकर, संजय भास्कर जोशी, महेंद्र कदम, बाळासाहेब लबडे, रावजी राठोड, कैलास दौंड, अवधूत डोंगरे, नवनाथ गोरे यांचा येथे उल्लेख येथे समकालीन कादंबरीकार म्हणून करावा लागेल.परंतु १९९० ते २०२० ह्याच काळात उल्लेखनीय आणि मौलिक म्हणून चर्चिल्या गेलेल्या मोजक्याचं कादंबरीचा उहापोह येथे करणार आहे.

## १. सुरुवातीच्या काळातील मराठी कादंबरी :

आंग्ल आणि भारतीय या दोन भिन्न प्रकारच्या संस्कृती एकत्र आल्या, तेव्हा त्यांच्या संयोगाचे स्वरूप अनेक सामाजिक क्षेत्रात प्रतिबिंबित झालेले स्पष्टपणे दिसून येते. हा योग भाषा, साहित्य आणि शैली ह्या समाजाच्या अभिव्यक्तीप्रधान क्षेत्रांमध्ये अत्यंत प्रामाणिकपणे व्यक्त झालेला दिसतो.[१]स्वतंत्र मराठी कादंबरीच्या वाटचालीमध्ये ह्याचे स्पष्ट प्रतिबिंब पडलेले दिसते. पण म्हणून मराठी कादंबरी पूर्णत: इंग्रजी साहित्याच्या सावटाखाली आजही वावरत आहे, हे विधान बरोबर ठरणार नाही. हरिभाऊ आपटे यांच्यापासूनच ती नवी वाट शोधताना दिसते. १९२० नंतर खांडेकर, केतकर, दिघे, बेडेकर, मर्ढेकर, माडगूळकर, पेंडसे, दांडेकर, यादव अशी समृद्ध देशीयतेकडे झुकणारी परंपरा मराठीत निर्माण झाली. १९६० नंतर मराठीत विशेषत्वाने उदय पावलेले साहित्य मराठीतील वास्तववादाचा एक नवा आविष्कार म्हणता येईल. माडगूळकरांपासून ते यादवांपर्यंत निवडक साहित्यिकांच्या कलाकृतींतून ग्रामीण साहित्याचे भक्कम रूप नजरेपुढे आले.[२]

## २. १९९० नंतरची मराठी कादंबरी :

१९९० ते २०२० या काळात नेमाडे, पठारे, श्याम मनोहर, विश्वास पाटील, राजन गवस,शरण कुमार लिंबाळे या १९९० पूर्वी पासून लिहिणाऱ्या लेखकांचा प्रभावही राहिला. त्याचबरोबर नव्याने लिहू

लागलेल्या कादंबरीकारांचे योगदान मौलिकच म्हणावे लागते. यात सदानंद देशमुख, मिलिंद बोकील, नंदा खरे, शेषेराव मोहिते, कृष्णात खोत, प्रवीण बांदेकर याशिवाय बालाजी मदन इंगळे, रमेश इंगळे उत्रादकर, किरण गुरव, आनंद विंगकर, रवींद्र पांढरे, भारत काळे, जी. के. ऐनापुरे, अनिल दामले, मकरंद साठे, सुरेंद्र पाटील, शंकर सखाराम, अशोक कौतिक कोळी, गणेश आवटे, प्रकाश देशपांडे केजकर, संजय भास्कर जोशी, महेंद्र कदम, बाळासाहेब लबडे, रावजी राठोड, कैलास दौंड, अवधूत डोंगरे, नवनाथ गोरे यांचा नामोल्लेख करावा लागेल.

## ३. भालचंद्र नेमाडे :

भालचंद्र नेमाडे यांची 'हिंदू; जगण्याची समृद्ध अडगळ' (२०१०) ही कादंबरी नेमाडे याना मिळालेल्या ज्ञानपीठ पुरस्कारामुळे समीक्षकांच्या चर्चेचा अभ्यासाचा विषय राहिली. 'हिंदू..' चे शीर्षक, संकल्पना याविषयी भालचंद्र नेमाडे यांची एक भूमिका आहे.[३] अफगाणिस्तानापासून ते ब्राम्हदेशापर्यंत पसरलेल्या भूमीविषयी, संस्कृतीविषयी नेमाडे काही विधान करू इच्छितात. 'हिंदु...'त त्यानी ते केले आहे.ही कादंबरी अफाट कालावकाश उभा करतेच तसे कुटूंब आणि त्यातील लहान मोठ्या ह्रदयद्रावक प्रसंगाचे भानही व्यक्त करते.आडावर बायडी खाली मान घालून कपडे धुता धुता मुळू मुळू रडत होती आणि चिंधू आत्या आईच्याकणवेने, कुणाला ऐकू येणार नाही अशी तिची समजूतघालीत होती: "असू दे असू दे सहन करावं बायडे सहन करण्यात बाईचा मोठेपणा असतो"[४] चिंधू आत्या, बायडी यांच्या निमित्ताने आलेले कादंबरीतील चिंतन स्त्रीयांविषयीच्या अपार करुणेने भारलेले आहे. मोठा लेखक सर्वच स्तरातील माणसांचे दुख मुखर करीत असतो हे त्याचेच उदाहरण आहे. "पुरुषलोक काही टक्के तरी, दारुडे, खुनी, लुटारू, लबाड, भोंदू असतातच, त्यातले काही आपल्या घरातल्या मुलीच्या नशिबी नवरे म्हणून येण्याचा संभव थोडा तरी असतो. हा अंधार आपल्या घरातल्या ह्या पोरींच्या नशिबात आला. याला काय मार्ग असणार? खंडेराव, खर शहाणपण असे प्रश्न सोडववण्यात असते, ते पुस्तकी संशोधन करण्यात नाही"[५] कादंबरीत असे असंख्य प्रसंग आलेले आहेत. भालचंद्र नेमाडे हे मराठीतील जुने आणि मोठे कादंबरीकार आहेत. त्यांची 'कोसला' (१९६३) साली प्रकाशित झाली होती. आजही ते हिंदू च्या निमित्ताने आपली लोकप्रियता टिकवून आहेत.

## ४. विश्वास पाटील :

मराठी साहित्य विश्वात विश्वास पाटील सामान्य रसिक वाचकाच्या चर्चेत आले ते 'पानिपत'च्याच निमित्ताने. 'पांगिरा' (१९९०) ही कादंबरी गावाच्या पांढर्या मातीच्या, तेथील राजकारणाच्या, निसर्गाच्या कथा सांगणारी आहे. 'झाडाझडती' (१९९१) हे त्यांचे मौलिक लेखन आहे. गाव आणि देव पाठीवर घेऊन निघालेल्या सामान्य जनालोकांची ही व्यथा आहे. धारण झाले पण विकास कुणाचा झाला. धरणामुळे ज्या लोकांनी आपले घर दारे शेत मळे धरणाच्या घश्यात घातली त्यांच्या वाताहातीचा प्रश घेऊन ही कादंबरी येते.

## ५. श्याम मनोहर :

श्याम मनोहर याच काळत लेखन करत आहेत. 'खूप लोक आहेत' (२००२) ही त्यांची कादंबरी लेखनासंबंधी, ललित लेखनासंबंधी, त्याच्या घाटासंबंधी, ह्याच्या निर्मितीच्या प्रश्नासंबंधी, त्या निर्मितीच्या तदफडीसंबंधीची आहे. एवढं कथानक भाषा फिक्शन लेखकाची प्रायोगिकता पाहता एवढे मौलिक लेखन मी मराठीत दुसरे वाचलेले नाही.[६] त्यांच्या 'उत्सुकते मी झोपलो' (२००६) कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार (२००८) लाभला आहे.कुटूंब व्यवस्था आणि माणसे, त्यांचे जगणे यावरती श्याम मनोहर यांनी

कादंबरीच्या माध्यमातून 'क्ष' किरण टाकला आहे. कादंबरी वरील प्रभा गणोरकर यांचा अभिप्राय पहिला तरी श्याम मनोहरांच्या साहित्य अकादमी प्राप्त कादंबरीची वैशिष्टे ध्यानी येतील. पाहा "...श्याम मनोहरांनी या कादंबरीत मध्यमवर्गीय कुटूंब व्यवस्थेचे जणू सूक्ष्मदर्शीयंत्रातूननिरीक्षण केले आहे. कुटूंब व्यवस्थेचे अवमूल्यन न करता, तिच्या मर्यादा आणि संवेदनक्षम ज्ञानाची आसअसेल्या माणसांची या व्यवस्थेत जगतानाची तगमग त्यानी अत्यंत तरलपणे व्यक्त केली आहे."[७] श्याम मनोहर आपल्या लेखानाकरीता मध्यमवर्गीय जीवनचित्रण निवडत असले तरी ती त्यांच्या लेखानाची मर्यादा ठरत नाही. त्या जीवनाची गुंतागुंत, प्रश्न,तसेच भूतकाळ, वर्तमानकाळ, भविष्यकाळ यांचा वेध ते घेताना दिसतात. व्यक्ती, तिची स्वतन्त्रता, नैतिक, अनैतिक, अध्यात्म, धर्म, कुटूंब हेत्यांच्या आस्थेचे विषय आहेत. "जागतिकीकरणाच्या आणि आर्थिक उदारीकरणाच्या या काळातव्यक्तीचा भुगा होतो आहे. माध्यमांनी व्यक्ती व्यक्ती मधला भेद कमी करून अस्मितेची उभारणी अशक्य केली आहे. या विविध तणावाखाली व्यक्तीचे कसे विघटन घडते आहेयाचे चित्रण मराठी कादंबरी करू लागली आहे. विघटनाच्या या प्रक्रियेमध्ये व्यक्तीचे आयुष्य, अस्तित्व जसे धोक्यात येत आहे, तसेच समाज सदस्याना परस्परांशी जोडणाऱ्या, अर्थपूर्ण आयुष्य शक्य करणाऱ्या समाजाची संकल्पना धोक्यात येऊ लागली आहे. ही समग्र नासाडी व अर्थशून्यता स्पष्ट करू पाहणाऱ्या कादंबऱ्या श्याम मनोहर, रंगनाथ पठारे, अनिल दामले, मकरंद साठे, जी. के. ऐनापुरे यांसारख्या लेखकांनी अलीकडच्या काळात लिहिल्या आहेत."[८]

## ६. रंगनाथ पठारे :

रंगनाथ पठारे यांच्या तीन उल्लेखनीय कादंबऱ्या या काळात आल्या. 'कुंठेचा लोलक' (२००६), 'चोषक फलोद्यान' (२०१४),आणि 'सातपाटील कुलवृत्तांत' (२०१९). "चोषक फलोद्यान' (२०१४) ही त्यांची कादंबरी एक भव्य कथापट घेऊन येते. विश्वातील शोषणाची प्रक्रिया ही कादंबरी सांगते. या फलोद्यानात दादा नावाचा निवेदक गोष्ट सांगत फिरतो...माणसांचे व्यक्तीगत वर्तन, सामूहिक वर्तन यातील संबंध आणि संघर्षत्यांच्या कादंबऱ्याचे विशेष होत."[९]सातपाटील कुलवृत्तांत ही त्यांची ७०० वर्षांचा पट उलगडू पाहणारी कादंबरी आहे.याकादंबरीची सुरूवात अल्लाऊद्दिन खिलजीने पैठणवर केलेल्या आक्रमणापासून सुरू होते. इथून पठारे इतिहासाचा शोध घेत मलिक अहमद निजाम, पानिपतचे युद्ध, दुसराबाजीराव, इस्ट इंडिया कंपनी ते थेट एकविसावे शतक असा काल मांडत जातात.

## ७. राजन गवस :

राजन गवस हे या काळातील कादंबरीकार आहेत. त्याची 'ब' बळीचा (२०१२) साली प्रकाशित झाली. 'ब' बळीचा (२०१२)कादंबरीत विठ्ठलाच्या मंदिरातील कीर्तनात बुवाम्हणतात,"विठ्ठलाआधीशेतकरी होता. विठ्ठलानंतर शेतकरी होता. राजा नव्हता तेव्हा शेतकरी होता. राजा आला तेव्हा शेतकरी होता. माय बाप हो.. शेतकऱ्यानं विठ्ठल केला. शेतकऱ्यानं राजा केला."[१०] कादंबरीच्या शीर्षकावरूनही शेतकऱ्याविषयीच लेखक बोलणार आहे, हे लक्षात येते. "विध्वंसित होण्याच्या मार्गावरील कृषिजन संस्कृती, नातेसंबंधांची पडझड कुटूम्बांचे विघटन समाजजीवनातील मूल्यऱ्हास, या मूल्यातून जन्माला आलेल्या विध्वंसक प्रवृत्ती, सबंध व्यवस्थेत जीरपलेला भ्रष्टाचार, राजकारण्यांची कोतीवृत्ती, त्यांची अशिष्ट वर्तने, पर्यावरणाचा ऱ्हास, सुधारणेच्या नावाखाली खेड्यांना आलेली सूज, शेतकरी स्त्रियांची परिस्थितीशी चाललेली झुंज, त्यांची सोशिकता अशी आशयद्रव्याच्या बहुकेंद्री प्रसारणाला एकाचवेळी भिडण्याचा लेखकाचा वकूब या कादंबरीत पाहायला मिळतो."[११] १९९० नंतच्या काळात गावखेड्यातील शेतकरी अधिकच उध्वस्त होताना दिसतो आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या त्यांच्या आयुष्याची ज्वलंतता दर्शविणारी आहे. राजन गवस हे कृषिसंस्कृतीची होत जाणारी अवहेलना 'ब बळी'चा मधून मांडतात. शेतकरी आहे तर सर्व आहेत. या कृषिसंस्कृतीने देव राजा सर्व निर्मिले आहे. म्हणून तिचे महत्त्व राजन गवस सांगतात.

## ८. शरण कुमार लिंबाळे :

शरण कुमार लिंबाळे यांची सानातान्विशायीची भूमिका अतिशय महत्वाची आहे.'सनातन' (२०१८)विषयी रवींद्र गोळे लिहितात, "लेखकाची लेखनामागची भूमिका इतकी स्पष्ट आणि स्वच्छ आहे की 'सनातन' नावाची ही कादंबरी हिंदू समाजातील व्यंगांवर आणि व्याधीवर नेमकेपणाने बोट ठेवताना आम्ही वेगळे आहोत ही भूमिका कुठेही दिसून येत नाही, तर या व्याधी आपल्या आहेत, त्या आपणच दूर करून समाज बलशाली केला पाहिजे ही बाब वेळोवेळी अधोरेखित होताना दिसते. पुस्तकाच्या मलपृष्ठावरचा मजकूर ही भूमिका ठळकपणे स्पष्ट करतो."[१२]भालचंद्र नेमाडे यांच्या 'हिंदू' सारखी 'सनातन' व्यापक पाटावर सांस्कृतिक मांडणी करते, ही मांडणी नव्या समाज उभारणीसाठी आहे. आपला समाज बदलला पाहिजे तो बदलत का नाही. तो जर असाच राहिला तर आपल्याला फार मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागेल असा इशारा हे लेखन देते. भारतीय समाज संस्कृती धर्म जाती व्यवस्था आपापसातले वैर यावर शरणकुमार लिंबाळे 'सनातन'मधून प्रकाश टाकतात.

## ९. सदानंद देशमुख

सदानंद देशमुख यांनी 'तहान' (१९९८) आणि 'बारोमास' (२००२) या कादंबऱ्या मराठी साहित्यात अनमोल ठराव्यात. या दोन्ही कलाकृतींतून त्यानी पाणी आणि सुशिक्षित तरुण बेकारांचे प्रश्न यांचे महत्त्व सांगितले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात सामान्य माणसांची होत जाणारी जगण्याची परवड ते उजागर करतात. "बारोमासाचीकथा बारा महिन्याच्या कालावधीत घडते. वर्षाच्या बारा महिन्यात शेतकऱ्याच्या आयुष्यात येणाऱ्या सगळ्या घटनाचा प्रातिनिधिक धांडोळा, तो घेताना शेतकऱ्याच्या परिस्थितीचे त्याच्या अवती भवतीच्या पर्यावरणाचे मानवी नातेसंबंधांचे उत्कट चित्रण करते. शेतकऱ्यावर कोसळणाऱ्या अस्मानी आणि सुलतानी संकटांचे समग्र दर्शन आतून घडते. बेचैन करणारा लहरी निसर्ग, जीवाला घोर लावणारी सावकारी, झोप उडवणाऱ्या बैंका, भ्रष्ट राजकारणी आणि सगळे कमी पडतात म्हणून की काय रोजनदारीवरचे गडीसुद्धा शेतकऱ्याची अडवणूक करत असतात"[१३] हे सर्व सदानंद देशमुख यांनी आपल्या बारोमास मधून मांडले आहे. त्याचबरोबर उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांचे प्रश्न, वेदना आली आहे. उच्च शिक्षण घेउन गुप्त धन शोधाच्या मागे लागलेले दिनकर दाभाडे, मधू  यांचे चित्रण येते. एकनाथाच्या मनस्थितीचे सदानंद देशमख यांनी केलेले  वर्णन पाहा, "आपणही आता त्यापैकीच एक झालो आहोत. खर म्हणजे आपण आहोत ह्या मोडक्या तलवारीसारखे. ही तलवार जशी लढाईला प्रवृत्त करत नाही फक्त इतिहासातील पराभवाची कथा सांगते तसे आपणही पराभूत जीवनाचा इतिहास चेहऱ्यावर घेऊन फिरणारे. आणि जास्त जाचणार हे की आपण मोडलेले, शेती असून शेतकरी नाही. शिक्षण असून कर्मचारी नाही. घर असून बेघर झालेले. भाऊ असून नसल्यासारखे. बायको असून नसल्यासारखे. गाव असून नसल्यासारखे. एकाकी, एकटे खऱ्या अर्थाने एक-नाथ"[१४]सदानंद देशमुख यांनी आपल्या वऱ्हाडी बोलीने या कादंबरीतून शेतकरी त्यांची स्थिती , सुशुक्षित बेकार तरुणांचे प्रश्न चित्रित केले आहेत.

## १०. कृष्णात खोत :

कृष्णात खोत यांची 'गावठाण' (२००५),'रौंदाळा' (२००८), 'झड झिंबड'(२०१२), 'धूलमाती' (२०१४), 'रिंगाण' (२०१८) इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. ही कादंबरी कृषी संस्कृती, तिच्यापुधील आव्हाने वास्तव पद्धतीने मांडते., 'गावठाण'मधून आनंदी चे भावविश्व शोकात्म पद्धतीने अवरते. म्हणून तिची  कथा तिची एकटीची रहात नाही. संपूर्ण समाजजीवनाची होते. 'धूळमाती'मध्ये काळी भूमी आई समान असते ही शिकवण, मातीशी नाळ जोडलेले तिच्यावर प्रेम करणारे कुटूंब आणि जमीन विक्रीचे राजकारण येते. संवेदनशील मनाच्या माणसांची ही कहाणी चटका लावणारी आहे. "व्यक्ती, कुटुंब, गाव यांतील

सहसंबंधाच्या वेगळ्या परी शोधणारे कृष्णात खोत व्यक्ती आणि समूहकेंद्राकडून आता माणूस आणि निसर्ग, माणूस आणि प्राणी यांच्यातील सनातन संघर्षाची रूपं शोधत आहेत....माणूस आणि प्राणी, विकास आणि आधुनिकपूर्व जगातले अंतर्विरोध यांच्यातल्या सूक्ष्म परी ते कादंबरीत आणत आहेत."[१५]कृष्णात खोत या लेखनाच्या निमित्ताने पर्यावरणाच्या जास्त जवळ जाणारे भान व्यक्त करतात. हे मराठी साहित्यात नाविन्यपूर्ण आहे. 'रिंगाण' (२०१८) ही "कादंबरी एका महाव्याकूळ आदिम प्रश्नाला साक्षात करते. आपल्या हद्दीचं रिंगण करून उभी असणारी म्हसरं आपली मुळं तुटू देत नाहीत. प्रक्षोभ आणि हिंस्त्र आक्रमणात परिणत झालेल्या म्हसरांच्या विराट प्रतिमेच्या पार्श्वभूमीवर माणूस किरटा, हतबल वाटायला लागतो."[१६]माणूस आणि प्राणी यांच्यातील संघर्ष हा अनेक पातळ्यांवरून खोत नोंदवतात.

## निष्कर्ष :

१. समकालीन मराठी कादंबरीकार जागतिकीकरणामुळे १९९० नंतरची बदलती जीवनमूल्य त्यांचा समाजजीवनावर त्यांचा होणारा बारा-वाईट परिणाम यांचा आपल्या लेखनातून वेध घेतात.

२. शेती, शेतकरी, त्यांची आत्महत्या यांची गंभीरतेने दखल ही कादंबरी घेते.

३. धर्म, जातीव्यवस्था यांची अनेकविध रूपे ती साकार करून आपले मूळ प्रश्न अधोरेखित करते.

४. सुशिक्षित तरुण बेकारानी जगायचे कसे हा प्रश्न उपस्थित करते. उदा. 'तहान', 'बारोमास'.

५. भ्रष्ट राजकारणामुळे, शेती, शेतकरी, पशु, निसर्ग पर्यावरण यांची हानी (माती) होते हे भान व्यक्त करते.

## संदर्भ आणि टिपा:


१. भालचंद्र नेमाडे, 'टीकास्वयवर', साकेत प्रकाशन औरंगाबाद, १९९०, पृ. २२९

२. खोले विलास (संपा), 'साहित्य आणि समाज', गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९९१, पृ. ९२-९३

३. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू' ही संकल्पना संकुचित करू पाहणारे चुकतायत...', 'लोकरंग', लोकसत्ता, ३० ओगस्ट २०२०

४. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू: जगण्याची समृद्ध अडगळ' पॉप्युलर प्रकाशन, प्रथमावृत्ती: २०१० मुंबई, पृ. ५८५

५. नेमाडे भालचंद्र, 'हिंदू: जगण्याची समृद्ध अडगळ', पॉप्युलर प्रकाशन, प्रथमावृत्ती: २०१० मुंबई, पृ. ५८४

६.गणोरकर प्रभा, 'लोचना आणि आलोचना', पाटील,तुपे(संपा.), समकालीन प्रकाशन, पुणे, २०१८, पृ. १२२

७. गणोरकर प्रभा, 'मलपृष्ठ', 'उत्सुकतेने मी झोपलो', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६

८. थोरात हरिश्चंद्र, 'आजची मराठी कादंबरी: नव्या वाटा', प्रज्ञा दया पवार(संपा.), परिवर्तनाचा वाटसरू, दीपावली विशेषांक, २००९, पृ. १०८

९. पवार दत्ता, 'आजची कादंबरी', 'साहित्य', दिवाळी अंक २०१६, मुंबई मराठी साहित्य संघ, पृ. २१

१०. गवस राजन, 'ब बळीचा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०१२, पृ. १०७

११.मोरे नंदकुमार, 'ब बळीचा: अर्थात 'शेतकऱ्या सहीत शेतकीची हल्लीची स्थिती' (लेख, अंतर्भूत - "ब बळी विषयी"(संपा.शरयू आसोलकर), दर्या प्रकाशन, पुणे , २०१६, पृ. १११

१२. गोळे रवींद्र, ''सनातन' माणूसपणाचा शोध', साप्ताहिक विवेक, ६ एप्रिल २०२१

१३. चोरमारे विजय, 'साहित्य', दिवाळी अंक २०१६, मुंबई मराठी साहित्य संघ, पृ.४९

१४. देशमुख सदानंद, 'बारोमास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००५, पृ.१३६

१५. शिंदे रणधीर, 'रिंगाण': मराठी कादंबरीचं एक नवं वळणरूप', अक्षरनामा, २४ फेब्रुवारी, २०२०

१६. शिंदे रणधीर, 'रिंगाण':मराठी कादंबरीचं एक नवं वळणरूप',अक्षरनामा, २४फेब्रुवारी, २०२०


❖❖❖

# नव्वदोत्तरी मराठी कादंबरीतील प्रवाह

**डॉ. प्रताप गायकवाड**
**मराठी विभागप्रमुख**
**एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ,**
**पुणे - ४११०३८**
**मेल-** pratapmgaikwad41@gmail.com **चलभाष- ८१७७९७८४४५**

**प्रस्तावना :**

मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी म्हणून 'यमुनापर्यटन'(१८५७) या बाबा पदमनजीच्या कादंबरीचा उल्लेख केला जातो. सुरुवातीच्या काळात इंग्रजी कादंबरीच्या परिचयाने मराठी कादंबरीचे स्वरूप सिद्ध होत गेले आहे. त्यानंतर मराठी कादंबरीने आपले स्वतंत्र रूप सिद्ध केले. १९६० नंतर मराठी साहित्यात विविध वान्गमयीन प्रवाहातून लेखन झालेले दिसते. ग्रामीण, दलित, आदिवासी,स्त्रीवादी, महानगरीय, ऐतिहासिक, चरित्रात्मक, राजकीय या सर्वच प्रवाहामधून मराठी कादंबरी अधिकाधिक व्यापक जीवन दर्शन घडविताना दिसते. १९९० नंतर विविध प्रवाहामधूनमराठी कादंबरी अधिक वास्तव, समाजाभिमुख होताना दिसते.खालील मुद्द्यांचा आधारे १९९० नंतरच्या मराठी कादंबरीचे प्रकार आणि स्वरूप यांची मांडणी करणार आहे.

**१. १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचे स्वरूप**
**२. १९९० नंतरच्या दलित कादंबरीचे स्वरूप**
**३. १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीचेस्वरूप**
**४. १९९० नंतरच्या स्त्रीवादी कादंबरीचेस्वरूप**
**५. १९९० नंतरच्या कादंबरीची वैशिष्ट्ये**

## १. १९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचे स्वरूप :

१९९० नंतरच्या काळात ग्रामीण कादंबरीकार म्हणून बाबाराव मुसळे 'वारूळ' (२००४), 'पाटीलकी' (२००५), नागनाथ कोत्तापल्ले, गणेश आवटे'गणगोत','भिरूड', बाबू बिरादार 'कावड', 'मातीचे पाय','संभूती',राजन गवस,वासुदेव मुलाटे,सरदार जाधव,कृष्णात खोत 'गावठाण', 'रोन्दाळा', मोहन पाटील, रवींद्र शोभणे कोंडी (१९९२) यांचा समावेश होतो. "आधुनिक युगात जुन्या तात्विक साहित्यविचाराला आजीबात स्थान नाही का? तसे मुळीच नाही. कारण जीवन काय आणि साहित्य काय, परंपरा आणि प्रयोग या दोन चाकावरच त्यांचा सगळा प्रवास चालू असतो. म्हणून साहित्याच्या जुन्या परंपरांचा विचार केली नाही, तर आपला साहित्यविचार एकांगी व वरवरचा ठरण्याची भीती असते."[१]१९९० नंतरच्या ग्रामीण कादंबरीचा विचार करत असताना आपणास जुन्या ग्रामीण साहेत्या समीक्षेच्यामांडणीचा आढावा घ्यावा लागतो. परंपरा आणि प्रयोग यांच्या बाबतीत ग्रामीण कादंबरीचा अभ्यास पूर्व परंपरेचा विचारकरूनच करायला हवा. या कादंबरीविषयी गणेश मोहिते म्हणतात, "वास्तवाच्या व्यामिश्रतेची उकल काळाच्या विविध संदर्भासह लेखक व्यक्त करताना दिसतात. या कालखंडातील कादंबरीने मराठी कादंबरीला समूहनिष्ठतेकडे वळविले व जनसमूहांचे जगण्या मरणाचे प्रयत्न केंद्रस्थानी आणले."[२] येथे विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' या कादंबरीची गावे उध्वस्त होण्याची प्रक्रियाही ध्यानी घ्यावी लागते. ग्रामीण कादंबरीवरील आक्षेप या कादंबरीने पूसून टाकले. तिला अधिक नेमकेपणा दिला. या तर्हेने मराठी ग्रामीण

कादंबरी अधिक सशक्त होताना दिसते. ग्रामीण भागातील समूहमनाचे दुख ही कादंबरी व्यक्त करते. त्या त्या प्रदेशातील सामान्य जीवांचा जगण्या मरण्यासाठी सुरू असलेलासंघर्ष या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे.

## २. १९९० नंतरच्या दलित कादंबरीचे स्वरूप :

या काळात लेखन करणारे कादंबरीकार म्हणून यशवंत मनोहर 'रमाई' (१९९१), माधव कोन्डविलकर 'डाळ', 'वेध', 'एक होती कातळवाडी', नाना धाकुलकार 'रमाई भिमाई' (१९९१), सुधाकर गायकवाड 'शूद्र' , नामदेव ढसाळ भीमसेन देठे 'इस्कोट', नामदेव कांबळे 'राघववेळ', अशोक व्हटकर'मेलेलं पाणी', एकनाथ साळवे, जी के. ऐनापुरे अभिसरण (२००२,) बा. स. हाटे, सिद्धार्थ रामटेके 'भारत सैल होताना' यांचा उल्लेख करावा लागतो. या काळातील दलित कादंबरीच्या संदर्भात वि. शं. चौगुले म्हणतात, "मराठी साहित्याच्या मुख्य प्रवाहात जातीय श्रेष्ठ कनिष्ठतेचे चित्रण झाले होते; पण पण दलित कादंबरीतील समाजदर्शन सूक्ष्म पातळीवरून केले गेले आहे. मराठी साहित्यातील सामाजिकतेला प्राप्त झालेले हे नवे परिमाण समग्र मराठी साहित्याची उंची वाढविणारे ठरले आहे."[३]समकालीन प्रश्नाना ही कादंबरी बोलते करताना दिसते. सिद्धार्थ रामटेके यांच्या भारत सैल होताना बद्दल या कादंबरी विषयीगणेश मोहिते या कादंबरीविषयी म्हणतात, "दलित कादंबरी ही अन्य दलित साहित्यातील वांगमय प्रकाराप्रमानेच प्रामुख्याने वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, विषमता, उच्च-नीच भावामुळे होणारा संघर्ष आणि मानसिक ओढाताण व तेढ या परिघातच फिरणारी आहे. या समजुतीला छेद देणारे लेखन म्हणून सिद्धार्थ रामटेके यांच्या 'भारत सैल होताना' या कादंबरीचा उल्लेख करावा लागतो. जागतिकीकरण खाजगीकरनाने निर्माण केलेले प्रश्न,बहुराष्ट्रीय कंपन्यांचे वाढते प्रस्थ, खुले आर्थिक धोरण, सामाजिक विषमतेबरोबरच वाढत जाणारी भयावह आर्थिक विषमता, कादंबरी प्रकट करते. समकालीन वास्तवातील अंतर्विरोधावर भाष्य म्हणजे 'भारत सैल होताना' कादंबरी होय."[४]चौगुले यांनी दलित कादंबरीच्या पुढील वाटचालीची दिशा येथे निश्चित केलेली दिसते. सनकालीन प्रश्न या कादंबरीत अधिक पोटतिडकीने येताना दिसतात.

## ३. १९९० नंतरच्या महानगरीय कादंबरीचे स्वरूप :

मराठी साहित्यात महानगरीय कादंबरी प्रवाह १९६० नंतर विशेष रूपाने उदयास आलेला दिसतो.१९९० नंतरही मराठी कादंबरी महानगरीय जीवनाकडे वळताना दिसते. "संस्कृतीच्या आवरणातच साहित्यव्यवहार शक्य होतो. ह्या सत्याचे भान न ठेवणारे कादंबरीकार वास्तवाच्या लांबच राहतात, इतर कोणत्याही कलाकारापेक्षा कादंबरीकाराला समाजजीवनाचे किंवा समूहजीवानाचे भान सतत ठेवावे लागते. एका अर्थाने कादंबरीकाराला सांस्कृतिस संवर्धक अशीच भूमिका प्राप्त होते. कारण कादंबरीचे द्रव्य संस्कृतीच्या सर्जन, संरक्षण सातत्य मूल्यवितरण इत्यादी संदर्भासकट कादंबरीच्या रूपात येते. व्यक्तीवर पडणारे हे सामाजिक वास्तवाच्या आधाराचे संदर्भ व्यक्तीला मान्य असोत की नसोत, ते असतातच."[५] असे म्हणून भालचंद्र नेमाडे यांनी मराठीतील महानगरीय कादंबऱ्याचा वास्तव सरळपणे व्यक्त करणाऱ्या कादंबऱ्या म्हणून उल्लेख केला आहे. ह. मो. मराठे, सुभाष भेंडे, मधु मंगेश कर्णिक, अनंत सामंत, शशांक ओक, मधु दंडवते, वसंत नरहर फेणे इत्यादी कादंबरीकार या काळात महानगरीय जीवानाचे चित्रण करीत आहेत. "एकूण या कालखंडातील महानगरीय कादंबर्यांच्या आशय-स्वरूपाचा विचार करता महानगरीय उपसंस्कृतीचे चित्रण वेगवेगळया कादंबऱ्यातून करण्यात आले; पण महानगराचा समग्रतेने वेध घेण्याचा प्रयत्न भाऊ पाध्ये वगळता इतर लेखकांना तितकासा पेलावलेला दिसत नाही."[६] भाऊ पाध्यानी ज्या समग्रपणे महानगरीय जीवन आपल्या लेखनातून जिवंत केले, तशा पद्धतीचे लेखन नंतरच्या काळात

झाल्याचे दिसत नाही. हे खरे मानले तरी आजची मराठी महानगरीय कादंबरी समाजातील भेदक प्रश्नांना मांडताना दिसते. हे नाकारता येण्यासारखे नाही.

## ४. १९९० नंतरच्या स्त्रीवादी कादंबरीचे स्वरूप :

१९६० नंतरच्या प्रवाहत स्त्रीवादी साहित्याप्रवाह हा एक महत्त्वाचा साहित्यप्रवाह म्हणून उदयास आला. परंतु१९८० नंतर खऱ्या अर्थाने स्त्रीवादी साहित्य मराठीत लिहिले जाऊ लागल्याचे दिसते. या लेखिकांमध्ये लेखन करणाऱ्या लेखिकांनी स्त्री जीवनाचे विविध आयाम व्यक्त केलेले आहेत. या कालखंडात आशा बगे 'त्रिदल'(१९९४), 'सेतू' (१९९९), भूमी, सानिया 'स्थलांतर'(१९९४), 'आवर्तन'(१९९६),कविता महाजन 'ब्र' (२००५), प्रतिमा इंगोले 'बुढाई' (१९९९) 'पार्टटाईम' (२००२), रेखा बैजल 'तृप्त'(१९९७) मेघना पेठे 'नातिचरामी' या कादंबरीकारांचा उल्लेख करावा लागतो."आजच्या लेखिकांनी सांकेतिकता झुगारून दिलेली आहे. अभिव्यक्तीच्या पद्धती, लेखनशैली बदलली आहे. आधुनिक स्त्रीची विविध रूपे त्या कादंबरीतून साकार करीत आहेत. १९८० नंतरच्या स्त्रियांच्या काही कादंबर्यांमधून स्त्रीवादी विचारसरणीने दिलेले नवे आत्मभान , स्वतःच्या आयुष्याला स्वत: वळण देण्याचा, स्वतःचे निर्णय स्वतः घेऊन त्यांची जबाबदारी पेलण्याचा स्त्रीचा प्रयत्न 'स्थलांतर', 'आवर्तन', यासारख्या अन्य कादंबर्यांमधूनही काहीशा अप्रत्यक्षपणे व्यक्त होताना दिसतो."[७]या संदर्भात आशा बगे यांच्या 'भूमी' या कादंबरीचा उल्लेख करावासा वाटतो. मैथिली नावाच्या एका मुलीचा विकसनशील जीवनप्रवास 'भूमी'तून आशा बगे मांडताना दिसतात. रवींद्र शोभने म्हणतात, "भूमी हे स्त्रीचे अन्वयार्थक रूपक या आदिम, अनादी रूपकांच्या संपूर्ण कादंबरीत लेखिकेने केलेला वापर लेखिकेच्या समृद्ध वाण्ग्मयातील व्यक्तिमत्त्वाची प्रतीती देणारा आहे. अनेक शक्यता असूनही फाशनेबल स्त्रीवादी किंवा स्त्रीस्वातंत्र्यवादी वळणान ही कादंबरी न जाता जीवनाच्या आणि मानवी संबंधाच्या मूळ गाभ्याला घट्टपणे चिटकून राहिली, हे भूमीच आणि पर्यायाने लेखिका आशा बगेंच मोठ यश मानावं लागेल."[८]हा प्रवाह १९८० नंतर जरी मराठीत मूळ धरू लागला तरी आजचे स्त्रीवादी कादंबरीस्त्रियांचे जगणे व्यक्तीगत जीवन याना वाचा फोडताना दिसते. एका अर्थाने मराठीत हे नवीनच आहे. असेम्हणावे लागेल.

## ५. १९९० नंतरची नव्या वाटा शोधणारी कादंबरी वैशिष्ट्ये :

१९९९० नंतर वर उल्लेख केलेल्या ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, महानगरीय, प्रवाहामधून लेखन होत होतेच, त्याशिवाय या प्रवाहांमध्ये ज्या कादंबरीचा समावेश करावा कि नाही अशी वैशिष्टे असलेली मराठी कादंबरीही याच काळात लिहिली जात होती. ही कादंबरी प्रयोगीता, भाषाशैली, आशय या बाबतीत वेगळ्या आहेत. नवीन कादंबरीकारांमध्ये कृष्णात खोत, प्रवीण बांदेकर, सदानंद देशमुख, किरण गुरव, या उल्लेखनीय विषय हाताळणार्या तसेच नवोदित पण महत्त्वाचे लेखन करणारे म्हणून बाळासाहेब लबडे,'फेसाटी' लिहिणारे नवनाथ गोरे, 'स्वतला फालतू समजण्याची गोष्ट' लिहिणारे अवधूत डोंगरे या लेखकांचा सामावेश होतो.

मराठी साहित्य विश्वात १९९० नंतरच्या काळात उल्लेखनीय अशा कादंबर्या लिहिणारे असे प्रस्थापित लेखही आहेत. त्यात भालचंद्र नेमाडे, रंगनाथ पठारे, श्याम मनोहर, शरण कुमार लिंबाळे या मातब्बर लेखकाचा १९९० नंतरची कादंबरी घडविण्यात मोठा वाटा असल्याचे दिसून येते. 'उत्सुकतेने मी झोपलो','हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ', 'सनातन' या तीन महत्वाच्या कादंबर्यांचा उल्लेख करता येईल. हिंदू .. च्या निमित्ताने भालचंद्र नेमाडे यांनी अतिविशाल विशाल पट मांडलेला आहे. विविध नियतकालिकात त्यंनी दिलेल्या मुलाखतीमधून त्यानी आपली भूमिका मांडलेली आहेच. नेमाडेंच्या कादांबयाशतून स्त्री आरतेत्रे फारशी येत नाहीत आली तरी ते उथळ असतात याला'हिंदू जगण्याची समृद्ध अडगळ' अपवाद म्हणावी लागते कारण या कादांबरी चिंधू आत्या, बायडी, लाडकी, या सर्वाचस्त्रीयांविषयी

नेमाडे पुरुषसत्ताकसमाज व्यवस्थेत त्यांची होणारी कुचंबणानाच सांगत आहेत असे दिसते. "मग एकदा पहिला तर आडावर बायडी खाली मान घालून कपडे धुता धुता कुणाला दिसणार नाही अशी मुळू मुळू रडत होती आणि चिंधूआत्या आईच्या कणवेने कुणाला ऐकू येणार नाही अशीतिची समजूत घालीत होती: "असू दे असू दे सहनन कराव बायडे सहन करण्यात बाईचा मोठेपणा असतो"[९]माय-लेकी, बहिणी, आत्या अशा अनेक स्त्रीया विषयी, त्यांचे जगणे त्यांचे दुख याकडे नेमाडे अंतर्मुख होऊन वाचकाला पहायला लावतात.त्यातील दुख हेरतात. ते दुख मांडण्याचा प्रयत्न करतात. " पुरुष लोक काही टक्के तरी दारुडे खुनी लुटारू लबाड भोंदू असतातच, त्यातले काही आपल्या घरातल्या मुलीच्या नशिबी नवरे म्हणून येण्याचा संभव थोडा तरी असतो. हा अंधार आपल्या घरातल्या ह्या पोरींच्या नशिबात आला. याला काय मार्गअसणार? खंडेराव, खर शहाणपण असे प्रश्न सोडववण्यात असते, ते पुस्तकी संशोधन करण्यात नाही"[१०] न सुटणारे असे अनेक प्रश्न ही कादांबरी मांडताना दिसते, व्यवस्था माणसाला सुखाने जगू देणारी नाही, तरी ती इतकी हजारो वर्षे टीकून ती का?असा प्रश्न या निमित्ताने नेमाडे उपस्थित करतात. एकूणच'हिंदू..' ही कादंबरी मराठी कादंबरीलाजागतिक कादंबरीत स्थान मिळवून देण्याजोगी आहे. तिच्या येणार्या पुढील भागाने या अशा पल्लवित केल्या आहेत असे म्हणायला हरकत नाही.

मराठी सामाजिक कादांबरी नेहमीच समाजातील प्रश्न मांडण्याचे काम करताना दिसते. 'सनातन'मधून शरण कुमार लिंबाळे यांनी अनेक सामाजिक समस्या मांडलेल्या आहेत. रवींद्र गोळे या संदर्भात लिहितात, "हिंदू समाजातील अस्पृश्यता आणि त्यामुळे निर्माण झालेले प्रश्न हा विषय सनातन कादांबरीचा गाभा आहे. स्वाभाववकच महार समाजातील व्यक्ती अन्याय-अत्याचारापायी, उपासमारीपायी धर्ममांतराच्या वाटेने जाताना दिसतात. भारतात व्यापारी म्हनुन आलेले इंग्रज राजसत्तेबरोबरच अस्पृश्य जातीचेमोठ्या प्रमाणात धर्मातर करतात. महार ख्रिश्चन होतात,महारमुसलमान होतात, पण त्याची जात पाठ सोडत नाही, सहाशे सातशे वर्ष धर्मांतराची मालिका चालू राहते, मात्र महार समाजाच्या वाट्याला आलेली अवहेलना संपत नाही... मग ते सोनईसारखे गाव असो अगर पुण्यासारखे राजधानीचे शहर."[११] सनातन विषयी शरण कुमार लिंबाळे यांची भूमिका अतिशय महत्त्वाची वाटते , ते म्हणतात, "ही कादंबरी म्हणजे महारांचा इतिहास नाही; हे महारांचे वर्तमान आहे.बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे धर्मचिकीत्सेला सुरूवात झाली. हिंदू धर्माने अश्पृशांचे आणि आदिवासींचे अतोनात नुकसान केलेले आहे, त्या नुकसानीची गणना अजून झालेली नाही; नुकासांभारापाई देण्याचा प्रश्न तर दूरच. अश्पृशांच्या आणि आदिवासीनच्या नुकासानाविषयीही कादंबरी बोलते आहे. आपत्तीत सापडलेल्या हरेक व्यक्तीला नुकासानभरपाई देण्यात येते. हजारो माणसे हजारो वर्ष दारिद्र्यात आणि अज्ञानात खितपत पडली आहेत. त्यांच्या वाताहतीचा हिशोब करावा लागेल. तळ ढवळून निघतो आहे. ह्याकडे खूप काळ दुर्लक्ष करता येणार नाही, हा इशारा देणारे हे लेखन आहे."[१२] 'सनातन'मधून शरण कुमार लिंबाळे नवी आणि समन्वयाची भूमिका व्यापक समाजहिताच्या संदर्भात मांडतात. ही भूमिका एकूणच भारतीय समाज आणि मराठी कादंबरी याना नवी दिशा देणारी ठरेल असा विश्वास वाटतो.

## निष्कर्ष :

१. १९९० नंतरचे सामाजिकबदल ही कादंबरी सूक्ष्मपणे टिपताना दिसते.
२. सामान्य माणूस आणि त्याचे जगण्याचे प्रश्न ही कादंबरी पुनः पुन्हा अधोरेखित करताना दिसते.
३. या काळात ग्रामीण भागात झालेला बदल त्यांचे जगण्याचे प्रश्न ही कादंबरी मांडताना दिसते.
४. शेतकरी, शेतीचे प्रश्न, त्याची दाहकता या कादंबरीतून सजग भान घेऊन येते.
५. दलित जीवन आणि जागतिकीकरण यांचा मेळ या काळातील कादंबरीकार साधत आहेत असे दिसते.

६. या काळातील स्त्रीवादी कादंबरी स्त्रीयांचे प्रश्न तर मांडतेच, परंतु या काळातील कादंबरी स्त्रीला येत जाणार्या 'स्व'चे भान अधिक नेमकेपणाने मांडण्यात यशस्वी झालेली दिसते.

७. 'हिंदू' (२०१०), सनातन (२०१८) या सारख्या कादंबऱ्या इतिहासाचा अन्वयार्थ नीटपणे लावण्याचा प्रयत्न करताना दिसतात.

## संदर्भ आणि टिपा :


१. पुरोहित के. ज., (लेख), 'साहित्य आणि समाज', सुनंदा गोसावी, विलास खोले,(संपा), गोखले एज्युकेशन सोसायटी, नाशिक, १९९१, पृ. ६६

२. मोहिते गणेश, 'समकालीन मराठी कादंबरी', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, २०१३, पृ. ४६-४७

३. चौगुले वि. शं.,'आस्वाद आणि आलेख', प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००१, पृ.१४३

४. मोहिते गणेश, 'समकालीन मराठी कादंबरी', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, २०१३, पृ.५३

५. नेमाडे भालचंद्र, 'टीकास्वयंवर', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९९०, पृ. १६९-७०

६. मोहिते गणेश, 'समकालीन मराठी कादंबरी', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, २०१३, पृ.३७

७. मोहिते गणेश, 'समकालीन मराठी कादंबरी', जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, २०१३, पृ. ६७

८. शोभणे रवींद्र, '१९७० नंतरची मराठी कादंबरी', वान्गमयीन प्रवृत्ती तत्त्वशोध, (संपा.) केशव मेश्राम, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००७ पृ. १४०

९. नेमाडे भालचंद्र,पॉप्युलरप्रकाशन, प्रथमावृत्ती: २०१० मुंबई, पृ.५८५

१०.नेमाडे भालचंद्र, पॉप्युलर प्रकाशन, प्रथमावृत्ती: २०१० मुंबई, पृ. ५८४

११. गोळे रवींद्र, साप्ताहिक विवेक, ६ एप्रिल २०२१

१२. लिंबाळे शरण कुमार, 'मनोगत', 'सनातन', दिलीपराज प्रकाशन, पुणे, २०१८, पृ. ६


❖❖❖

# संत नामदेवांचे व्यक्तिमत्त्व आणि काव्य

**प्रा.डॉ. ज्ञानबा महादू गाडे**
विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय,
हिवरा आश्रम. ता. मेहकर, जि. बुलढाणा.
मो.नं. ९९२३१६४३९३

**प्रस्तावना :**

कवीच्या साहित्यकृतीतून व्यक्त झालेले त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब कसे प्रभावी असते याची प्रचिती संत नामदेव महाराजांच्या अभंग रचनेवरून येतो.काव्यातून नामदेवांनी केलेले आत्मनिवेदन रसिकांच्या मनःचक्षूसमोर उभे राहते.साक्षात विठ्ठलाने नामदेवांचे लाड पुरवावे याचे कारण त्यांचा लडिवाळ,निरागस व हट्टी स्वभाव.भावनेची कोवळीक व सहृदयाल्हादक वृत्ती नामदेवांच्या जीवनातील चमत्कारकथातूनही व्यक्त झाली आहे.आनंदी वृत्ती व प्रेमळ भाव हाच नामदेवाच्या स्वभावाचा खरा स्थायीभाव आहे.आत्मदेव हाच नामदेवांचा देव झाला.संत नामदेवांची अभंगरचना ही थेट हृदयाशी नातं जोडू पाहते हे संत नामदेवांच्या अभंगरचनेचे वेगळेपण आहे.त्यांच्या मूळ स्वभावामुळे त्यांची अभंगरचना आगळ्या ओलाव्याचा प्रत्यय देते. अंतरंगाला प्राधान्य देणारी अभंगरचना ही एक नवी परंपरा संत नामदेव महाराजांपासून सुरू झालेली दिसून येते.याचा नव्याने शोध घेतला पाहिजे.

**उद्दिष्टे :**

संत नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचे प्रतिबिंब त्यांच्या अभंगरचनेत शोधता येते.इतर संतांच्या तुलनेत संत नामदेवांचे वेगळेपण सिद्ध होण्यास त्यावरून मदत होऊ शकते.प्रारंभी सगुण आणि उत्तरोत्तर निर्गुण भक्तीचा त्यांच्यावर पडलेल्या प्रभाव शोधता येतो.संत नामदेव महाराजांची वैश्विक ऐक्याची भावना लक्षात घेणे काळाच्या अनुषंगाने महत्त्वाचे वाटते.संत नामदेव महाराजांचा मानवतावाद नव्याने लक्षात घेणे गरजेचे आहे.

संत शिरोमणी नामदेव महाराज हे भावकवी म्हणून ओळखल्या जातात.श्रीविठ्ठला सोबत लडिवाळ नातं निर्माण करणारे संत म्हणजे नामदेव महाराज.कवी आणि त्यांची कविता किती एकरूप असू शकते याचे उत्तम उदाहरण म्हणजे संत नामदेव महाराजांची अभंगगाथा.संत नामदेव महाराजांचे हृदय जणू त्यांच्या ओठावरच होते.संत नामदेव महाराजांच्या अभंगाचा त्यांच्या व्यक्तिमत्त्वपासून वेगळा विचार करणे अशक्य आहे.संत नामदेव महाराजांचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे केवळ आपल्या व्यक्तिमत्वाचा ठसा साहित्यात उमटला असे नाही,तर आपले संपूर्ण कुटुंब लिहिते केले.एवढेच नव्हे तर सर्व संत मंडळाला संत नामदेवांनी लेखणी हातात घ्यावयास भाग पाडले.संत साहित्य बहुश्रुत होण्यास मदत झाली. समतावादी विचाराचे श्रेय संत नामदेव महाराजांकडे जाते.संत नामदेवांच्या साहित्यात गृहजीवनाबरोबरच विठ्ठलभक्तीचे वर्णन आले आहे.

तसे पाहिले तर व्यक्तिमत्त्व ही संकल्पना मानसशास्त्रीय आहे.व्यक्तीच्या दर्शनी तऱ्हेतील व एकंदर वर्तनातील सर्व बाह्य आविष्कार आणि तिच्या आंतरिक भावभावना यांचा समावेश व्यक्तिमत्त्व या सज्ञेत होतो.व्यक्तीमत्वाच्या कल्पनेत व्यक्तीच्या कायिक,मानसिक,भावनिक,व सामाजिक वैशिष्ट्यांचे विकसन अपेक्षित असते.व्यक्तीची सामाजिक अभिवृत्ती,तिची सामाजिक मूल्ये व तिच्या सामाजिक अनुभूतीतून निर्माण झालेली तिची स्वतःविषयीची जाणीव या सर्वांचे अद्भुत रसायन यातून व्यक्तिमत्त्व आकार घेत जाते.असे वरील विवेचनावरून सांगता येईल. नामदेवांचे लौकीक व्यक्तिमत्त्व आपणास या

वैशिष्ट्यांच्या आधारे पाहता येईल."नामदेवांची अध्यात्मिक जागृती,गुरुकृपा,नामचिंतन संतसंग वैराग्य,चितशुद्धी,भक्तीचे दृढीकरण व त्यांचा आत्मसाक्षात्कार हे सारेच विषय त्यांच्या पारमार्थिक व्यक्तिमत्त्वावर प्रकाश टाकणारे आहेत.नामदेवांचे लौकीक व्यक्तिमत्त्व व पारमार्थिक व्यक्तिमत्त्व एकसंघ व सुसंगत असून त्यातून त्यांच्या समग्र व्यक्तीचित्रानाचे दर्शन घडते.ते खरोखर अपूर्व आहे."१

संत नामदेवांची अभंगरचना ही आत्मनिष्ठ आहे.त्यांच्या रचनांमधून त्यांचे आत्मप्रकटीकरण होते.त्याला काव्य हा साहित्यप्रकारही अनुकूल झाला आहे.संत नामदेवांचे काव्य हे उत्स्फूर्त साक्षात्कारी काव्य आहे.या काव्याचा आविष्कार आशयाशी विलक्षण एकरूप झाला आहे.देहाच्या देव्हाऱ्यात केलेल्या पांडुरंगाच्या यथासांग पूजेचे चित्र एका साररुपातून संत नामदेव महाराजांनी उत्कृष्टपणे उभे केले आहे.संत नामदेवांची शैली अलंकारिकच आहे.त्यांचे अंतरंगच उपमा रूपकांचे अवगुंठण धारण करून व्यक्त होते.त्यांची ही शैली अंतरंगाचा जणू अभिनयच आहे.

'शिंपीयांचे कुळी जन्म मज झाला' किंवा 'घरोघरी ओवाळणी विठ्ठल देखिला नयनी'असे लौकीक जीवनाचे व पारमार्थिक जीवनाचे वर्णन ते करतात.अशा प्रकारे लौकीक व पारलौकिक पाकळ्यांचे कमल आपल्या असंख्य पाकळ्यांनी उमलत जाते.मनुष्याच्या आचारातून विचारातून त्यांचे स्वभाव दर्शन घडत असते.संतांचे साहित्य म्हणजे त्यांची वाङमयीनमूर्तीच आहे.साहित्यातून संतकवीच्या अंतरंगाचे दर्शन घडत असते.संत नामदेव महाराजांनी आपल्या आयुष्यात बहुतांशी भ्रमंती केली आहे.त्यांचे व्यक्तिमत्व बहुश्रुत असलेले दिसून येते.हळुवारपणा आणि प्रेमळपणा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची वैशिष्ट्ये होत.संत नामदेवांचे अभंग हे विविधांगी असल्याने त्यांच्या स्वभावाचे दर्शन त्यांच्या अभंगातून घडत जाते.नामदेव महाराजांच्या संदर्भात असणारे कुटुंबियांचे व इतर संतांच्या अभंगातून त्याचे दर्शन घडते.तीर्थावळीच्या समयी ज्ञानदेव नामदेवास' अद्वैत आत्मया प्रेममूर्ती,प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या हृदयी आला','पंढरीरायाचा तू प्रेम-भंडारी','प्रेमाचा पुतळा' ज्ञानदेव असा नामदेवांचा गौरवपूर्ण उल्लेख करताना दिसतात या वरील संदर्भावरून संत नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.संत नामदेवांचे व्यक्तिमत्त्व अतिशय संवेदनशील होते.ज्ञानदेवांच्या भावंडात आणि इतर संत मंडळात संत नामदेव वयाने मोठे;परंतु मनाने अतिशय हळवे होते.नामदेवांचे पसायदान ज्ञानदेवांच्या पसायदान सारखे गोड असून संत मंडळाच्या कल्याणाचा विचार करणारे आहे. साधुसंतजन हे आपले मायबाप असून ते जीवनप्राण आहेत,असे संत नामदेव महाराज सांगतात.हरिदासांना अकल्प आयुष्य व्हावे,त्यांना कधी कल्पनेची बाधा होऊ नये,ही संतमंडळी सुखी असावी,या विष्णुदासांना अहंकाराचा वारा लागू नये,ज्याच्या मुखी पांडुरंगनामाचे निधान आहे.त्यांचे कल्याण असावे या नामदेव महाराजांनी केलेल्या अभिष्टचिंतनातून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.ज्ञानदेवांच्या समाधी सोहळ्याचे वर्णन करताना नामदेवांचा कंठ दाटून येतो.त्यांच्या हृदयातून येणारा प्रत्येक शब्द अंतःकरणात ओलावा निर्माण करतो. विठ्ठलाला आर्त हाक मारताना त्यांचे मन करूणेने ओथंबून जाते हळव्या, रुसव्याची खेळीमेळी संत नामदेव महाराजांची निराळीच आहे. थेट उपदेश करण्यापेक्षा...

मी तुझी तान्हूली |तू माझी माऊली|
वोरस घाली| प्रेमपान्हा |

असा लडिवाळपणा दिसून येतो हे त्यांचे वेगळेपण आहे. कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन संत नामदेव धावले.यातून त्यांच्या स्वभावाचे दर्शन घडते.त्यांनी प्रेमाला प्राधान्य दिले.संत नामदेवांची वृत्ती साधी,सरळ,विनम्र व निरागस आहे. तीर्थावळीच्या अभंगातून त्याचे दर्शन घडते.

नामयाचे भेटी ज्ञानदेव आले |लोटांगण घातले नामदेवे ||१||
देऊनी अलिंगन प्रीतीच्या पडीभरे | पुजीले आदरे यथाविधी||२||

धन्य तो अविसरू संत समागमु | करीतसे संभ्रमु आवडीचा ||३||
नामदेव म्हणे सफळ माझे जीने | स्वामीच्या दर्शनाने धन्य जालो||४||
पूर्व पुण्य माझे फळास हे आले | प्रत्यक्ष भेटले पांडुरंग ||५||
संसारी आसक्त मायामोहे रत | तापत्रय संतप्त झाले जीव||६||
ऐसिया पतीताचा करावा उद्धार | यालीगी अवतार तुमचा जगी ||७||
तरी मी एक दिन मूढ मतीहीनु | चरणाचा रजरेनु संताचिया ||८||
म्हणोनी पंढरीनाथ पाळीतसे माते प्रेमजीवनभाते देवोनिया ||९||
आजि स्वामींनी पाहिले कृपादृष्टी| केली सुखवृष्टी अनिवार ||१०||
नामा म्हणे तुमच्या चरणाचा आधार| टाकील पैलपार भवननदीचा ||११|| अ. क्र. ५२९

संत नामदेवांच्या भेटीसाठी संत ज्ञानदेव आले त्यावेळी नामदेवांनी ज्ञानदेवांना साष्टांग नमस्कार घातला. ज्ञानदेवांनी त्यांना उठऊन प्रेमाने आलिंगन दिले.नामदेवांनी ज्ञानदेवांचे यथायोग्य पूजन केले.संत ज्ञानदेवांचा समागम मिळाल्यामुळे संत नामदेवांना धन्यता वाटली.त्यांच्या अंत:करणात ज्ञानदेवा संबंधीचे निस्सीम प्रेम होते.त्यामुळे त्यांचा मानसन्मान केला. नामदेव महाराज म्हणतात की, ज्ञानदेवाच्या दर्शनाने मी धन्य धन्य झालो.माझे जीवन सफल झाले.काही माझे पूर्व पुण्य उदयाला आले.त्यांच्या भेटीमुळे मला पांडुरंगाच्या भेटीचा आनंद प्राप्त झाला.यातून संत नामदेवांच्या व्यक्तिमत्वाचे दर्शन घडते.

संत नामदेवांचा भर बुद्धीपेक्षा भावनेवर अधिक होता.संत ज्ञानदेव प्रकांडपंडित व संत तुकाराम बहुश्रुत होते.वेदशास्त्र, अध्यात्मविद्या,पुराणे,उपनिषदे, भगवदगीता,इत्यादींचा सखोल अभ्यास संत ज्ञानदेव यांनी केला होता.संत ज्ञानदेव व तुकाराम यांच्या तुलनेत संत नामदेवांचे ग्रंथपठण अल्प असले तरी चिंतनशीलतेवर त्यांचा अधिक भर होता. ज्ञानेश्वरी या श्रेष्ठ ग्रंथाची 'एक तरी ओवी अनुभवावी'असा संदेश संत नामदेव देण्यास नामदेव विसरले नाहीत यातच त्यांच्या व्यासंगाचे दर्शन घडते.

संत नामदेव महाराजांचे वाक्चातुर्य उत्तम होते.त्यांच्या अभंग रचनेतून ते दिसून येते. ज्ञानदेव नामदेव संवाद,परसा ना मदेव संवाद, 'नामदेव गोणाई संवाद' यातून त्यांचे संभाषण कौशल्य ध्यानात येते.

शिवण्या टिपण्या घातलेसे पाणी | न पहासी परतोनी घराकडे | कैसी तुझी भक्ती |
या लौकीका वेगळी | संसाराची होळी केली नाम्या | (अ.क्र. १२७५)

हे त्राग्याचे बोल एकूणनही नामदेवाच्या तोल ढळत नाही.त्यातून त्यांची विनयशील व विनम्रवृत्ती दिसून येते.उलट आपल्या आईला आपली भूमिका संत नामदेव स्पष्ट करून सांगतात.

कायावाचामने ममत्व माझ्या ठायी | ते तू ठेवी पाई विठोबाचे |
मग हा कृपासिंधु न विसंबेल तुज | अनाथाची लाज हाची राखे || अ.क्र.१२९६

यावरून हे लक्षात येते की,अतिशय शांत व संवेदनशील स्वभाव संत नामदेव महाराजांचा होता. संत नामदेव महाराजांचे आयुष्य भ्रमंतीत गेले आहे.भ्रमणतीला त्यांचा स्वभाव अनुकूल होता.संत नामदेवांचे मूळ गाव हिंगोली जिल्ह्यात नरसी- बामणी हे. त्यांचे औंढानागनाथ येथे पाई जाणे राहायचे.आळंदीस नामदेवांचे जाणे येणे होई.ज्ञानदेवा सोबत नामदेवांनी तीर्थयात्रा केली आहे. ज्ञानदेव समाधिस्थ झाल्यानंतर नामदेव पंधरा ते वीस वर्ष पंजाबातील घुमान येथे जाऊन राहिले.संत नामदेव महाराजांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार केला.कीर्तनाच्या माध्यमातून संत नामदेव महाराजांनी अद्वैत तत्वज्ञानाचा प्रचार देशभर केला.विठ्ठलभक्ती पंजाब पर्यंत नेली. तेराव्या शतकात कुठेही वाहनांची व्यवस्था नसताना घुमान येथे जाऊन काही दिवस त्यांनी वास्तव्य केले. शीखधर्मीय लोकांची सेवा संत नामदेव महाराजांनी केली.जात,धर्म,पंथ प्रदेश या पलीकडे जाऊन मानवतावादाचा प्रचार केला यातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे मोठेपण दडलेले आहे. संत नामदेव यांच्या स्वभावातच प्रचारकी बाना

होता.'नामदेव कीर्तन करी उभा नाचे पांडुरंग' खेड्यापाड्यातील लोकांना नामदेवाच्या कीर्तनाने अक्षरश: वेडे लावले.

संत नामदेवांचे व्यक्तिमत्त्व हे कुटुंबवत्सल होते.संत नामदेवांच्या कुटुंबात चौदा सदस्य होते.अनेक लोकांनी गजबजलेले त्यांचे कुटुंब होते. खरं म्हणजे प्रपंच यांच्यावर लादला होता.त्यांचा प्रपंच ओढगस्तीतच चालला होता.गृहकर्तव्याकडे नामदेवांचे लक्ष नसे.गोणाई आणि दामाशेटी हे त्यांची तक्रार करीत असत.त्यांना थोड्याफार प्रमाणात कुटुंबातून विरोध झाला.मात्र संत नामदेवांची मुले व 'नामयाची दासी जनी' यांना नामदेवाबद्दल परम आदरच वाटत होता.

संत नामदेवांची कविता म्हणजे आत्मकथा होय.त्यांची काव्यरचना विलक्षण आत्मनिष्ठ असल्याने त्यांच्या काव्यात पारमार्थिक व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.नामदेवांचे भावकाव्य त्यांच्या मनाचा उचंबळून आलेला उद्गगार आहे.त्यांच्या पारमार्थिक जीवनचरित्रातून त्यांचा आत्मिक विकास झालेला दिसून येतो.संतसंग व नाममंत्र या दोन श्रद्धा स्थानाच्या बळावरच संत नामदेवांनी साधकावस्थेची पूर्वयोजना केली.पुढे प्रपंचविरक्त होऊन चित्त सुद्ध झाले. संत नामदेवांच्या भावकवितेतून त्यांच्या अनुभावाचे दर्शन घडते.याचा प्रत्यय त्यांनी वापरलेल्या प्रतिमा मधून येतो. "या प्रतिमांच्या साहाय्याने नामदेव आपल्या अनुभवाचा शोध घेत आहेत,आणि म्हणूनच हा अभंग आधुनिक अर्थाने एक श्रेष्ठ भावकविता आहे.वेगवेगळ्या प्रतिमांचा द्वारे देव भक्तासंबंधांचे पदर उलगडून दाखवता दाखवताच प्रत्येक ओळीच्या अंती 'स्वयें दोन्ही'म्हणून नामदेव त्यांना जी पक्की घाठ मारतात ती विलक्षण अर्थपूर्ण आहे. त्याप्रमाणेच पहिल्या सर्वच ओव्यात येणारा 'तू-मीचा' क्रम अखेरच्या ओळीत 'मी कुडी,तूं आत्मा' कसा बदलतो हे ही तेवढेच सूचक आहे"२ संत नामदेव महाराजांनी ईश्वर आणि भक्ताचं नातं अतिशय सोप्या पद्धतीने उलगडून दाखविले आहे.

सारांश:

संत ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्या साहित्याचा संत नामदेव महाराजांच्या व्यक्तिमत्वावर प्रभाव पडलेला दिसून येत असला तरी संत नामदेवाच्या आत्मनिवेदनपर आविष्काराचे वेगळेपण हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहात नाही.संत नामदेव महाराजांचा सगुणभक्तिवर असलेला अधिक भर यावरून सिद्ध होण्यास मदत होते.संत नामदेवांच्या व्यक्तिमत्त्वाची आत्मपरता, सहृदयता, हळुवारपणा, लडिवाळपणा, निरागसता, विनयशीलता, प्रेमळपणा, विनम्रता, साधेपणा, वैश्विकता भावनिकता, आतुटता, समरसता, इत्यादी वैशिष्ट्ये पाहायला मिळतात. संत नामदेवांच्या अभंगरचनांचा या अनुषंगाने नव्याने शोध घेण्यासाठी बराच वाव आहे हे यावरून लक्षात येते.संत नामदेव महाराजांची उपेक्षितता दूर होण्यास यावरून मदत होऊ शकते,याचा नव्याने विचार करण्याची गरज आहे असे मला मनोमन वाटते.

## संदर्भसूची :

(१) डॉ.हे.वि. इनामदार, 'संत नामदेव', केसरी मुद्रणालय पुणे,आवृत्ती दुसरी, १९९४,पृ.क्र१२७.

(२) म.वा. धोंड, 'ऐसा विटेवरी देव कोठे', राजहंस प्रकाशन पुणे, आवृत्ती तिसरी, डिसेंबर २०१४, पृ.क्र१४.

❖❖❖

# उखाणा : एक भाषिक सणंग

प्रा.डॉ. कांत जाधव
मराठी विभागप्रमुख
पंडित दीनदयाल उपाध्याय महाविद्यालय, देवणी, जि. लातूर ४१३५१९
भ्रमणध्वनी ९८५०१८९९८९


## सारांश

लोकवाङ्मयाच्या अनेक प्रकारांपैकी 'उखाणा' हा एक स्वतंत्रपणे लौकिक जीवनाशी एकरूप झालेला वाङ्मयप्रकार आहे. आज प्रचलित असलेल्या उखाण्यांची परंपरा अतिप्राचीन आहे. संस्कृत भाषेतील उखाणे दोन हजार वर्षांपूर्वीचे आहेत. मराठीतील 'उखाणा' या संज्ञेला व्यापक स्वरूप आहे. मराठीतील नाव घेण्याच्या उखाण्यांचीच परंपरा सापडते. दैवत कथेप्रमाणे अत्यंत प्राचीन असून ही प्रथा अभंग आहे. भंग न पावणारी आहे. हा उखाणा केवळ श्रवणाने आत्मसात झालेला असतो. मनाच्या कप्प्यातून त्याला नुतनता प्राप्त होते. अशा उखाण्यांची रचना लयबद्ध आणि तालबद्ध आहे. उखाण्याची भाषा साधीसोपी सुटसुटीत वाक्यरचना आणि समर्पक मांडणी असल्यामुळे तिच्यात जीवंतपणा येतो. उखाण्याचे अंत:करण मोकळे असते. त्यासाठी वापरलेली भाषा चटकदार असते. अशा उखाण्यातून अनेक विषयाचे पदर उलगडत असतात. यात सासर, माहेर, रितीरिवाज, पती यांच्याबद्दलची भावना व्यक्त होतात. लोकवाङ्मयाचा खजिना आणि भाषेचे सौंदर्य असलेल्या उखाण्यांची संपत्ती मराठमोळ्या स्त्रीने भाषेच्या बळावर आणि आठवणीच्या शक्तीवर वर्षानुवर्षे सांभाळलेली आहे. त्यामुळे उखाण्याला लोकजीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे.


**बीजसंज्ञा** : सणंग, उशी, साजूक, मडकं, उरलं सुरलं, शिकं, बाजरी, बळद, चाड, तिफन, पाचुंदे, आवडाणे, बनीम, खळं, आकनी. लोट, येशीला, तान्ही

## प्रस्तावना

लोकवाङ्मयातील एक मौल्यवान लेणं म्हणजे उखाणा. या उखाण्यांचे दालन आगळे—वेगळे आहे. लोकवाङ्मयाच्या अनेक वाङ्मयप्रकारांपैकी 'उखाणा' हा एक स्वतंत्रपणे लौकिक जीवनाशी एकरूप झालेला वाङ्मयप्रकार आहे. अशा उखाण्यांच्या संदर्भात डॉ.सरोजिनी बाबर पुढीलप्रमाणे मत नोंदवितात. ''उखाणा म्हणजे कोडे, कूटप्रश्न, म्हण, उक्ती, वचन, अलंकार यमकयुक्त वाक्यरचना असा अर्थ लागतो.''[१] तर डॉ.शरद व्यवहारे म्हणतात, ''लोकवाङ्मयातील उखाणा म्हणजे एक ठसठसीत दागिना आगळा—वेगळा पण गालावर खळी पाडणारा हा उखाणा एक साहित्यप्रकार म्हणून भारतीय साहित्यकारांनी मानला आहे.''[२] ज्ञान आणि मनोरंजनाच्या उद्देशाने निर्माण झालेला उखाणा रामायण, महाभारत कालखंडापासून मौखिक परंपरेने लोकजीवनात आनंदाचा प्रत्यय देत आजपर्यंत समाजजीवनात टिकून आहे. मराठी लोकवाङ्मयात स्त्रियांच्या उखाण्यांची संख्या खूप मोठी आहे. अशा प्रचलित असलेल्या उखाण्याचे स्वरूप पाहणे त्यांचा शोध घेणे क्रमप्राप्त आहे.

## संशोधनाचा हेतू आणि मर्यादा

उखाणा हा लोकसाहित्यातील एक शाब्द स्वरूपातील प्रकार आहे. उखाण्यांचा अभ्यास समाजव्यवस्थेच्या दृष्टीने, पर्यायाने भाषिक दृष्टीने होणे गरजेचे वाटल्याने संशोधनासाठी 'उखाणा : एक भाषिक सणंग' हा विषय घेतला आहे. उखाण्यातून स्त्री जीवनाच्या सुखदु:खाच्या भावभावना उमटलेल्या असतात. म्हणून उखाण्याचे स्वरूप जसे सांस्कृतिक, सामाजिक दृष्टीने संपन्न आहे त्याप्रमाणेच भाषिक दृष्टीनेही अत्यंत संपन्न आहे आणि हाच या संशोधन विषयाचा हेतू आहे.

लोकसाहित्याचा आवाका अत्यंत विस्तृत आहे. लोकसाहित्यातील प्रत्येक प्रकार स्वतंत्र आणि विशाल आहे. उखाणा हा समाजसुधारणेतून स्वतंत्रपणे आविष्कृत झालेला दिसून येतो. म्हणूनच विषयानुषंगाने केवळ नाव घेण्याचे उखाणे हाच अर्थ अभिप्रेत आहे. केवळ नाव घेण्याच्या उखाण्याच्या मर्यादेतच अभ्यास केला आहे. परंतु उखाण्याच्या व्याप्तीचा विचार करता विषयाला ही मर्यादा घालून अभ्यास केला आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधासाठी वर्णनात्मक व सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. या पद्धतीनुसार सर्वप्रथम विषयाच्या अनुषंगाने उखाणे संकलित केले आहेत. प्रश्नावलीच्या आधारे स्त्रियांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या आहेत. प्राप्त माहितीचे संकलन करून विश्लेषण केले आहे आणि शेवटी निष्कर्ष नोंदविले आहेत.

## उखाण्याचे स्वरूप

उखाणा हा फार प्राचीन काळापासून परंपरेने चालत आलेला आहे. त्यात नवनवीन भर पडत आलेली आहे. उखाणा कधी भव्यदिव्य विचार सांगून आश्चर्यचकीत करतो. कधी–कधी थट्टा मस्करी व विनोद करून गालावर खळी पाडतो. नववधूला लाजवून प्रीतिभावाचा सुगंध देतो तर कधी ऐकणाऱ्याला कोड्यात टाकतो. अशा स्वरूपाच्या उखाण्याचे वर्णन करताना डॉ.पुरूषोत्तम कालभूत म्हणतात, ''दुर्बोध कथनपद्धती म्हणजे उखाणा होय.''[३] समाजजीवनातील अनेक घटना प्रसंग, विधी यांचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष संबंध लोकवाङ्मयाशी येतो. लग्नविधी, कौटुंबिक विधी, सण–उत्सव हळदी–कुंकू, डोहाळे जेवण इत्यादी प्रसंगी सुवासिनीच्या मेळ्यात उखाणे म्हणण्याची प्रथा लोकसमुहात प्रचलित आहे. उखाण्यांचा जन्म मानवाने अंगीकारलेल्या गोपनीयतून झाला असावा. पुढे मनोरंजनात्मक स्वरूपात मानवी इच्छा, प्रतिभा आणि विवेकीमूल्य आत्मसात केले आहे. अशा उखाण्यातून एक प्रकारचे लोकशिक्षणच मिळते असे म्हटले तर चुकीचे ठरू नये.

लग्नविधी, डोहाळे जेवण, हळदीकुंकू यासारखे विधी मोठ्या थाटामाटाने साजरे केले जातात. याप्रसंगी गावातील अनेक सुवासिनी स्त्रिया एकत्र जमतात. त्याच्या एकत्र येण्यातून पारंपरिक उखाणे घेण्यास सुरूवात होते. उखाण्यासारखा मौलयवान दागिना स्त्रियांनी जतन करून जोपासण्याचे कार्य केले आहे. विशेषत: ग्रामीण भागातील स्त्रियांना आपली कर्तबगारी आपले वैभव, आपला चांगुलपणा चारचौघासमोर ठेवण्याची संधी उखाण्याच्या माध्यमातून मिळते. बोलणे साधे असते आणि गोष्ट देखील जुनीच असते. पण नव्याने सांगितल्याचा आनंद हा वेगळाच असतो. जे सांगायचे ते मोजक्या शब्दात सांगितल्याचा हेवा, ईर्ष्या ऐकणाऱ्याच्या मनात निर्माण व्हावा अशा प्रकारच्या बोलण्यालाच 'उखाणा' असे म्हणतात. उखाण्याची रचना साधी सोपी सुटसुटीत तालबद्ध, लयबद्ध आणि कधी–कधी खटकेबाज असते. त्याचबरोबर लोकांचे मनोरंजन करणे त्याच्या बुद्धीला आव्हान करणे, त्याच्या ज्ञानात भर घालणे हे उद्देश उखाण्याच्या निर्मितीमागे असतात.

## उखाणा म्हणजे काय?

आज प्रचलित असलेल्या उखाण्यांची परंपरा अतिप्राचीन आहे. संस्कृत भाषेतील उखाणे दोन हजार वर्षापूर्वीचे आहेत. पाश्चात्त्य अभ्यासक फ्रेझर हा उखाण्यांचा शास्त्रोक्त विचार मांडणारा पहिला आधुनिक पंडित मानला जातो. उखाण्यांची परंपरा ही आपण लेखी पुराव्याच्या आधारे गृहीत धरलेली आहे. परंतु या आधी केव्हातरी याचे मौखिक स्वरूप असले पाहिजे. डॉ.दुर्गा भागवत यांनी उखाण्यांच्या प्राचीन परंपरेचा मुळापासून शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्त्य देशातील उखाण्यांची यादी दिली आहे. यातून जगातील प्रत्येक भाषेमध्ये उखाण्यांची प्रथा दिसून येते.

मराठीत उखाणा या संज्ञेला व्यापक स्वरूप आहे. कारण मराठीत अनेक प्रकारचे उखाणे सापडतात. कुटात्मक उखाणा त्यातील एक प्रकार आहे. उखाण्याच्या परंपरेत कुटात्मक उखाण्याची परंपरा सापडते. तसेच मराठी उखाण्याची परंपरा पाहिल्यास आपणास फक्त नाव घेण्याच्या उखाण्यांचीच परंपरा सापडते.

'उखाणा' म्हणजे 'आहाणा' गूढ अर्थाची म्हण वचन होय. उखाण्याचा प्रकार हा दैवतकथेप्रमाणे अत्यंत प्राचीन असून ही प्रथा अभंग आहे ती भंग न पावणारी आहे. ओवी आणि ग्रामगीताप्रमाणे गावगाड्यात नित्य नवनव्या उखाण्यांची भर पडत असते. उखाणा हा जगातील सर्व भाषेत आढळणारा वाङ्मयप्रकार आहे. अशा वाङ्मयप्रकाराचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या व्याख्या अनेक लोकसाहित्याभ्यासकांनी केल्या आहेत; परंतु मराठी भाषेतील उखाण्यांच्या संदर्भातील व्याख्या तोकड्या पडतात. कारण ज्या व्याख्या केलेल्या आहेत त्या व्याख्या 'प्रहेलिका' नावाने ओळखल्या जातात. मराठी लोकवाङ्मयात उखाणा ही व्यापक संज्ञा आहे. या व्याख्या फक्त कूट, कोडी किंवा कूटात्मक उखाण्यांचाच आहेत.

डॉ.मालतीबाई दांडेकर : ''नेमक्या शब्दातील चमकदार गूढ''[४] अशी उखाण्याची व्याख्या केली आहे. म्हणजेच त्या–त्या वस्तूचे वैशिष्ट्यपूर्ण अगदी मोजक्या शब्दात व्यक्त करणे हीच उखाण्याची खूबी आहे.
डॉ.साहेब खंदारे : ''वैशिष्ट्यपूर्ण आशयाभिव्यक्ती करण्यासाठी नेमक्या काव्यात्म शब्दात केलेली योजना''[५]

मराठीतील नाव घेण्याच्या उखाण्यांची व्याख्या करताना असे म्हणता येईल की, ''नाव सांगायचे ते सरळ शब्दात न सांगता जर वेगळी वळणे देऊन सांगितले तर ते ऐकणाऱ्याला आवडते. या रचनेच्या शब्दगुंफेला उखाणा असे म्हणता येईल.'' उखाण्यात बुद्धीपरीक्षण, गुप्तकथन, ज्ञानसंवर्धन आणि मनोरंजन याचे चित्रण आले आहे.

## नाव घेण्याच्या उखाण्याचे स्वरूप

डॉ.सरोजिनी बाबर उखाण्याच्या संबंधी म्हणतात, ''घरातल्या वडिलधाऱ्या बाईने कधी काळी केलेली गोष्ट केवळ एकूण जशीच्या तशी मनात साठवून घ्यावयाची आणि वेळप्रसंगी ठेवणीतल्या जिन्नसासारखे दिमाखाने बाहेर काढायची.''[६] असा उखाणा केवळ श्रवणाने आत्मसात झालेला असतो. त्याचा संग्रह तयार होत असतो. सणावाराला नवीन कपडे किंवा ठेवणीतील कपडे जसे आपण काढतो त्याप्रमाणे मनाच्या कप्प्यातून त्याला नवीन करून, नटून थटून आणले जाते अशा उखाण्यांची रचना लयबद्ध आणि तालबद्ध होण्यासाठी यमक आणि अनुप्रास अलंकार मदत करीत असतात. उदाहरणार्थ :

''महादेवाच्या पिंडीला हिरे माणिक मोती जोडले
............. रावाच्या संसारासाठी आईवडील सोडले''[७]

तसेच

''चांदीच्या समईत रेशमाची वात
................ रावाबरोबर करते संसाराला सुरूवात''[८]

अशा प्रकारे उखाण्यातून जे नाव घ्यायचे असते. त्या नावाला साजेसे वर्णन पहिल्या ओळीत असते. तर दुसऱ्या ओळीत त्या नावाची कलात्मक गुंफण केलेली असते. उखाणा घेऊन नाव घेणे म्हणजे एक मोठी कौशल्याची, कलाकुसरीची कसरत असते. उखाण्यातून पतीचे नाव घेण्याची पद्धत फार जुनी आहे. यासंदर्भाने डॉ. सरोजिनी बाबर लिहितात, ''पिढ्यानपिढ्यापासून चालत आलेले हे उखाणे म्हणजे लोकवाङ्मयाचा अनमोल असा खजिनाच! शब्दालंकार लेवून आलेल्या बोलीभाषेतल्या जणू त्या चालत्या–बोलत्या अजरामर कविताच. हे उखाणे कुणी लिहून पाठ केलेले नाहीत, तर एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे म्हणजेच एका स्त्रीकडून दुसऱ्या स्त्रीकडे संक्रमण तोंडीच झाले आहे. लग्नप्रसंग, हळदीकुंकू इत्यादी प्रसंगी सुवासिनी जमल्या की उखाणे घेण्याची भारतीय परंपरा आहे. आज एकोणिसाव्या शतकात उखाणे घेणे ही कालबाह्य गोष्ट होत चालली आहे. तो एक गावंढळपणाचा वाटू लागला आहे. परंतु पुर्वी पंचवीस वर्षांपूर्वी उखाणा घ्यावयाची अफलातून पद्धत होती.''[९] स्त्रियांनी नाव घेण्याच्या उखाण्याचे स्वरूप पाहता स्त्री मनाच्या कल्पनेचे मनोहर दर्शन, तिच्या कल्पनेतील अवीट गोडी मांडण्याचा प्रयत्न स्त्रियांनी उखाण्यातून केलेला आहे. अशा स्वरूपाच्या उखाण्याचे भाषिक सणंग पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## उखाण्याचे भाषिक सणंग

भाषा म्हणजे विचार व्यक्त करण्याचे साधन. भाषा ही माणसाच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ती मानवी जीवनाला वेढून टाकणारी गोष्ट आहे. मानवी संस्कृतीला पायाभूत ठरलेली आहे. उखाण्यांची भाषा ही कोणत्याही शैलीत गुरफटलेली नसून ती साधी, सोपी, सुटसुटीत वाक्यरचना समर्पक मांडणी आणि एक प्रकारची लय प्राप्त केलेली भाषा असते. ती लोकजीवनात प्रचलित असल्यामुळे तिच्यात जिवंतपणा असतो. नित्याच्या व्यवहारात रूढ असलेले शब्द असल्यामुळे मनाला गोडवा, आत्मीयता निर्माण करणारी गुंफण असते. उखाण्यातील भाषेत त्या–त्या परिसरातील लोकभाषेचे प्रतिबिंब पडलेले दिसते. उखाण्याच्या भाषेबद्दल सरोजिनी बाबर म्हणतात, ''उखाण्याचे अंत:करण मोकळे असते. त्यामधील विचार खेळकर असतात आणि त्यासाठी वापरली जाणारी भाषा चटकदार असते.''[१०] यामुळे लोकभाषेला समृद्ध करणारी उखाण्याची भाषा असते. उखाणे हे लग्नविधीशी आणि पती–पत्नीच्या वैवाहिक जीवनाशी संबंधित असलेला एक गेय स्वरूपाचा परिपूर्ण शब्दगंध आहे. म्हणून उखाण्यामध्ये लोकजीवनातील महत्त्वाचे संदर्भ जसे येतात तसेच लोकभाषेला समृद्ध करणारी शब्दकळा व प्रवाही

लय देखील येते. उखाण्यामुळे भाषा लोकाभिमुख आणि प्रवाही बनते. त्याचबरोबर संवादशीलता देखील वाढताना दिसते.

## भाषा लोकाभिमुखता

उखाण्यामध्ये येणारे संदर्भ आणि शब्द हे दोन्ही लोकजीवनातील व्यावहारिक संदर्भातून आलेले असतात. त्यामुळे मनात आलेले विचार अगदी सहजपणे, उत्स्फूर्तपणे उखाण्यातून व्यक्त होतात. उखाण्यांची निर्मिती होतानाच्या मनोवस्थेनुसार उखाणा तयार होत गेला. त्यावेळचा समाज, त्यावेळच्या पद्धती, चालीरिती उखाण्यातून व्यक्त होत गेल्या. त्याचप्रमाणे स्त्रीच्या मनातील आनंद, उत्साह, प्रेम, चीड, खंत हे आपोआप उखाण्यात उतरत गेले. कधी मनाची घालमेल तर कधी मनाच्या चेष्टेचा सूर त्यातून उमटत गेला. उखाण्यातून अनेक विषयांचे पदर उलगडत गेले. सासर माहेरचे धागेदोरे जुळलेले तर कधी दोन्ही घराण्यांच्या संस्कृतीचे रीतीरिवाजाचे दर्शन घडते, पतीबद्दलची आस्था, सासू–सासऱ्याचे प्रेम तर कधी त्याविषयीचा राग, तर कधी विनोदाच्या आधारे मनातील भावना व्यक्त झालेल्या दिसतात.

दैनंदिन जीवनव्यवहारात वापरल्या जाणाऱ्या वस्तू, घडणाऱ्या घटना आणि नात्यागोत्याच्या संदर्भाने उखाण्याची जडणघडण होते. अर्थात उखाण्यामधून व्यक्तित्त्वाची कल्पनाबंध, घटनावाची कल्पनाबंध आणि वस्तूवाची कल्पनाबंध दिसून येतात. उदाहरणार्थ:

''चांदीच्या समईत रेशमाची वात
भुजंगरावाबरोबर करते संसाराला सुरूवात''[११]

या उखाण्यात चांदीची समई, रेशमाची वात हे वस्तूवाचक कल्पनाबंध आहेत. भुजंगराव व्यक्तिवाची आणि 'संसाराला सुरूवात करणे' हा घटनावाची कल्पनाबंध आहे. अशा प्रकारच्या व्यक्तिवाची, घटनावाची आणि वस्तूवाची कल्पनाबंधामुळे उखाणा हा भाषेला लोकाभिमुख करताना दिसतो. उदाहरणार्थ :

''आदघरात मदघर, मदघरात पलंग
पलंगावर उशी, उशीवर बशी
बशीत होता चहा, चहात पडली माशी
शिवाजीराव गेले उपाशी
तर मी धरले एकादशी''[१२]

वरील उखाण्यात घर, पलंग, उशी, बशी, चहा हे वस्तूवाची, शिवाजीराव हे व्यक्तिवाची आणि 'एकादशी धरणे' हे घटनावाची कल्पनाबंध आहेत. उखाण्यातील कल्पनाबंधामुळे भाषेची लोकाभिमुखता वाढते. दैनंदिन जीवन व्यवहारातील वस्तू, घटना आणि लोक यांच्या एकत्रित अन्वयामुळे उखाण्यातील भाषा लोकजीवनाच्या प्रगटनाचीच भाषा ठरते.

## भाषा प्रवाही बनते.

उखाण्यातील शब्दबंध हे गयता प्रचूर असतात. लोकजीवनातील वस्तू, व्यक्ती आणि घटना यांच्या समन्वयीत स्वरूपाचा उद्गार लयबद्ध स्वरूपात उखाण्यांतून येत असतो. त्यामुळे भाषेला प्रवाहीपणा येतो. त्याचबरोबर उखाणा हा दोन चरणी असो वा चार चरणी असो या रचनाबंधात यमकाला अत्यंत महत्त्व असते. उत्स्फूर्त स्वरूपात म्हटलेला उखाणा विशिष्ठ समेसाठी आवर्तीत होतो आणि यमक साध्य करतो. त्यामुळे भाषेला आपोआप प्रवाहीपणा मिळतो. उदाहरणार्थ :

''नाजूक नाजूक अनारसे
साजूक साजूक तुपात तळावे
शंकररासारखे पती जन्मोजन्मी मिळावे''[१३]

या उखाण्यातून वस्तू आणि व्यक्ती यांच्या समन्वयीत निर्माण झालेल्या रचनेत लयबद्धता प्राप्त होऊन भाषेला प्रवाहीपणा प्राप्त होतो. त्याचबरोबर दोन चरणी, चार चरणी उखाण्याप्रमाणे जे दीर्घ उखाणे म्हटले जातात त्यातील अनुप्रास, लय, नाद, ताल आणि ठेका यातून शब्दचमत्कृती साधलेली असते. चरणाचे शेवटी यमक जुळविलेले लक्षात घेता भाषेचा प्रवाहीपणाचा एक सुंदर ओघ पुढील उखाण्यांतून आपणास दिसून येतो. उदाहरणार्थ
:

''पैशाची घेतली आरडी, पैशाची घेतली करडी
नणंदबाईच्या बाळंतपणाला, सासुबाईच्या फोडणीला
उरलं सुरलं शिक्यावर ठेवलं
शिकं तुटलं, मडकं फुटलं
लोट गेला येशी, नाव घेते काशी
शामरावची भाची, नाव घेते रत्नी, शंकररावाची पत्नी
नाव घेते एक, भोसल्यांची लेक
नाव घेते दोन, प्रदीपची बहिन
दारी पडलं ऊन, जाधवाची सून
आजवर हुती, मायबापाची ताणी
आता झाले ............... ची राणी.''[१४]

वरील उखाण्यात सुंदर कल्पनेतून आपल्याबरोबर घराचीही कशी काळजी घेतली आहे. अतिशय हुशारीने सासू, नणंदेला खुश करून आपले पाय भक्कम रोवते. 'सगळं तेल सांडल्यामुळे त्याचा लोट येशीला गेला' असे अतिशयोक्ती अलंकार, ताल, लय आणि यमक रचनाबंधामुळे उखाणाही झरझर पुढे सरकतो. एकातून दुसरे, दुसऱ्यातून तिसरे अशी सासर माहेरची सांगड घालत घालत 'आपण अजून तान्ही (लहान) आहोत, सासरच्यांनी सांभाळून घ्यावे' त्याचबरोबर लग्नानंतर एकदम मोठी झाल्याची व जबाबदारी वाढल्याची जाणीव होते. अशा उखाण्यांतून भाषा कशी प्रवाही होते याचा अनुभव येतो. सासर माहेरचं कौतुक सांगताना शब्दाचा बांध कोसळतो. बहीण कुणाची, भाची कुणाची, पुतणी कुणाची, मुलगी कुणाची आणि भावजय कुणाची हे सार उखाण्यातून आपल्या जिव्हाळ्याची, जिवाभावाची नाती सांगताना, उखाण्यातील भाषेला आपोआपच प्रवाहीपणाचा ओघ आलेला दिसून येतो.

## बोली भाषेचा साज

उखाण्याची निर्मिती लोकजीवनात होत असल्यामुळे त्या–त्या परिसरातील लोकांची नित्याच्या उपयोगाची लोकभाषा उखाण्यात असते. बोलीभाषा ही एखाद्या व्यक्तिसमुहापुरती आकलनीय अशी भाषा असते. ती एखाद्या ठराविक क्षेत्रात बोलले जाणारे रूप असते. ध्वनी, शब्द, वाक्यरचना, अर्थ, शब्दसमूह, वाक्यप्रयोग इत्यादी बाबतीत मूळ भाषेपेक्षा वेगळेपणा व साम्य धारण करणारी कोणत्याही सीमीत क्षेत्राची व काळाची भाषा म्हणजे बोलीभाषा. हे बोली भाषेतील अवशेष उखाण्यात अवतरलेले दिसतात. बोलीभाषा ही मौखिक असल्यामुळे बोली भाषेतील उखाणे मौखिक परंपरेने आलेले असतात. त्यामुळे बोलीभाषा आणि उखाण्यांची भाषा यांच्यात भाषिकदृष्ट्या साम्य दिसून येते.

उखाण्यांच्या भाषेत दैनंदिन व्यवहारातील अनेक शब्द येत असल्यामुळे एक प्रकारचा जिवंतपणा येतो. उखाण्यांची भाषा ही लोकांची बोली भाषा असते. उखाण्यांतील शब्द आणि भाषा लवचिक असते. उखाणा घेणाऱ्याप्रमाणे ती वाकते त्यामुळे या भाषेला एक प्रकारचे चैतन्य निर्माण होते. उखाण्यातील शब्द चालते बोलते असतात. त्यातून प्रत्यक्ष जीवनानुभवातून हे शब्द आलेले असल्यामुळे त्यांना त्या जीवनानुभवाचे संदर्भ लाभलेले असतात. त्यामुळे एका आगळ्यावेगळ्या पण जिव्हाळ्याच्या भाषेचा प्रत्यय देत अनेक अर्थपूर्ण शब्दांची दौलत उखाण्यातील भाषेत साठवलेली असते.

लग्नविधीचे उखाणे हा बोलीच्या श्रीमंतीचा उत्तम नमुना आहे. बोलीभाषेचे जेवढे म्हणून वैशिष्ट्ये आहेत ते सर्व उखाण्यांमधून पहावयास मिळतात. नादातालाच्या निर्मितीसाठी मूळ शब्दांच्या सोबत ओघाने निरर्थक शब्द योजिलेला बोलीच्या वैशिष्ट्यांचा आढळ पुढील उखाण्यात येतो. उदाहरणार्थ :

''आदघरात मादघर
मदघरात देवघर
देवघरात होती पोती
मी बसले वाचत
.............. राव आले नाचत''[१५]

या उखाण्यात पहिल्या ओळीत येणारे शब्द, बोलीच्या लय निर्मिती तत्त्वातून आलेले आहेत. तर 'राव' आले नाचत हा शब्दाबंध उत्साहाने धावतपळत येणे या अर्थाचा सूचक आहे. कारण बोलीत सूचकतेने अनेक अव्यावहारिक शब्द योजिले जातात. उदाहरणार्थ : जोरात बोलणाऱ्याला 'काय बोंबलायलास' असे म्हटले जाते. अशा प्रकारे उखाणे हे भाषेद्वारे बोलीच्या अत्यंत जवळ गेलेले असतात आणि त्यामुळे बोलीत अनेक नादमाधुर्य शब्दकळेची योजना उखाण्यात दिसून येते.

'उखाणा' म्हणजे लोकवाङ्‌मयातील अनमोल खजिना, शब्दालंकार लेवून बोलीभाषेतल्या जणू या चालत्या–बोलत्या अजरामर कविताच. लयबद्ध निरर्थक शब्दरचना व अर्थयुक्त पण लयबद्ध शब्दरचना उखाण्यात योजिल्याने उखाण्यांची भाषा बोलीच्या जवळ जाते. याचा आढळ पुढील उखाण्यात पाहायला मिळतो.

''नऊ महिने उदरी, सवा महिना बाजरी
जावळाच्या केसाला सुवास तेल, चंदने बेल,
बेला खाली कुंकू, कुंकवाखाली हाळद,
आईबाप पैशाचे बळद,
केळगाव शिवारी पाऊस पडला जिरा मनी
राम लक्षुमन पेरणी करी,
चाड ठेवलं तिपनीवरी, पिक आलं घस्यावरी
आवडाणे पडले पाचुंदे, गड्यानं केलं गोळा,
बनीम रचली गंगपुरी, खळं केलं सूर्यापुढं
आकनीचे केले मनी
........... राव माझे बावन लाखाचे धनी''[१६]

वरील उखाण्यातून ग्रामीण शेती व्यवहारातील चाड, तिफन, पाचुंदे, बनीम, खळ, आकनी यासारखे असंख्य ग्रामीण बोलीतील शब्द उखाण्यातून आलेले आहेत. त्यामुळे उखाणे हे भाषेद्वारे बोलीच्या अत्यंत जवळ गेलेले असतात.

## संवादशीलता

संवादशीलता हा भाषेचा अत्यंत महत्त्वाचा गुण असतो. संवादात्मक भाषा अधिक रूचीपूर्ण असते. भाषेतील या गुणाच्या वृद्धीसाठी उखाणे अत्यंत पूरक ठरतात. कारण उखाण्यांची भाषा ही मुळातच संवादशील भाषा असते. उखाण्यांतून होणारी अभिव्यक्ती ही स्वगत स्वरूपाची नसून उद्‌गार स्वरूपाची असते. हा प्रगट स्वरूपाचा उद्‌गार कुणासाठी तरी, कुणाला तरी उद्देशून केलेला असतो. त्यामुळे एक संवाद साधण्याचे मुक्तचिंतन उखाण्यांद्वारे घडत असते. याचा प्रत्यय पुढील उखाण्यातून येऊ शकतो. उदाहरणार्थ :

''चांदीच्या ताटात खडीसाखरेचे काजू
............निघाले कचेरीत फौजदार देती बाजू''[१७]

यासारख्या उखाण्यातून आत्मचिंतन प्रगटीकरणाच्या संवादाचा नमुना दिसून येतो. उखाणा सांगण्याच्या पद्धतीत समतत्त्व आणि संवादित्व ही सौंदर्यतत्त्वे असल्यामुळे उखाणा खुलतो. उखाण्यातील साधारण लांबीच्या ओळी पाठोपाठ कानी पडल्या तर समतत्त्व व शेवटी आलेल्या यमकातील अक्षरांच्या आवृत्तीमुळेच संवादीत्व निर्माण होते. याचा प्रत्यय पुढील उखाण्यातून येतो. उदाहरणार्थ :

''उभी होते तळ्यात, दृष्टी गेली मळ्यात
हजाराचा कंठा ............. रावांच्या गळ्यात
सोन्याची पाटली, हाताला दाटली
.............. रावाचं नाव घेताना खुशाली वाटली.''[१८]

वरील उखाण्यात दोन ओळींच्या आवृत्तीचा त्याचप्रमाणे 'मळ्यात', 'गळ्यात' व 'दाटली' व 'वाटली' या यमकाचा परिणाम जास्त होतो व काहीतरी एक सलग रचना ऐकायला मिळाल्यामुळे संवादी सौंदर्य जाणवते. उखाण्याचा पूर्वार्थ 'चल' राहून कमी जास्त झाला तरी चालतो पण उत्तरार्थ 'अचल' राखावयाचा व यमक योजावयाची ही पद्धती यामुळे संवादित्व जाणवते. अर्थात उखाण्यातील अभिव्यक्ती ही व्यक्तित्त्व स्वरूपाची

असली तरी ते उद्देशक असल्यामुळे त्याला संवादी स्वरूप प्राप्त झालेले आहे. अशा प्रकारे उखाण्यातून भाषिक योगदान दिसून येते.

## समारोप

मराठी लोकवाङ्मयाचा खजिना आणि भाषेचे सौंदर्य असलेल्या उखाण्यांची संपत्ती बायकांनी आपल्या मराठमोळ्या भाषेच्या बळावर व आठवणीच्या शक्तीवर वर्षानुवर्षे सांभाळलेली आहे. एका पिढीचे हे बोल खुशीखुशीने आणि मोठ्या भक्तीभावाने पुढील पिढीच्या हवाली केली आहे. उखाण्याला लोकवाङ्मय आणि लोकजीवनात महत्त्वपूर्ण स्थान आहे. उखाण्याची निर्मिती सर्वसामान्यांची निर्मिती असल्यामुळे समाजाच्या विविध भावभावना, इच्छा—आकांक्षा, रूढी, परंपरा, आचार—विचार, त्यांचे कल्पनाचातुर्य, कलाकौशल्य, बुद्धीवैभवाचा दिमाख आणि मनोरंजन प्रधानता इत्यादीचे दर्शन घडते. उखाण्यातून स्त्री मनाचे आणि स्त्री जीवनाचे जे दर्शन घडते यावरून त्यांच्या मनातील भावविश्वाचे जीवनमूल्यांचे आणि जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचे दर्शन आपल्याला होते.

## निष्कर्ष

१) उखाण्याच्या पाठमागे दीर्घ अशी परंपरा आहे.
२) उखाणा हा लोकवाङ्मयातील एक महत्त्वपूर्ण भाषिक प्रकार आहे.
३) महाराष्ट्राच्या सर्वदूर परिसरातील समाजजीवनात उखाण्याचा आढळ होतो.
४) उखाण्याचे स्वरूप हे गेयप्रधान आहे.
५) उखाण्याची भाषा लोकाभिमुख आणि प्रवाही बनते.
६) लग्नविधी, सण—उत्सवासंबंधीचे उखाणे हा बोलीभाषेच्या श्रीमंतीचा साज आहे.

## संदर्भ

१) डॉ.सरोजिनी बाबर, मराठीतील स्त्रीधन, प्रसिद्धी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ.क्र.१८७
२) डॉ.शरद व्यवहारे, लोकवाङ्मय रूप—स्वरूप, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, पृ.क्र.१९१
३) डॉ.पुरूषोत्तम कालभूत, लोकसाहित्य : स्वरूप आणि विवेचन, विजय प्रकाशन, नागपूर, पृ.क्र.२४२
४) डॉ.मालतीबाई दांडेकर, वाङ्मयशारदेचे नुपुर, वरदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती, पृ.क्र.१९२
५) डॉ.साहेब खंदारे, लोकसाहित्य : शब्द आणि प्रयोग, प्रतिमा प्रकाशन, पुणे, पृ.क्र.२७९
६) डॉ.सरोजिनी बाबर, लोकसाहित्य साजशिनगार, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समितीच्या वतीने प्रकाशित, पृ.क्र.१४०
७) संकलित उखाणा
८) संकलित उखाणा
९) माणगावे निलम, उखाण्यातून स्त्री—दर्शन, मनोदय प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती १९७७, पृ.क्र.५
१०) डॉ.सरोजिनी बाबर, जा माझ्या माहेरा, महाराष्ट्र राज्य लोकसाहित्य समिती प्रकाशित द्वितीय आवृत्ती, पृ.क्र.४२७
११) संकलित उखाणा क्र.११ ते १८

❖❖❖

# संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक चिंतन

**प्रा.डॉ. प्रमोद दामोदर देवके**
यशंवतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय
मंगरुळपीर, जि. वाशिम

**गोषवारा**

संताच्या विचारामागे निश्चीत अशी भुमीका होती .ती त्यांनी प्रमाणिकपणे पार पाडली. संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारामध्येही ती होतीच. तत्कालीन सामाजीक परिस्थीतीचे अवलोकन केले असता आपणास असे लक्षात येते की, समाजात अज्ञान, अंधश्रध्दा , बुवाबाजी खुप मोठया प्रमाणात होती. या काळात प्रचार माध्यमे मोठया प्रमाणात नसतांनाही संतानी भजन, किर्तन, प्रवचन, भाषण हया माध्यमाचा वापर करुन समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, बुवाबाजी नष्ट करण्याचा अहोरात्र प्रयत्न् केला. तसेच वाईट प्रथा, परंपरा, चालीरीती बंद व्हाव्या म्हणून दोघांनीही प्रयत्नांची पराकाष्ठा करुन समाज जागृती केली. आजही संत आणि संतविचारांची समाजाला आवश्यक्ता आहे.

**प्रस्तावना :-**

आपली भारतभूमी ही संतांची भुमी आहे. याच भुमीत अनेक संत महात्मे जन्माला आलेत. यामध्ये संत ज्ञानेश्वर ,संत नामदेव, संत एकनाथ, संत रामदास, संत तुकाराम, संत सावता माळी, संत चोखामेळा, संत गुलाबराव महाराज, संत आडकोजी महाराज तसेच निष्काम कर्मयोगी संत गाडगे बाबा व वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज होत. हया पुण्य् श्लोक भूमीत संतांनी केलेले कार्य अगाध आहे. या सर्वच संतांनी समाजाला समता, बंधुता,एकता , दयाभाव, परउपकार,सर्वधर्मसमभाव अशा गोष्टी शिकविल्या.

संत गाडगे बाबा व संत तुकडोजी महाराज यांनी समाजाला साधी सरळ शिकवण दिली. आगगाडीच्या दोन रुळाप्रमाणे समसमांतर अशी ज्यांची ध्येयधोरणे होती असे हे विदर्भाचे दोन दीपस्त्ंभ होत. “बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले” या उक्तीप्रमाणे यांच्या वाणीत व कृतीत अप्रतीम सुसंवाद आढळतो. हे दोन्ही संत बोलके सुधारक नव्हते तर कर्ते सुधारक होते. प्रत्यक्ष समाजात जाऊन व समाजाशी समरस होवून दोघांनी समाजजागृती घडवून आणली. अज्ञानाच्या जाळयात सापडलेल्या मानसाला मोकळे करण्यासाठी या दोन महापुरुषांनी केलेल्या प्रयत्नांना तोड नाही.

**संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सामाजिक चिंतन:-**

अ) **जनजागृती :**

संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी आपल्या कीर्तन, प्रवचन, भाषण, भजन या माध्यमातुन जनजागरण केले. गाडगेबाबा निरक्षर होते. म्हणून गाडगेबाबांनी लेखन केल नाही परंतु त्यांच समाज प्रबोधन करण्याच साधन मौखीक होत. मौखीक साधनातून त्यांनी आपले विचार जनतेमध्ये पोहोचविले. समाजामध्ये ज्या काही वाईट प्रथा, परंपरा आहेत, चालीरिती आहेत, त्या बंद व्हाव्यात असे

बाबांना वाटत होते. त्याचप्रमाणे समाजामध्ये चालत आलेली मुर्तीपूजा, अंधश्रध्दा व बुवाबाजी यावरही आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून प्रचार केला.

बाबांनी आपल्या कीर्तनातून हुंडया विरुध्द आवाज उठविला. लग्न कार्यात हुंडा देता घेता कामा नये. हुंडयाच्या प्रघाताने दोन्ही कुंटूंबे कर्जबाजारी होतात. नवविवाहिताचा संसार कर्जाच्या उकिरडयावर चालु करणे पाप आहे. श्रीमंतीचा खोटा थाट करण्यापेक्षा गरिबीला साजेसा झुणका भाकरीने साजरा करावा. असा प्रचार कीर्तनातुन करुन हुंडयाविरुध्द लोक जागृती केली.

बाबांनी शिक्षणाचे महत्व सुध्दा आपल्या कीर्तनातुन लोकांना पटवून दिले. शिक्षणाविषयी बाबा आपल्या -कीर्तनातून म्हणायचे: "मायबापहो, सध्याचे हे शिक्षणाचे युग आहे. तुम्ही तुमच्या अडानीपणाची फळे भोगीत आहात. तुमच्यावर आलेली पाळी तुमच्या मुलावर आणू नका, त्यांचे जीवन बरबाद करु नका, तुमच्या अज्ञानाचा फायदा घेवून सावकाराने खोटी गहानपत्रे लिहीली. तुम्हांला लुबाडले, कर्जबाजारी केले. रस्तोरस्ती हिंडवले. म्हणून तुम्ही आता तरी सावध व्हा, इव्हायाले पाहुणचार करु नका, बायकोला लुकडे घेवू नका, पण तुमच्या मुलाला शाळेत घातल्याबिगर राहू नका, ज्ञान हेच धन आहे"[१] यावरुन गाडगेबाबांना शिक्षणाविषयीचा असलेला कळवळा दिसून येतो.

संत गाडगेबाबा प्रमाणेच तुकडोजी महाराज यांनी सुध्दा भजन, भाषण या माध्यमातून लोकजागृती केली. सामुदायिक प्रार्थना, प्रचारक, सेवामंडळे, रामधून, ग्रामगीता ही साधने सुध्दा लोकजागृती करिता राष्ट्रसंतानी वापरली.

राष्ट्रसंतांनी आपल्या 'ग्रामगीता' हया ग्रंथामधून समाजजागृती करण्याचा प्रयत्न केला. वंदनिय राष्ट्रसंत हे आदर्श शिक्षक होते. समाज शिक्षक होते ते म्हणतात " विद्यार्थी हे राष्ट्राच्या भविष्याचे शिल्पकार आहेत त्यांना मिळणारे शिक्षण हे सर्वगीण विकास साधणारे असावे. त्यांच्या मनावर उत्तम संस्कार करणारे असावे. पदवीने पात्रता मानली जावू नये" असे ते म्हणतता.

दिखाऊ कपडे, कोरडी ऐट ।
नोकरपेशी थाटमाट ।
हे शिक्षणाचे नव्हे उदिष्ट
ध्यानी घ्यावे नीट हे आधी "।।[२]

असेही शिक्षणाविषयीचे विचार लोकापर्यंत पोहोचवून त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी आस्था निर्माण केली.

राष्ट्रजागवा, राष्ट्र जागवा,जागृत् व्हा तरुणांनो, मेरे सुंदर प्यारे भारत पर, दुश्मन की नजर ना लगे, किंवा सारा भारत रहे शिपाई, शत्रु को दहशाने यासारख्या वीररसाने भलेल्या भजनातुन लोकाना देशाविषयी, राष्ट्राविषयी जागविण्याचा प्रयत्न् केला.

वंदनिय राष्टसंत तुकडोजी महाराजांचे स्वप्न होते की, माणूस हा माणूसकीने परिपूर्ण असावा. प्रत्येक व्यक्तीचा सर्वांगीण विकास व्हावा. त्याला जीवनाचे शिक्षण मिळावे. तो स्वत:साठी व सोबतच इतरासाठी जगावा यादृष्टीने जनसमुदायाला मार्गदर्शन त्यांनी भजन, भाषणाव्दारे केले व जनजागरण केले.

**ब) रुढीप्रियता व अंधश्रद्धेवर टिका :**

गाडगेबाबांनी आपल्या धार्मिकतेचा आधार घेवून अनेक थोर साधुसंतांचे अभंगातील दाखले आपल्या , भजन , किर्तन, प्रवचनातुन सर्वसामान्य् जनतेला देवून त्यांना शिक्षणाचे महत्व् पटवून देवून या शिक्षणातुनच बाबांनी जनतेच्या वाईट चालीरीती दुर करुन सर्वसामान्य् जनतेची अंधश्रध्दा दुर करण्याचा प्रयत्न् केला आणि आपले अंधश्रध्दा निर्मूलनांचे कार्य सतत सुरु ठेवले.

"शेंदुर माखोनिया धोंडा । पाया पडती पोरे रांडा"[३]

गाडगेबाबा भारतीय लोकांना आपल्या प्रवचनातून सांगतात. तुम्ही या शेंदुराने माखलेल्या दगडाला देव मानुन आणि त्याच्या सतत पाया पडून त्याला नवस करण्यातच आपल्या जीवनाचे सार्थक मानु नका. दगडाच्या या मातामाय,मसोबा या देवता नसून हे सर्व ढोंग आहे. खरा देव हा मनुष्याच्या आत्म्यात आहे आणि आम्त्याची शांतीकरण हे सर्वात महान कार्य आहे. म्हणून बाबा लोकांना उपदेश करतात, तुम्ही दगडाच्या या मुर्तीपुजेच्या ढोंगातुन बाहेर या आणि वर्षानुवर्ष ज्या वाईट चालिरिती व प्रथा परंपरा आहेत त्यामध्ये स्वत:ला जखडून घेतलात. यातुन विज्ञान दृष्टीचा उपयोग करुन स्व:ताला सोडविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करा तीच तुमची खरी पुजा आहे.

गाडगेबाबांनी आपल्या बालपणी ग्रामदेवतेची पुजा पाहिली होती. देतोबा, खंडोबा, म्हैसोबा व मरीआई या देवतांना प्रसन्न् करण्यासाठी दिलेले पशुबळी ते उघडया डोळयांनी पाहत होते. बकऱ्यांचा तो केविलवाणाआवाज, कापणाऱ्यांचे रक्ताने बरबटलेले हात, गाडगेबाबा विसरत नव्हते. गावोगावी भटकंती करुन ठिकठिकाणच्या यात्रेत हजारो कोंबडया -बकऱ्यांचे बळी दिले जात त्याला बाबांनी विरोध केला. भटकंतीच्या काळामध्ये बाबा उपराई गावाच्या शादलबुवाच्या यात्रेत गेले. तेथे त्यांना दर गुरुवारी पंधराशे बकऱ्यांचे बळी देण्यात येत असल्याचे दिसले. पूर्णामायाचे सगळे पाणी लाल होवून जात असे. अकोला जिल्हायातील दोनद , जळगाव जिल्हातील वडदा, सोलापूर जिल्हातील मरीआई, मराठवाडयात वखरीला सटवाई, नाशिक जिल्हयात चंदनपूरचा खंडोबा, या साऱ्या देवतापुढे प्राण्यांचे बळी दिले जात असत. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हायातील बहुजन समाज हा ग्रामदेवतेच्या पाठीमागे लागुन मुकया प्राण्यांची हत्या करीता होता. तिर्थ म्हणून दारु प्राशन करीता होता. हे बाबांनी उघडया डोळयांनी पाहिले. हिंसा बंद करायची हे त्यांनी निश्चयपुर्वक ठरविले आणि या साऱ्या दंभढोंगावर कीर्तनातून प्रहार केले.

गाडगे बाबांनी गोपाला ,गोपाला देवकी नंदन गोपाला या नामसंकिर्तनाने संपूर्ण मानव समाजास सुज्ञ करण्याचा प्रयत्न केला. समाजाला देवधर्माचे खरे स्थान समजावून दिले. जनसेवा हिच ईश्वरसेवा हा विचार समाजाच्या मनात बिंबवला. खरा देव तीर्थात किंवा मुर्तीत नसून तो दारिद्री नारायणाच्या रुपाने आपणा सर्वासमोर उभा आहे. त्याची प्रेमाने सेवा करा, हा कानमंत्र बाबांनी दिला. तरी देखील देवासाठी तीर्थक्षेत्र धुंडाळणाऱ्या माणसांचे डोळे उघडावेत म्हणून संताचा पुरावा देत बाबा म्हणत होते.

"जत्ररा मे फतरा बिठाया । तीरथ बनाया पाणी ।
दुनिया भई दिवाणी । पैसेकी धुलधानी ।"[४]

पैसे देऊन देवाची पुजा करणाऱ्या माणसावर बाबा कडाडून टीका करत होते. अरे देव विकत भेटते काय? मेथीची भाजी हाय काय? कांदे बटाटे हायेत? अशा रीतीने बाबांनी देव दगडात नसून दीन दुबळयांच्या रुपात तो या दुनियेत भरुन राहीला असे सांगीतले. अंगारे , धुपारे, दोरे गंडे, आणि नवस करणाऱ्य माणसावर तर बाबा सपाटून टीका करत होते.

"नवसें कन्या पुत्र होती । मग का करणे लागे पती ।"[५]

अंधश्रघ्देमूळे समाज जीवन कसे हतबल होत जाते, हे बाबांनी अनेक पुराव्यातुन पटवून दिले. अंधश्रध्दतेच्या विळख्यात सापडलेल्या समाजाला नवविचारांच्या सुर्याचे दर्शन घडावे , यासाठी गाडगेबाबा जीवनभर धडपडले.

आपला देश खेडयापाडयांचा देश आहे. खेडयापाडयातल्या समाज अंधश्रध्दाळूआहे.या समाजाला अंधश्रध्देपासून दूर करुन गाडगे बाबांनी त्यांना विज्ञाननिष्ठ बनविले. खेडयापाडयातल्या समाजात पिढयान पिढया अज्ञान, अनारोग्य, आणि अंधश्रध्दा ठाण मांडून बसलेल्या आहेत हे गाडगेबाबांनी पाहिले अशा अंधश्रध्दाळू समाजाला बाबांनी बुध्दीनिष्ठ बनविले. त्यासाठी त्यांनी गावोगावी कीर्तन

केले.कीर्तनातून लोकांना जागृत केले. लोकांच्या मनातील आळसांच्या, अज्ञानाच्या आणि अंधश्रध्दतेच्या गाठी फोडल्या व समाजाला अज्ञान, अंधश्रध्देच्या खाईतून वर काढण्याचे काम बाबांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातुन केले.

गाडगे बाबांनी अंधश्रध्देवर तडाखेबंद प्रहार केले. आपल्या खेडयापाडयातील समाज अंधश्रध्देच्या मगर मिठीत सापडला आहे. हे बाबानी पाहीले. आजारी पडलेल्या मुलाला डॉक्टराकडे घेवून न जाता गावातल्या देवऋषीकडे घेवून जातांना पाहिले. देवाच्या नावाखाली मुक्या जनावरांना बळी देत असतांना पाहिले. हे सर्व पाहुनच बाबांनी लोकांना विज्ञानाच्या जगात नेऊन सोडले. अंधश्रध्दाळू मनात ज्ञान विज्ञानाविषयी श्रध्दा निर्माण केली. बाबांची कीर्तन म्हणजे अंधश्रध्दतेवर उघड प्रहारच होता. पिढयानुपिढया समाजमनात रुजलेल्या अंधश्रध्दांना काढून टाकण्याचे क्रांतीकारक कार्य बाबांनी केले. खऱ्या अर्थाने बाबा लोकशिक्षकच होते.

भारतीय समाजाचा विचार करता, असे आढळून येते की, आजच्या विज्ञान युगात सुध्दा देवाधर्माच्या खोटया कल्पनेवर हा समाज जगणारा आहे. देवदेवतांच्या मागे लागुन नवस- सायास, व्रतवैकल्य करतांना तो आढळतो . अशा या अज्ञानी लोकांचा फायदा समाजातील दांभीक लोक घेतात. त्याच्या अंधश्रध्दतेचा फायदा धेवून बुवालोक समाजाला लुबाडतात, सत्य् विसरुन लोक त्यांच्या मागे लागतात. पुत्रप्राप्ती , धप्राप्ती , इत्यादी गोष्टीसाठी लोक खोटयानाटया गोष्टी आणि भ्रामक कल्पनावर आंधळेपणाने विश्वास ठेवतात स्वत:च्या स्वार्थसाठी दुसऱ्या प्राण्यांचा जीव घेण्याची प्रथा आढळते. यातुनच नरबळी प्रथा उदयाला आली.

आजही वृत्तपत्रामधुन नरबळी प्रकरणे वाचायला मिळतात. तसेच देवदासी प्रथा या अंधश्रध्देतूनच निर्माण झाली आहे.. अशा अनेक प्रकारच्या रुढीप्रियता व अंधश्रध्दा यावर टीका करुन् समाज जागृती करण्याचा प्रयत्न् तुकडोंनी केला आहे. त्यांनी समाजाचे अगदी जवळून दर्शन् घेतले होते. त्याचा जन्म् तळागाळातील समाजात झाला असल्यामूळे या परिस्थितीची त्यांना पुर्ण जाणिव होती. ही सर्व समाजप्रवृत्ती लबाड लोकांनी तयार केली असुन त्यापासून सावध राहण्याचा इशारा तुकडोजींनी समाजाला दिला. जटा वाढवून, भगवी वस्त्रे परिधान करुन आणि भस्माचा पट्टा अंगाला ओढून लोकांना फसविणाऱ्या बुवाबाजीचाही त्यांनी मोठया मार्मिकपणे उपहास केला. या चमत्कारांना भुलु नका ती थाप असून हे समाजातील भोंदू स्वतांची थोरवी दाखवून आपल्याला लुटत असतात. अशा शब्दात त्यांनी लोकांना सावध केले. जुने ते सोने म्हणून त्याला कवटाळणे बरोबर नाहीतर जुन्या आणि नव्याचा समन्व्य साधुन योग्य् त्याची जोपासना करा व अयोग्य् ते दुर सारा असा उपदेश तुकडोजींनी तरुणांना केला आहे." महाराष्ट्रातील संत परंपरेने समाज जीवनातील कुजलेल्या कल्पनांचा विध्वस करुन् अनिष्ट् चालिरितींना व प्रथांना कालोचित वळण लावण्याचा वेळोवेळी प्रयत्न् केला आहे. यासंदर्भात विसाव्या शतकातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे कार्य अतिशय मोलाचे आहे" असे राम घोडे यांनी सुचित केले असून हा विचार राष्ट्रसंताच्या बाबातीत कुठेच कमी पडत नाही.

"जीर्ण ज्या चालीरीती, डोळे मिटूनी नाकारा
वेळ ही पाहुनी कर्तव्य् शोधा सायासे
आचरा सुविचार वृत्ती अनुभवाला येवुनी
अंधश्रेध्दा सोडूनी व्यवहार साधा धाडसे"

असे म्हणून तुकडोजी महाराजांनी अंधश्रध्देवर आणि रुढीप्रियेतेवर टीका करुन् व्यवहारवाद शिक्षविला आहे. म्हणून इतर संतांच्या तुलनेत राष्ट्रसंताचे कार्य वेगळे वाटते. नुसते देवभोळेपणाकडे न नेता समाजाला तुकडोजी महाराजांनी व्यवहारवाद शिकविला आहे.

**सारांश:**

भारताच्या पवित्र भुमीत अनेक संतांनी जन्म् घेवून त्या भुमीला पावन करण्याकरिता अतोनात प्रयत्न् केले. चंदनाप्रमाणे स्वत:चा देह झिजविला. समाजाला अज्ञानाच्या, अंधश्रध्देच्या , जातीपातीच्या, धर्मभेदाच्या कचाटयातून बाहेर काढण्याकरिता या विदर्भाच्या दोन संतानी भजन, किर्तन, प्रवचण, भाषण अशा साध्या साधनाचा वापर केला. ज्याला जन्मजात सामाजिक प्रतिष्ठा नाही अशा परिटाच्या घरात जन्मलेल्या संत गाडगेबाबांनी चमत्कार घडविणाऱ्या, बुवाबाजी करणाऱ्या, ढोंग करणाऱ्या लोकावर आपल्या किर्तनातून प्रहार केले. व संपुर्ण महाराष्ट्रामध्ये जनजागृतीचे महान कार्य केले. राष्ट्रसंतानी सुध्दा ग्रामीण भागातील माणूस जागृत व्हावा या करिता ग्रामगिता ग्रंथ लिहुन ग्रामनाथाला अर्पण केला. तसेच भजन,भाषण, प्रवचनाचा वापर करुन लोकजागृती घडवून आणली. लोकांच्या मनात राष्टीय एकात्मता सर्वधर्मसमभावाची कल्पन्ना रुजविण्यांचे कार्य त्यानी केले. त्यांची वाणी, लेखणी ,व खंजेरी जनहितार्थ , राष्ट्रहितार्थ झटली. संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या विचारांची गरज आज सुध्दा देशाला व समाजाला आहे असे मला वाटते.

**निष्कर्ष :-**

१) श्री संत गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे ध्येय भजन, कीर्तन व प्रवचनाच्या माध्यमातून जनजागृती करणे हे होते.
२) देवाधर्माच्या नावावर समाजात चाललेले अवडंबर नि समाजिक अपप्रवृत्ती नष्ट् करण्याचे क्रांतीकार्य दोघांनी केले.
३) अंधश्रध्दा,बुवाबाजी, जातीभेद , पंतभेद, पक्षभेद कायमचे मिटावे व सर्व समाजातील लोकांनी गण्यागुविंदाने नांदावे. असे दोघांनाही वाटत होते. त्या करिता त्यांनी कीर्तनातून जहाल वाणीने प्रहार केले.
४) जनजागृती करिता संत गाडगे बाबानी जनसामान्यांच्या बोली भाषेचा वापर केला. तर राष्ट्र संतानी मात्र हिंदी व मराठी या दोन्ही भाषेचा वापर केला.
५) संत गाडगे बाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे नुसते बोलते सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते.

**संदर्भ :**

१) भगत प्राचार्य रा.तु. : लोकशिक्षणाचे शिल्पकार : पृ.क्र.–१५
२) संपा. मोहोड बाबा : श्री. गुरुदेव मासीक (ऑगष्ट ७०) : पृ.क्र. - ०१
३) जंवजाळ अशोक : थोर पुत्र मानव डेबुजी : पृ.क्र. -०४
४) ठाकरे प्रबोधनकार : श्री. गाडगे बाबा : पृ.क्र. - ६५
५) ठाकरे प्रबोधनकार : श्री. गाडगे बाबा : पृ.क्र. – ६९

❖❖❖

# अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीतील स्त्री चित्रणे

डॉ. निशा जोशी
मराठी विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय, कुऱ्हा

## गोषवारा —

अज्ञानाने आणि दारिद्रयाने पीडित गरीब,दलित स्त्रियांचे जगणे समाजामध्ये दिसत होत. त्यांच जगण समाजापुढे मांडणे अण्णाभाऊ साठे यांना गरजेचे वाटले. परिणामी त्यांनी त्यांच्या साहित्यातून स्त्रियांचे चित्रण केले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी एकूण पसतीस कादंबरीचे लेखन केले. यामध्ये त्यांनी निरीक्षण केलेल्या व ते ज्या समाजामध्ये जगत होते त्या समाजात आलेल्या अनुभवावरुन स्त्रियांचे चित्रण केले आहे. याबाबत त्यांनी 'आबी' च्या प्रस्तावनेत म्हटले आहे की,—'जे जीवन मी जगलो, जे जीवन अनुभवले तेच मी लिहीत आहे.' ज्या माणसांची दु:खे, व्यथावेदना, त्यांनी चितारली ती त्यांची होती. ती कल्पनेतल्या जगातली नव्हती. माणुसकीसाठी, अन्नासाठी, बेभान झालेल्या या स्त्रियांच्या वृत्ती कधी—कधी वाचकांना भडक व खोटया वाटतात. पण अठराविश्वे दारिद्रयात मातंग समाजाची स्त्री जगत होती. तिला आर्थिक स्वातंत्र नव्हते, ती स्वत:च्या पायावर उभी नव्हती. म्हणुन ती वाचकांना बेताल, बेबंद, व मर्यादा सोडुन वागणारी वाटली. परंतु अन्याय जुलुमाच्या रगाडयात सापडलेली माणसे मग ती स्त्री असो की, पुरुष सहनशीलतेचे बंध झुगारुन असेच बंड करतात. त्याचच दर्शन अण्णाभाऊ साठे यांनी त्यांच्या कादंब—यातुन केले आहे. त्यापैकी आवडी, रुपा, चित्रा या नायिकाप्रधान कादंब—यांचा या पेपर मध्ये विचार करणार आहे.

बीजशब्द — अण्णाभाऊ, कादंबरी, स्त्री चित्रणे, साहित्यविषयक दृष्टी

## प्रस्तावना —

कादंबरी हा वाड्मय प्रकार जीवनाचं अत्यंत सखोल आणि साकल्यानं दर्शन घडविणारा वाङ्मय प्रकार आहे, आजपर्यंत अनेक विषयांवर कादंबरी या साहित्य प्रकाराच्या माध्यमातून मानवी जीवनाचं अत्यंत मार्मिक असं वर्णन केल्या गेलेले आहे. कादंबरी म्हटली की आपल्या डोळयासमोर उभा राहतो तो जीवनातील बारीक सारीक तपशील व कंगोरे घेवून येणारी कथा. म्हणूनच मानवी जीवनात कादंबरीला महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. दलित कादंबरीचा विचार करतांना प्रकर्षाने जाणवते ते त्या कादंबरीतील चित्रित होणारे वास्तव होय. कारण मुळात दलित साहित्य जन्माला आले तेच मुळी सांस्कृतिक उठावाचे विद्रोही शब्दरुप घेवून. ते स्वाभाविक आहे, पिढयानपिढयापासून असहायतेच्या गर्तेत सापडलेल्या समाजाला जेव्हा शब्द सापडतात तेव्हा ते शब्द न राहता क्रांतिकारी तत्वज्ञानाच्या रुपाने आविष्कृत होतात.

## विषय विवेचन —

अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबरीचा विचार करतांना लक्षात येते ते तिचे प्रभाविपण. अण्णा भाऊ साठे यांच्या चित्रा, रुपा, आवडी या तीन कादंबरीतील स्त्री चित्रणांचा व त्याअनुषंगाने कादंबरी निर्मितीच्या अंगाने विचार करणार आहे. त्यांच्या साहित्य निर्मिती संदर्भात ते स्वत: म्हणतात की, मी जे जीवन जगलो, जगत आहे नि जे अनुभवल आहे, तेच ते लिहितात. सत्य रेखाटतांना भोवतालचे वातावरण ते इतके जिवंत करतात की, वाचतांना अंगावर रोमांच तरी उठावेत अथवा घाम तरी फुटावा. त्यांच्या कादंबरीतील विचारी आणि विकारी मनाचे दर्शन घडवितांना अण्णा भाऊ साठे कधीही स्वप्नसृष्टीत रमत नाहीत. जगण्यासाठी लढणा—या माणसांची कथा ते सांगतात. त्यांच्या कादंबरीत निरनिराळी माणसे रंगविली आहेत. पण सर्वांच्या रक्तातून एकच लढावू इर्षा वहातांना दिसते. मग ते स्त्री पात्र असो की, पुरुष पात्र असो. अंगात असेल नसेल तेवढे बळ एकवटून त्यांना आक्रमक वृत्तीशी सामना द्यायचा आहे आणि त्यामध्ये जिंकायचे देखील आहे. दैन्य, दारिद्रय हयांनी कावलेल्या आणि खंगलेल्या जीवनात जी विसंगती आणि अपूर्णता निर्माण होते, त्यातच त्यांच्या विनोदाचे बीज रुजले आहे.

वास्तवतेला फाजील महत्व देणारा म्हणून काही मित्र त्यांच्यावर रागावतात, पण ते त्यांचा राग मानीत नाही आणि आपला खाक्या देखील बदलत नाही. वास्तवता आणि कल्पकता यांचा मेळ कसा घालावा हा एकच यक्ष प्रश्न त्यांच्यापुढे असतो. असे आवडी कादंबरीच्या प्रस्तावनेत नमूद करतात.

आवडी:— आवडी ही अण्णा भाऊ साठे यांची अकरावी कादंबरी आहे. या कादंबरी असलेल्या पात्रांबाबत ते माझी माणसं असा शब्दप्रयोग करतात. त्यामधून त्यांची साहित्यविषयक दृष्टी लक्षात येते. या कादंबरीला शब्दरुप देण्यापूर्वी अण्णाभाऊ साठे यांनी चार वर्ष विचार केला. कारण 'आवडी' चे प्रेत गोरीतून बाहेर काढले तेव्हा प्रचंड देहाचा धनाजी लहान मुलाप्रमाने रडत होता. त्या प्रसंगाचा परिणाम म्हणून या कादंबरीचा जन्म झाला.

'आवडी' ही तांदळगावच्या तात्याबा चौघुला पाटलाची मुलगी, तात्याबा पाटलाचं घर आनंदान भरलं होत. त्याच्याकडे पोटापुरती जमीन, चार बैल, गाई, म्हशी, मेंढरं, कोंबडया याला काही कमी नव्हते. त्याची मोठी मुलगी सारजा नांदगावात सुखी होती. तिच्या पाठचा नागू पहिलवान म्हणून ख्याती पावला होता. तो फड गाजवित होता. तर कधी कुस्ती न खेळता खंडणी सारखी रक्कम घेवून येत होता. नागूनं कुस्ती केली की, तात्या व आवडी यांना आनंद आणि अभिमान वाटत होता. आवडी भावाला ओवाळत होती. बहिणीवर माया करणारा हाच नागू तिच्या जिवावर उठतो, हे असे का घडते? या प्रश्नाचे उत्तर आपल्या समाज रचनेत आहे.

आवडी ही दिसायला सुंदर, त्यामुळे तात्याबाला तिचा अभिमान होता. तिच्यासाठी वर शोधतांना तो म्हणत होता ''कुरीन पैसा पेरीन, पण आवडीला साजंसाच नवरा शोधीन. मेंढराच्या अंगावर लोकर पुष्कळ असते, म्हणून का कोणी त्याच्या गळयात माणिक बांधतं? मेंढरु ते मेंढरु आणि मोर तो मोर!''[१] असे म्हणत. आलेल्या पाहुण्यांना मुलगी पसंत पडली तरी तात्याबाला मुलगा पसंत पडत नव्हता. आवडीवर नागुचा फार जीव होता. तो तिचे लाड करीत असे कुस्तीवरुन येतांना तिच्यासाठी पेढे आणीत असे. तांदळवाडीच्या धनाजी येतो, त्याला पाहून आवडी दिपल्यासारखी होते. हे धनाजी हेरतो आणि हिच गोष्ट नागुला आवडत नाही. तो बोरगावच्या भगवंतराव पाटलाच स्थळ आवडीसाठी आणतो, त्यांचा मुलगा उत्तम देखणा तरुण असल्याने तात्याबाला पसंत पडतो. पण त्याला मिरगी येते हे माहित असूनही नागू घरी सांगत नाही. लग्न झाल्यावर आवडीला कळते. ती त्याच्याशी संबंध ठेवत नाही. बंड पुकारल्यासारखी वागते. माहेरी परत येते, पण 'दिल्या घरी नाहीतर व्याल्या घरीच मेल पाहिजे'. असे म्हणून तिला सासरी पाठविल्या जाते. पण तिला उत्तमची भीती वाटते कारण त्याला फेफर आलं की त्याच्या हाती जे लागेल त्याचा चक्काचूर करायचा. जळतं, पेटतं, कुढतं नांदू लागली. अशातच एक दिवस धनाजी वाडयात आला. तिचा जीव भेटीसाठी आतूर झाला. उत्तमला शेतात जेवण देण्याच्या निमित्ताने ती धनाजीला भेटू लागली. धनाजीच्या 'तूप नि पत्रावळ दोन्ही हवं!' या संकेताला होकार दयायला सिद्ध झाली. आवडी कायमची धनाजीकडे आली.

आवडीच्या या निर्णयाने सासर व माहेर दोन्हीकडे वणवा पेटला. रामोशाच्या घरी आवडी गेली हे पाटील समाजाला पटल नाही. त्यासाठी बैठका झाल्या पण आवडीला पाटील समाजाच्या हवाली करायला धनाजी तयार झाला नाही. कारण पाटील समाज तिला मारायची भाषा करीत होता. उलट धनाजी 'भीतीनं खचून जाणारी औलाद नव्हं. मी आवडीच्या मानेवर मान तोडून घेऊन मरणार'[२] असे म्हणाला. धनाजीची ती नेकी, प्रेम करण्याची झुंझार रीत पाहून ती सुखावली. पण नागूच्या मनात काही निराळेच बेत शिजत होते. त्याने मोठी बहिण सारजाला हाताशी घेवून कट रचला. बहिणीच्या सुखापेक्षा घराण्याची इज्जत मोलाची वाटत होती. सारजा आवडीच्या घरी आली. तिने प्रेमाचे नाटक केले, आणि आवडीला नागूच्या हवाली केले. ज्या बहिणीवर माया केली त्याच बहिणीचा नागुने कु—हाडीने खून केला.

रुपा:—रुपा ही अण्णा भाऊ साठे यांची स्त्री प्रधान कादंबरी आहे. अण्णा भाऊ साठेच्या इतर कादंबरीतील नायिकांप्रमाणे रुपा देखील दिसायला सुंदर आहे. आई नानुबाई आणि वडील आबाजी यांची लेक असणा—या रुपाचे वेड गावातील तरुण पोरांना लागले आहे. गजा नांगरे नावाचा गावातील टारगट पोरगा तिच्या मागे हात धुवून लागतो. तिला आपल्या ताब्यात करण्यासाठी तो गावातील मथी नावाची बाई हाताशी घेतो. मथी ही शिरगावात आघाडीची कुंटीण समजली जात होती. गजा तिला पैसे देउन रुपाला फितवण्याच्या कामगिरीवर पाठवतो. मथीबाई तिला एकांतात गाठून आपलं कुंटीणीचं कसब पणाला लावते. ''तू पैशाची काळजी करु नग. मी पैसं कुरानं पेरीनं. मातर.......''[३] असे गजा तिला म्हणतो. रुपा आणि मथी यांच्या सारख्या गाठीभेटी वाढत चालल्या. तर इकडे रुपाच्या घरी नानुबाई आबाजीला रुपाचे लग्न आता जमले पाहिजे असे सारखी बजावत असते. शिरगावातील दिनकरचा स्वभाव रुपाला आवडत होता, कारण तो उथळ नव्हता आणि काटेकोर वागत होता. पण मथीला रुपा

भेटते हे कळल्यापासून तो नाराज होता. तिला म्हणाला ''आणि ऐक. जेव्हा तुझा कडेलोट होउन तू नरकात जाशील आणि आबाजी खोताच्या तोंडाला डांबर फासून मोकळी होशील त्या दिवशी ती वेळ येणार आहे''[४] दुसरीकडे गजा रुपाला कसे कुठे गाठावे याचा विचार करीत होता. प्रसंग पडला तर कु—हाडीने मुडदे पाडायची तयारी करीत होता. तर दिनकर बंदूक भरुन गजाला मारण्यासाठी तयार होता.

दिनकर आणि गजा नांगरे हे दोघे जिवाभावाचे मित्र होते. दिनकरचे रुपावर प्रेम आहे, हे गजाला माहित असूनही तो रुपाच्या मागे लागतो. दिनकर आणि गजा याच्यात मारामारी होते. दिनकर गजाला बंदुकीच्या दस्त्यानं मारतो. त्यामुळे डंगारणे आणि नलावडे यांच्यात लढाईची तयारी सुरु होते, दोन्ही गट समोरासमोर उभे ठाकतात. परंतु धोंडीबाच्या समजुतदारपणामुळे युद्ध टळते. परंतु दिनकर आणि गजातील वैर मात्र कायम राहतेच. गजा ''मी रामराव नलावडयांचा निर्वंश करीन तरच डंगारण्याचं नाव सांगेन''[५] अशी प्रतिज्ञा करतो. तसे प्रयत्नही करतो, पण अपयशी होतो. शेवटी प्रकरण मिटते दिनकर आणि रुपा यांचा विवाह होतो. पण दिनकर रुपाच्या लग्नाच्या वरातीमध्ये दिनकरला मारण्याचा कट गजा करतो. दिनकरवर बंदुकीचा नेम धरतो पण त्याचे मित्र सावध असतात, म्हणून त्याचा कट फसतो व गजा पकडला जातो. त्याला पोलीसांच्या ताब्यात दिले जाते.

चित्रा:— चित्रा ही अण्णा भाऊ यांची एक स्त्री प्रधान कादंबरी आहे. या कादंबरीच्या जन्मकथेबाबत स्वत: अण्णा भाऊ म्हणतात की, ''क—हाड —कोल्हापूर सडकेला एक भाची व एक मामा अशी दोन माणसे भेटली. त्याचवेळी एका तरुणीच्या जीवनाचे धागे सापडले''[५] पण पुढे हीच तरुणी आपल्या कादंबरीची नायिका होईल याची मात्र त्यावेळी त्यांना कल्पना नव्हती. त्या दारिद्रयाने होरपळून निघालेल्या तरुणीचे पुढे काय झाले असेल हा प्रश्न आणि त्या तरुणीचा जीवनावरचा दुर्दम्य विश्वास या दोन गोष्टी कादंबरी जन्माला येण्याला कारणीभूत झाल्या.

कादंबरीवी नायिका 'चित्रा' ही आईच्या पोटात असतांनाच तिचे वडील वारले. आई सखुबाईने सोनाला घेऊन माहेरची वाट धरली. माहेरी भाऊ आपल्याला दूर लोटणार नाही हा सखुबाईचा विश्वास होता. काही दिवस भाऊ कृष्णाने मदत केली. तो तरी काय करणार कारण तो स्वत: काम करीत नव्हता त्याच्या दोन बायका राबराबून त्याला आणि सहा मुलांना पोसत होत्या. सखुबाई व मुलींची दारिद्रयाने अन्नान दशा झाली. वृद्धापकाळामुळे सखुबाईकडून काम होत नव्हते. दोघी बहिणी लोकांचे दळनकांडण करुन घर चालवत होत्या. तर दिसायला सुंदर असल्याने गावगुंड हात धुवून मागे लागले होते. आळीतील लोक सखुबाईला दोष देऊ लागले. तिही मनात झुरत होती. तिने कृष्णाला गळ घातली की कसेही कर मुलींच्या लग्नाचे पहा. तेव्हा कृष्णाने मुलगा पाहिला सोनाचे लग्न लावून दिले. पण तिचे दुर्दैव काही पाठ सोडत नव्हते. कारण ज्या वराशी तिचे लग्न लावले त्याला महारोग होता म्हणून त्याने दुस—याच दिवशी एवढी सुंदर बायको मला नको मला सोडचिठ्ठी दया अशी पाटलाला गळ घातली, आणि सोनाची सोडचिठ्ठी झाली. पुढे कृष्णा मुंबईला गेला अणि सांगु लागला की तो सोनाचे लग्न ठरवून आला. पण खरे संकट तर पुढेच आहे याची कोणालाच कल्पना नव्हती. कारण कृष्णाने सोनाला वेश्या व्यवसायाकरिता पैसे घेऊन विकली होती.

सोना पैसा पाठवत होती आणि कृष्णा मजा मारीत होता. सखुबाईचे दारिद्रय तसेच होते. सोनाच्या पैशावर चित्राचे लग्न तो जमवतो. लग्न पार पडते पण दुस—याच दिवशी तिचा नवरा चंदुच्या कानात गोम जाते तो वेदनेने तडफडून मरतो. 'जावा खरं, पन आपली मुलगी बी घेवून जावा. आता तिला कोन धनी हाय!'[७] अशी तीची सासु म्हणते व चित्रा परत माहेरी येते. बाप्या पवार नावाचा गावातील टारगट माणूस चित्रासाठी वेडा झाला, तो बनीला चित्राला पटविण्यासाठी सांगतो. सोनाने पाठविलेल्या पैशाच्या पावसाने चिंब भिजलेला कृष्णा आता चित्राला मुंबईला पाठविण्याचे स्वप्न पाहू लागला. घरावर सोन्याचे कवेलू टाकण्याचे मनसुबे रचु लागला. सोनाच्या पैशावर कृष्णा मजा करीत होता, पण सखुबाई आणि चित्रा मात्र दोन वेळच्या जेवनाला मोताद होत्या. ही वास्तवता सोनाला माहितच नव्हती. उलट कृष्णा चित्राविषयी सोनाचे कान भरत होता.

कृष्णा चित्राला घेवून मुंबईला पोहचतो. तिथे गेल्यावर चित्राला कळते की, सोनाचे लग्न झाले नसून मामाने सोनाला विकले आहे. त्यामुळे तिला मामाचा राग येतो. सोनाला तर त्याला हाकलून द्यावे वाटते पण दुखवल्याने तो आईला छळेल म्हणून ती गप्प बसते. दोघी बहिणी मुंबई पाहतात. पण चित्राचे दुर्दैव इथेही पाठ सोडत नव्हते. तिथे लाल्या तिला वाइट नजरेने पाहत होता. सोनाने तिच्याकडे येणारा सोन्याचा व्यापारी कांतीलाल सेठला सोनाशी ओळख वाढवून लग्न करायला राजी करते. तो एक सज्जन म्हणून तिला चित्राचे त्याच्याबरोबर लग्न व्हावे असे वाटते. त्या हेतूने कांतीलाल प्रयत्न करतो. त्याचवेळी जनरल देखील चित्रासाठी वेडा होतो. चित्राला मात्र आईने सांगितलेला 'जिवाच्या मोलानं अब्रु जप' हा सल्ला आठवत असतो. कांतीलाल चित्राला

फिरायला नेतो, चित्रपट दाखवतो. पण एकदाही मर्यादा सोडून तो वागत नाही म्हणून तिला तो आवडायला लागतो. तो एक दिवस चित्राला फिरायला नेल्यावर तू माझी होशील का असे विचारतो. चित्राला आनंद होतो पण दुस—या क्षणाला तो आनंद नाहीसा होतो, कारण तो तिला सांगतो की, त्याच्याकडे पुरुषत्व नाही. 'शेतीआड चोरी आणि नव—याआड शिंदळकी' करायला परवानगी देणारा हा माणूस माणूसच नाही. असे तिला वाटते, तिला त्याचा राग येतो.

चित्रा सोनाकडून निघुन जाते. पण जायचे कुठे हा प्रश्नच असतो. तिला आठवते की, तिच्या गावातील तानुकाकु माटुंगा लेबर कॅपला राहते. चित्रा टांगा करुन माटुंग्याला जाते. तिथे ती तानुकाकु बरोबर मिलमध्ये कामाला जाते. तानुकाकुचा नातु जया तिचा लहानपणीचा सवंगडी आहे. तिला तो आवडायला लागतो. खलाशी संप करतात, त्यांना साथ देण्यासाठी मीलमधील कामगार पण संप करतात. संप मोडून काढण्याचा सरकार पुरेपुर प्रयत्न करते. त्या चकमकीत जया जखमी होतो. त्याला दवाखाण्यात पहायला तानुकाकु व चित्रा जातात. तिथे जखमी सोनाला भरती करायला आणले असता दोघी बहिणींची भेट होते. तानुकाकु दवाखाण्यातच चित्रा व जयाचे लग्न होणार हे जाहिर करते.

या कादंबरीबाबत एका मित्राने 'या कादंबरीत कल्पकता किती आहे आणि वास्तवता किती आहे.' असे विचारले असता अण्णा भाऊ म्हणतात की, या भांडवली जगात कल्पनेलाही लाजवणारी वास्तवता वावरत आहे पण ती वास्तवता भयंकर असते आणि त्या वास्तवतेतूनच माझ्या हया कादंबरीचा जन्म झाला आहे, असे ते म्हणाले.

## निष्कर्ष —

अण्णाभाऊ साठे यांच्या आवडी, रुपा, चित्रा या नायिकाप्रधान कादंब—यांचा अभ्यास केला असता, समोर आलेले निष्कर्ष असे की, त्यांनी त्यांच्या कादंब—यातून चित्रित केलेल्या नायिकांमुळे मातंग समाजातील स्त्रियांचे जीवन समाजापुढे आले आहे. त्यांचे साहित्य समताधिष्ठीत असून सामाजिक परिवर्तनाला दिशादर्शक ठरले आहे. ही स्त्री आत्मशोध घेण्यास प्रवृत्त झाली. व तिच्या अस्मितेचा हुंकार या पुढील काळात निर्माण झालेल्या साहित्यामधून अभिव्यक्त झाला. कादंब—यांमधून आवडी, रुपा, चित्रा या स्त्रिया त्यांच्या समाजातील स्त्रियांचे प्रतिनिधीत्व करतात.

## संदर्भ —

१'आवडी' अण्णा भाऊ साठे, सुरेश एजन्सी, सहावी आवृत्ती पृ. २४
२ 'आवडी' अण्णा भाऊ साठे, सुरेश एजन्सी, सहावी आवृत्ती पृ. ५७
३ 'रुपा' 'आवडी' अण्णा भाऊ साठे, अक्षय प्रकाशन, आ. २०१६, पृ ८
४ 'रुपा' 'आवडी' अण्णा भाऊ साठे, अक्षय प्रकाशन, आ. २०१६, पृ १३
५ 'रुपा' 'आवडी' अण्णा भाऊ साठे, अक्षय प्रकाशन, आ. २०१६, पृ ३५
६'चित्रा' प्रस्तावना, अण्णा भाऊ साठे, विद्यार्थी प्रकाशन
७'चित्रा' अण्णा भाऊ साठे, विद्यार्थी प्रकाशन पृ. २२

❖❖❖

# महात्मा फुले यांचे वाङ्मय

प्रा. दिलीप घोनमोडे
संशोधक
विभागप्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय,
आरमोरी, जि. गडचिरोली

डॉ. जगदीश मेश्राम
मार्गदर्शक
विभागप्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,
ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर

प्रस्तावना :—

आधुनिक भारतात १९ व्या शतकात महात्मा ज्योतीराव फुले यांचे समाजक्रांतीकारकत्व अनन्यसाधारण आहे. त्यांनी ललितलेखनपर 'तृतीयरत्न' नाटक, 'शिवाजी महाराज' आणि 'विद्याखात्यातील ब्राम्हण पंतोजी' हे दोन पोवाडे, 'ब्राम्हणाचे कसब' व 'शेतकऱ्यांचा असूड' हे वैचारिक ग्रंथ आणि 'गुलामगिरी' हा शोधपर ग्रंथ 'अखंडादी काव्यरचना' व 'सार्वजनिक सत्यधर्म' हा नवसमाजरचना ग्रंथ इत्यादी ग्रंथ निर्मिती केली. या सर्व ललित व ललितेत्तर साहित्याचा अभ्यास केला तर महात्मा फुले यांचे साहित्यिक कार्य हे त्यांच्या सामाजिक कार्याला पुरक असल्याचे दिसते. मा. गो. माळी, एन. डी. पाटील, य. दि. फडके, हरि नरके, धनंजय कीर या संशोधकांनी त्यांनी केलेल्या कार्याचा सामाजिक व साहित्यिक अभ्यास महात्मा फुल्यांच्या जीवनसंग्रामाचे स्मरण करून देतो.

## ➢ महात्मा फुले :—

११ एप्रिल १८२७ ला एका माळी समाजात जन्मलेल्या या महापुरूषाने प्रतिकूल परिस्थितीत आपले शिक्षण व समाजसुधारणेचे कार्य अविश्रांत सुरू ठेवले. आयुष्याच्या शेवटी २८ नोव्हेंबर १८९० पर्यंत सतत स्त्रीशूद्र व अतिशूद्रांची पर्यायाने बहुजन समाजाची काळजी वाहणाऱ्या या महात्म्याने साहित्य व समाजकार्याच्या रूपाने केलेल्या कार्याचा अभ्यास म्हणजे प्रस्तूत शोधनिबंध होय.

## ➢ महात्मा फुले यांचे 'तृतीय रत्न' :—

१८५५ ला प्रकाशित झालेल्या या नाटकापूर्वीच महात्मा फुल्यांना पुण्यात १८४८ मुलींसाठी शाळा सुरू केली होत. म्हणजे साहित्य निर्मितीपूर्वी महात्मा फुल्यांनी सुधारणा व शिक्षणप्रसार सुरू केला होता. 'तृतीय रत्न' या नाटकात ब्राम्हण जोशीबुवा, गरोदर, अज्ञानी कुणबी स्त्री, जोगाई, तिचा नवरा, एक विदुषक व एक ख्रिस्ती पाद्री, जोशीचा भाऊ दाम ही पात्रे आहेत.

एखाद्या माळ्या कुणब्याच्या स्त्रीच्या पोटात गर्भ वाढू लागल्याचे लक्षात येताच जोशीबुआ तेथे येतो. तिच्या अज्ञानाचा फायदा घेऊन मोठमोठ्या भूलथापा देतो. आणि तिच्या बाळाच्या मरणाचे खोटे जोतीष सांगून बाळाला वाचविण्यासाठी अनुष्ठानाच्या निमित्ताने ब्राम्हण भोजन करायला लावतो. त्या माध्यमातून तिला व तिच्या कुटुंबाला लुबाडतो. शेवटी पाद्री (ख्रिस्ती धर्मोपदेशक) जोगाईला व तिच्या नवऱ्याला त्या कपटातून जागृत करतो व विद्येकडे वळवितो. येथे विदुषक हा केवळ गमत्या किंवा चेष्टा करणारे पात्र नाही तर जोशीबुवाचे ढोंग चव्हाट्यावर मांडणारा कलाकार आहे. विदुषकाच्या माध्यमातून येणारे संवाद हे स्वत: ज्योतीबांचेच आहे असे वाटते. विदुषक प्रबोधक आहे. या नाटकाच्या शेवटी जोगाईचा संवाद आहे, ''ठिक आहे चला तर आपण दोघे आजपासून रोज रात्री फुल्यांच्या शाळेत जाऊन लिहिणे वाचणे शिकू. म्हणजेच पुढे जगातील सर्व गोष्टी आपणास कळून चुकतील.''[१] सुमारे सव्वीस पृष्ठाच्या या छोट्या नाटकात महात्मा फुल्यांनी कुणबी, माळी यांच्या शोषणास त्यांचे अज्ञान हे कारण आहे असा संदेश देऊन त्यांना ज्ञानाकडे, शिक्षणाकडे वळविण्याचा प्रयत्न केला. महात्मा फुल्यांच्या या नाटकात काही तांत्रिक व रचनात्मक, कलात्मक दोष असले तरी महात्मा फुल्यांचा उद्देश शिक्षण व सामाजिक असल्यामुळे त्याची पर्वा महात्मा फुले करीत नाही. ''वाङ्मयाचा आत्मा सामाजिक असावा यांच्याशी फुल्यांची बांधिलकी होती. त्याचे शरीर कलात्मक असावे की नाही, हा प्रश्न जरूर महत्त्वाचा होता. पण तो त्यांनी निवांत वेळच्या चर्चेचा प्रश्न मानला होता.''[२] डॉ. एस. एस. भोसले यांचा अभिप्राय नाट्याच्या परिणामाची ग्वाही देतो.

➢ महात्मा फुले यांचे काव्य प्रयोजन :—

महात्मा फुल्यांचे काव्य अभ्यासले तर दोन पोवाडे, अभंग व काही अखंड, उद्देशिका, मंगलाष्टके, पत्ररूप रचना आणि ब्राम्हणाचे कसब या दीर्घकाव्यातून महात्मा फुले वाचकांपुढे व्यक्त होतात. त्यांनी अभंगरूपाची काव्यरचना केली. तिला ते 'अखंड' नाव देतात. शिवाजी महाराजांवरील पोवाडा आणि इतर अखंडादी काव्यरचना अभ्यासली तर त्यांच्या साहित्याचा स्थायीभावच इहवाद आहे. काव्यसुद्धा असेच सामाजिक उद्देशाने लिहिलेले असल्यामुळे त्यांची कविता शूद्रातिशूद्राचे प्रबोधन करण्यासाठी त्यांची कविता प्रयोजनवती झालेली आहे. थोडीशी गद्यात्मक वाटते.

'ख्रिस्त, महंमद मांग ब्राम्हणासी। धरावे पोटासी बंधुपरी।।'

हा जातीभेद नष्ट करून सर्व मानवात बंधुभाव निर्माणाचे धेय्य या कवितेचे आहे. खरे तर महात्मा फुले काव्य लिहित होते तेव्हा कृष्णशास्त्री चिपळुणकर, म. मो. कुंटे, गणेशशास्त्री लेले, राजवाडे इत्यादी कवी काव्य लिहित होते. केशवसुतांनी आशय व अभिव्यक्तीत, तंत्रात बदल करून प्राचीन संत शैली नाकारली व काव्य लिहिले. मात्र महात्मा फुले यांच्या शैलीत फार तंत्र नसले तरी स्वातंत्र्य समता व बंधुभाव हा आधुनिक जीवनमूल्याचा पुरस्कार आहे. आणि स्वातंत्र्य व समता हेच त्यांच्या काव्याचे सौंदर्यमूल्य आहे.

''स्त्रीपासुनि उपजुनिया त्यांची जातीच निंदसील जरी।
उपटावे कान तुझे त्वन्मातेनेंचि व्यर्थ इतर करी।।''[३]

सत्सार अंक २ रा मध्ये त्यांनी लिहिलेले हे आर्याकाव्य. त्याचप्रमाणे सत्सारच्या पहिल्या अंकातील प्रयोजन —

''धर्मराज्य भेद मानवा नसावे। सत्याने वर्तावे ईशासाठी
सर्व सुखी व्हावे भिक्षा मी मागातो। आर्यास सांगतो जोती म्हणे।।''[४] (पृ. ३५)

महात्मा फुले यांनी आपल्या काव्याचे प्रयोजन सांगितले नसले तरी अखंडादी काव्यरचना या काव्यातील पहिल्याच खंडातील या ओळी फुल्यांचे काव्य प्रयोजन आहे. याच अंकातील कटावाचे अवलोकन केले तर मुखपृष्ठावरच या ओळी दिसतात.

''धूर्त आर्याची मति खुंटली।
रमा पंडिता वरी बाटली।
मद्य पिऊशी आता वाटली।
दे ब्रांडीची मला वाटली।।''[५]

प्राचीन साडेतीन चरणी अभंगशैलीवरील अंखंडापेक्षा वेगळ्या स्वरूपाचे असे कटाव काव्यसुद्धा महात्मा फुले यांनी रचले. परंतु या त्यांच्या आधुनिक पद्धतीच्या काव्यालासुद्धा वाचण्याची तसदी तत्कालीन समीक्षकांनी घेतली नाही. इतकेच नव्हे तर त्यांना आधुनिक कवी सोडाच साधा कवी म्हणून सुद्धा स्थान दिलेले नाही. मात्र त्यांच्या काव्यात कधी असा श्लेष दिसतो तर कधी उपरोध आहे.

''सत्ता तुझी राणीबाई। हिंदुस्थानी जागृत नाही
जिकडे तिकडे ब्राम्हणशाही। डोळे उघडून पाही
चहुकडे भटशाही। कुणब्याची दाद नाही।'',

त्याचप्रमाणे

''विद्या शिकताच। पावाल ते सुख
घ्यावा माझा लेख। ज्योती म्हणे'' (गुलामगिरी)

त्यांची कविता प्रयोजनवती आहे असे डॉ. रविंद्र ठाकूर म्हणतात. तर डॉ. अशोक चोपडे जोतीरावांच्या कवितेत जाणिवेच्या आणि विचाराच्या पातळीवरची आधुनिकता आहे असे म्हणतात. म्हणूनच ते आधुनिक कवितेचे जनक ठरतात असे आनंद यादव सुद्धा म्हणतात. त्यांची कविता संतकाव्य व शाहिरी काव्य व केशवसुत यांना जोडणारा दुवा आहे. तसेच काव्य क्रांतीचे ते अग्रदूतही आहेत. त्यांची कविता क्रांतदर्शी आहे म्हणून सर्जनशीलही आहे.

''मनु धिक्कारूनी एकीकडे फेका। माना शुद्रादिका बंधुपदी''

याशिवाय पोवाडा, अभंग, अखंड, पदे, आरत्या, कटाव, दिंडी अशी विविध स्वरूपाची रचना महात्मा फुल्यांनी केली. आणि 'ब्राम्हणाचे कसब' या दीर्घकवितेत त्यांनी पोवाडा व अभंग हे छंद सुद्धा अधे मधे वापरलेले

दिसतात. साधारणत: अभंगाच्या तिन्ही चरणात सारखी अक्षरे असतात. ओवीत सुद्धा कमी अधिक तेवढीच असतात.

महात्मा फुल्यांचा काव्यउद्देश सांगतांना लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, ''धर्म, संस्कृती, इतिहास, हिंदू धर्मावरील प्रखर हल्ला, नवी मानवतावादी ध्येय्ये, बहुजन समाजाची दु:स्थिती पाहून व त्यातून बाहेर पडण्याचे उपाय, सर्व मानव व्यापी सत्यधर्माचा विचार आणि मानवाचे मौलिक व अंतिम ऐक्य या सर्व मुद्यांचे विवरण सापडते. त्यांची काव्यरचना ही मुख्यता वर उल्लेखिलेल्या विचाराच्या प्रचारार्थ निर्माण झालेली आहे.''[६]हे मत सुद्धा महात्मा फुल्यांच्या काव्याचे वास्तव प्रयोजन आहे.

## ➢ ब्राम्हणाचे कसब :—

१८६९ ला प्रकाशित झालेला हा काव्यग्रंथ आहे. कुणबी, माळी, मांग, महार यांना तो समर्पित केलेला आहे. बाबा पद्मनजी संपादित सत्यार्थदीपिकेत सुद्धा १८७० च्या जानेवारी महिण्यात प्रकाशित झालेल्या या ग्रंथावर भाष्य करतांना संपादकांनी दिलेला अभिप्राय की, ''ज्यास भटपणाची फारशी माहिती नाही व ज्यांचे वागणे कुणबी माळी लोकांत नाही त्यास कदाचित या पुस्तकात कवीने आपले कसब दाखविले आहे असे वाटेल; परंतु आम्हास जी काही भटपणाची माहिती आहे त्यावरून तर हे खरोखरच ब्राम्हणाचेच कसब वर्णिले आहे असे वाटते.''[७] या ग्रंथाचा उद्देश कुणबी, माळी, मांग, महार यांनी ज्ञान घ्यावे, इंग्रजांनी ते ज्ञान द्यावे व त्याद्वारे कुणबी माळ्यांचे डोळे उघडावे असा आहे.

यात नऊ भागापैकी सहा अभंग, दोन पवाडे आहेत. काव्यरूप असलेले हे सुमारे पंचवीस तीस पानाचे पुस्तक आहे. यात ब्राम्हणाच्या आक्रमणापूर्वी येथील मूळ रहिवाशी कोण होते व ब्राम्हणांनी कपटांनी हा देश काबीज करून हरणाऱ्यांना कसे दास केले, शूद्र संबोधले याचे वर्णन आहे.

''मार देऊन। जेर करून। दास केले बहुतास। ओळखून पहा या शूद्रास।''[८]

या ओळींवरून फुल्यांनी कुणबी, माळी, मांग, महार यांच्या दास्यत्वाचा काव्यरूप इतिहास सांगितला आणि यांच्या दास्यमुक्तीसाठी इंग्रजांनी त्यांना ज्ञान द्यावे अशी उपाययोजना सुद्धा सांगितली.

''शिकिव शूद्राला। पंगू बंधुला। दास ब्रम्हयाने मुळी केले।।
ज्ञान देण्याचे बंद ठेवले।'' (समग्र वाङ्मय, पृष्ठ १०५)

एकंदरित महात्मा फुल्यांनी 'ब्राम्हणाचे कसब' या ग्रंथात सुद्धा येथील शूद्र हे भारताचे मूळ रहिवाशी होते. ब्राम्हणाने त्यांना कपटाने हरवून दास केले. आणि त्यांना दास्यातून मुक्ती मिळविण्यासाठी इंग्रजांनी ज्ञान द्यावे अशी तळमळ या ग्रंथात व्यक्त केली.

## ➢ गुलामगिरी :—

१८६३ ला प्रकाशित झालेला हा ग्रंथ ''अमेरिकेच्या निग्रोंना गुलामीतून मुक्त करणाऱ्या अमेरिकन राज्यकर्त्यांच्या सन्मानार्थ परम प्रीतिने नजर करतो.''[९] असे म्हटले. आणि भारतीय सत्ताधाऱ्यांनी शूद्रातिशूद्रांना दास्यातून असेच मुक्त करावे अशी अपेक्षा केली. महात्मा फुल्यांनी गुलामगिरी हे लहानसे पुस्तक लोकहितार्थ केले असल्याचे नमूद करतात. पुस्तक प्रसिद्ध होताच २४ सप्टेंबर १८७३ ला त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सुमारे १६५ पृष्ठ असलेला हा ग्रंथ गद्य — पद्य मिश्रित आहे. यातील भट कामगारांचा पोवाडा आणि मारवाडी भट यांच्या कपटाविषयी अभंग हे दोन परिशिष्टपर प्रकरणे पद्यात आहेत. जोतीराव आणि धोंडिबा यांच्या संवादाच्या (सवाल — जवाब) च्या माध्यमातून निर्माण झालेल्या या ग्रंथाचे एकूण १६ भाग (प्रकरणे) आहेत. यापैकी पहिले एक ते नऊ पर्यंत भागात पूर्वार्ध आणि दहा ते सोळापर्यंतच्या प्रकरणात उत्तरार्ध प्रतिपादन केलेला आहे. पहिल्या प्रकरणात आर्यांची इराणातून आगमन, ब्रम्हादि सरस्वतीची निर्मिती यांचा इतिहास कथन करून मत्स्य अवतार, शंखासूर इत्यादी पुराण कथांची निर्मिती त्यातील फोलपणा, तिसऱ्या प्रकरणात कच्छ अवतार, भूपती क्षत्रिय कश्यप राजा यांच्याविषयी, चौथ्या प्रकरणात वराह आणि हिरण्याक्ष हे अवतार, पाचव्या प्रकरणात नरसिंह, भक्त प्रल्हाद विरोचन या पुराणकथांविषयी, सहाव्या प्रकरणात बळीराजाचा वामनाने कपटाने केलेला नाश, आदर्श बळी राजा, बळीराजाचे मरण, बळीप्रतिपदेचे कपट. होळी इत्यादी सणांची निर्मिती, सातव्या प्रकरणात लिपी निर्माण होऊन ताडपत्रावर लिहिले जाणे, यज्ञातील मांसाहार, शूद्रांचा द्वेश याविषयी, आठव्या प्रकरणात परशुराम अवतार, त्याने एकवीस वेळा पृथ्वसी निक्षत्रिय करणे, अत्यंज मांग चाडाळादी अतिशूद्रास जिवंतपणे बांधकामाच्या पायात

गाडले जायचे याविषयी माहिती आहे. नवव्या प्रकरणात वेदमंत्र, मंत्राने जादूने इच्छापूर्ती करणे, देव्हारे बुळविणे, मनुसंहितेची कपटपूर्ण निर्मिती इत्यादी माहिती गुलामगिरी या ग्रंथाच्या पूर्वार्धात आहे.

उत्तरार्धात मात्र इंग्रज अमेरिकनांच्या ग्रंथाच्या आगमनाने, आधुनिक विचाराने बदल होत गेले. त्यांनी ब्राम्हणाचे कपट कावे बाहेर काढले, येथील आर्य ब्राम्हणांनी प्रार्थना जप, अनुष्ठान, दक्षिणा या माध्यमातून शूद्रातिशूद्रांना परावलंबी केले. इंग्रजांच्या राजसत्तेत ब्राम्हण मामलेदार, कलेक्टर, कारकून, रेव्हेन्यू, जज्ज सारेच ब्राम्हण त्यामुळे कुळकर्णी सावकारांकडून शेतकऱ्यांच्या केल्या जाणाऱ्या लुटीला कोणीच अडविले नाही. परंतु कमिटी, वर्तमानपत्रे यांच्या माध्यमातून शूद्रातिअतिशूद्रांच्या मुलांना शिकवून त्यांना पुढे आणावे आणि आर्यांच्या तावडीतून शूद्रातिशूद्रांची मुक्ता करावी असे महात्मा फुल्यांना वाटते. या ग्रंथात प्रारंभी इंग्रजांविरूद्ध उठाव करण्याची महात्मा फुल्यांची तयारी दिसते. परंतु इंग्रज गेले की पुन्हा ब्राम्हणाच्या तावडीत कुणबी माळी सापडतील. म्हणून दयाळू इंग्रज सरकारने शूद्रातिशूद्रांना विद्या द्यावी असे ते म्हणतात. या ग्रंथात महात्मा फुले मानवमुक्तीचा संदेश देतात. ''गुलामगिरी या ग्रंथाचे स्वरूप दुपदरी आहे. ब्राम्हणी धर्माच्या आडपडद्यात व सुधारल्या इंग्लिश राज्यात अशा दोन्ही ठिकाणी गुलामगिरीचे प्रत्यंतर त्यांना कसे आले याचे अत्यंत परखड व धारदार विवेचन प्रस्तुत ग्रंथात आले.''[१०] हे बापुजी सकपाळ यांचे म्हणने संयुक्तिक आहे.

## ➢ शेतकऱ्यांचा असूड :–

एकूण पाच प्रकरणात असलेले हे पुस्तक आहे. १८८३ ला लिहून पूर्ण झाले असले तरी प्रत्यक्षात महात्मा फुल्यांच्या निधनानंतर दीनबंधू पत्रात पहिले दोन प्रकरण छापले गेले होते. त्यानंतर दीनबंधूचे संपादक नारायण लोखंडे यांनी उरलेले तीन प्रकरण अतिशय कडक असल्यामुळे छापण्यास नकार दिला होता. मात्र महात्मा फुले हयात असतांना त्यांनी हा ग्रंथ बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्यासमोर वाचला होता. ते लक्षपूर्वक ऐकूण महाराजांनी महात्मा फुल्यांचा आदरसत्कार केला होता.

या ग्रंथाचा प्रारंभच 'विद्येविना मती गेली ...... इतके अनर्थ अविद्येने केले।' या महात्मा फुल्यांच्या अमर संदेशाने झालेला आहे. आणि महात्मा फुल्यांनी या ग्रंथाचा उद्देश शूद्र शेतकऱ्यांच्या बचावाकरिता आहे हे सांगून दिले.

या ग्रंथात महात्मा फुल्यांनी शूद्रतिशूद्र शेतकऱ्यांचे तीन प्रकारे शोषण होते असे प्रतिपादन केले. पहिला वर्ग भटभिक्षुक ब्राम्हणांचा. तो धर्माच्या आडून, ग्रहोपग्रहांची भिती दाखवून शेतकऱ्यांना लुबाडतो. दुसरा घटक तो इंग्रजांच्या प्रशासकीय सेवेत नोकरदार वर्ग हा ब्राम्हणांचाच असल्याने कोर्ट कचेऱ्यात आलेल्या ग्रामीण शेतकऱ्यांना नाहक लुबाडतो. असे म्हटले तर तिसरा वर्ग हा सावकारांचा आहे. गरजू गरीब शेतकऱ्यांच्या अडचणींचा फायदा घेऊन हा सावकार त्यांना कर्ज देतो. मोबदल्यात शेती लिहून घेतो. आणि व्याजावर व्याज लावून शेती हडपतो. शेतकरी असा कर्जबाजारी होतो. याकडे इंग्रज अधिकारी सुद्धा दुर्लक्ष करतात. म्हणून इंग्रजांविरूद्ध सुद्धा महात्मा फुल्यांची तक्रार आहे. शेवटी पाचव्या प्रकरणात शेतकऱ्यांच्या मुक्तीचे अनेक उपाय सांगून सर्वात महत्त्वाचा उपाय विद्या होय असे महात्मा फुले म्हणतात. यासाठी महात्मा फुले बुद्धिप्रामाण्यवाद, बहुजन समाजातील शिकलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांना नोकरी, पाटीलकी, आधुनिक तंत्रज्ञान आणि योग्य श्रममूल्य, ब्राम्हणामध्ये नैतिकता निर्माण करणे आणि शेतकऱ्यांच्या आरोग्यासाठी डॉक्टरांची नेमणूक इंग्रज सरकारने करावी हे उपाय सांगतातत्र परंतु महात्मा फुल्यांच्या या सुचनेकडे तत्कालीन इंग्रज सरकारने पुरेसे लक्ष दिले नाही आणि शेतकऱ्यांचे शोषण होत राहिले. ''एकूणच आशय आणि लेखनशैली या दोन्ही दृष्टीने शेतकऱ्यांचा असूड हा ग्रंथ अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे.''[११] नागनाथ कोतापल्लेचे हे म्हणने पूर्णपणे यथार्थ आहे.

## ➢ सार्वजनिक सत्यधर्म :–

१८९१ ला महात्मा फुले यांच्या निधनानंतर हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात सुद्धा शेतकऱ्यांच्या शोषणाची चिंता आहे. महात्मा फुल्यांना हा ग्रंथ विस्ताराने लिहायचा होता. परंतु मोठा ग्रंथ शेतकरी बहुजन समाज वाचू शकणार नाही. म्हणून मानव स्त्री पुरूषांच्या उपयोगी पडणारा हा ग्रंथ त्यांनी थोडक्यात लिहिला. त्यात महात्मा फुले यांनी शेतकरी बहुजन समाज व मानवप्राणी एकंदर सर्व जगात सुखी व्हावा यासाठी मानवाने सत्यवर्तन करून सर्वांचा सत्यधर्म निर्माण करावा असे सांगणारा हा नवा धर्मच होय. यावरूनन महात्मा फुल्यांनी सुद्धा सत्यधर्माद्वारे धर्मांतरच केल्याचे स्पष्ट होते. कारण निर्मिक ही ईश्वर संकल्पना वगळता हिंदू धर्माच्या अगदी

विरूद्ध या सत्यधर्माची तत्त्वे आहेत. मे. पु. रेंगे यांच्या मतानुसार महात्मा फुल्यांची 'निर्मिक' ही संकल्पना इहवादी आहे ते उचित आहेत.

## ➢ सारांश :—

महात्मा फुले यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकापासून ग्रंथनिर्मितीस प्रारंभ झाला तो 'शिवाजी महाराजांचा पोवाडा', 'ब्राम्हणाचे कसब' ते 'शेतकऱ्यांचा असूड'पर्यंतचा ग्रंथ निर्मितीचा प्रवास हा शेतकऱ्यांचे भटशाही सावकारशाही यांच्यापासून मुक्ती मिळविण्यासाठी आहे. शेतकऱ्यांनी भट गुलामगिरीतून मुक्त होऊन नवा सत्यधर्म स्वीकारून मानवतेचा उत्कर्ष करावा ही त्यांच्या लेखनामागील प्रेरणा आहे.

## ➢ संदर्भ ग्रंथ :—

१) महात्मा फुले, 'समग्र वाङ्मय', संपा. य. दि. फडके, म. रा. सा. सं. मंडळ, मुंबई, पृ. ३२.
२) महात्मा फुले, 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', संपा. हरी नरके, चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, सु. आ. २००६, पृ. ६२८.
३) उ. नि., 'समग्र वाङ्मय', पृ. ३७१.
४) उ. नि., 'समग्र वाङ्मय', पृ. ५३५.
५) उ. नि., 'समग्र वाङ्मय', पृ. ३४९.
६) क्रांतीजागर, रवींद्र ठाकूर, प्रस्तावना, पृ. २२.
७) तत्रैव, उद्धृत, पृ. ८३.
८) तत्रैव, उद्धृत, पृ. ९०.
९) उ. नि., 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', चरित्र साधने प्रकाशन समिती, मुंबई, पृ. ११५.
१०) उ. नि., 'महात्मा फुले गौरव ग्रंथ', चरित्र साधने प्रकाशन समिती, पृ. ४८३.
११) तत्रैव, पृ. ५४५.

❖❖❖

# साहित्यातील रसाची आस्वाद्यता

**प्रा. डॉ. मीनाक्षी रा. देव**
मराठी विभाग प्रमुख व सहा. प्राध्यापक
डॉ. सौ. इं. भा. पा. महिला कला महाविद्यालय, औरंगाबाद
मो. नं. ९८८११०९०४६

**प्रस्तावना :**

'रस' हा शब्द दैनंदिन व्यवहारात वेगवेगळ्या अर्थाने वापरला जातो. जीभ आणि मन अशा दुहेरी पातळीवर `रस' या शब्दाचा आविष्कार होतो. जीभेच्या आस्वादा चे जसे सहा रस आहेत तसे मनाच्या आस्वादाचे नऊ रस प्रसिद्ध आहेत, जीभेच्या आस्वादाचा आनंद लौकिक आहे, कारण त्याचा संबंध लौकिक जीवनातील पदार्थांशी असतो. पण मनाच्या आस्वादचा संबंध अलौकीक आनंदाशी आहे. मानव निर्मित सादरीकरणाच्या कलांमधून `रसा'चा आस्वाद घेतला जातो. `रस` हा शब्द वेगवेगळ्या ठिकाणी विविध अर्थानी वापरला जातो जसे,

आयुर्वेदामध्ये शरीरातील संघटक तत्त्वांसाठी `रस' असा शब्द वापरला जातो तर सप्तधातूंनाही `रस' असे म्हटले जाते. `पारा' या धातूला रसेश्वर किंवा `रसराज' म्हणतात तर परीसाला `रसरत्न' म्हणून ओळखले जाते.

मनुस्मृति मध्ये मदिरेसाठी, `कुमारसंभव` नाटकात पाणी किंवा तरल द्रवरूपी पदार्थासाठी तर भर्तृहरि यांनी सार, तत्व या अर्थाने, तर रघुवंशमध्ये आनंद आणि प्रसन्नता यासाठी `रस' हा शब्द वापरला आहे. `वैशेषिक दर्शन` यामध्ये २४ गुणांपैकी एका गुणाचे नाव `रस' असे आहे. खारट, तुरट, आंबट, कडू, गोड, तिखट अशा चवींचा आस्वाद जेव्हा जीभेद्वारे घेतला जातो तेव्हा त्याला रसास्वाद असे म्हटले जाते.

`रस' हा मानवी मनाशी जास्त निगडित आहे. रस हा माणसाच्या मनात वासना किंवा भावना स्वरूपात असतो, माणसाची मनस्थीती परिस्थिती प्रमाणे बदलतात कधी माणूस चिडतो, तर कधी हसतो, कधी त्याला भिती वाटते तर कधी त्याला एखाद्या विषयी करुणा वाटते, कधी एखादी व्यक्ती आवडली तर तो प्रेम ही व्यक्त करतो कधी त्याला काही गोष्टींचा विस्मय वाटतो तर कधी किळसही वाटते, कधी सर्वांपासून अलिप्त निर्विकार अशी शांतवृत्तीही त्याची असते. या मुलभूत वृत्ती सर्व मनुष्य प्राण्यांमध्ये आढळून येतात, त्या स्थिर आणि शाश्वत भावना आहेत. `रस` ही एक चित्तवृत्ती आहे, ती वृत्ती अनुकुल संवेदनाच्या स्वरूपाची असते. ती त्या त्या वेळच्या परिस्थितीला अनुसरून दिलेल्या प्रतिसाद स्वरूपाची असते.

मानवाकडून जेव्हा एखादी कला सादर केली जाते तेव्हा त्या सादरीकरण केल्या जाणाऱ्या कलेमध्येही `रस' हा घटक समाविष्ट झालेला असतो. कलेचे `रस' हेच प्रमुख `आत्मतत्व' असते. नाटक,साहित्य, संगीत अशा सादरीकरणाच्या कलाविष्काराचा आस्वाद घेत असताना मनुष्य तल्लीन होऊन जातो. स्वत:ला क्षणभर विसरतो. कलाकृतीच्या परिशीलनाने मनुष्याला होणाऱ्या या आनंदाला `रस' ही संज्ञा दिली गेली आहे. कलाविष्कारामध्ये प्रतिभावान कलाकार आपल्या प्रतिभा सामर्थ्यांने ती कला साधारणीकृत करून मनुष्याच्या चित्तवृत्तीच्या ठिकाणी आस्वाद निर्माण करतात. कलाविष्कारातून प्रकट होणारी भावना साधारणीभूत होऊन प्रत्ययाला येते. त्यामुळे ती आनंददायी आस्वादय ठरते. म्हणूनच जे जे भाव आस्वाद्य होऊ शकतात ते ते सर्व `रस' स्वरूप मानले जातात. मनुष्याच्या मनातील या स्थायी भावना जेव्हा कलाविष्काराच्या माध्यमातून आविष्कृत होतात. तेव्हाच कलेतून त्या रसाची

आस्वाद्यता मनुष्य अनुभवतो, रस निर्माण होत नाही तर त्या कलाकृतीतून तो आविष्कृत होतो, आस्वाद्य होतो.

**विषय विवेचन :**

**साहित्यशास्त्रामधील रस विचार :**

'रस विचार' हा भारतीय साहित्य शास्त्रातील अत्यंत महत्त्वाचा सिद्धांत आहे. भरतमुनींनी नाट्यशास्त्रापुरता काव्यलक्षणांच्या संदर्भात मांडलेला रसविचार पुढे कोणालाच डावलता आलेला नाही. केवळ साहित्यशास्त्रज्ञच नाही तर मीमांसक, न्यैय्यायिक, सांख्य, वेदान्ती यासारख्या तत्वचिंतकांनी ही यावर आपापले स्वतंत्र विचार मांडले आहेत. `रस विचार' हा केवळ साहित्याचा भाग नसून तो तत्वज्ञानाच्या क्षेत्रातील ज्ञानप्रक्रीयाचा भाग आहे असे मानून भट्ट लोल्लट, श्रीशंकूक, भट्टतौत, भट्टनायक, अभिनव गुप्त या निरनिराळ्या दार्शिकांनी रस प्रक्रिया व साहित्यानंद यांची सखोल मीमांसा केली पंडित विश्वनाथाने `रसात्मकं वाक्यं काव्यम' - रस हाच काव्याचा आत्मा आहे असे म्हटले आहे. भरतमुनींनी सांगितलेले रससूत्र -

"विभावानुभाव व्यभिचारि संयोगातून रस निष्पत्ती।" यावर ही सखोल चिंतन आजवर झालेले आहे.

भरतमुनींनी स्थायीभाव, व्यभिचारी भाव, संचारी भाव, विभाव - अनुभाव या बद्दल सखोल चिंतन केले तोच धागा पकडून रस विचाराची व्याप्ती भट्टलोल्लट, श्रीशंकुक, भट्टनायक आणि अभिनव गुप्त यांनी वाढविली. रस प्रक्रियेचे सविस्तर मुद्देसुद वर्णन अभिनव गुप्त यांच्या विवेचनामुळे अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने समोर आले. मनुष्याच्या ठिकाणी क्रोध, भय, शोक, उत्साह, हास, विस्मय शांती असे स्थायीभाव कमी अधिक प्रमाणात प्रत्येकाच्याच ठिकाणी असतात. हे स्थायीभाव चाळवले जाऊन नऊ प्रकारचे रस निर्माण होतात. ते म्हणजे करूण, हास्य, रौद्र, भयानक, बिभत्स, अद्भूत, आणि शांत हे नऊ रस साहित्यशास्त्रात महत्वपूर्ण मानले जातात.

लौकिक जीवनातील जीवनानुभव प्रत्यक्ष जीवनाशी संबंधित असतात, त्यामध्ये कार्यकारण भाव असतो, त्यामुळे त्या सुख दु:खात्मक असतात, त्यामुळे राग, द्वेष, क्रोध, हे मानवी विकार लौकिक जीवनात रस रूपात प्रत्ययाला येत नाहीत, पण साहित्यातील अशा प्रकारच्या वर्णनात साधारणी कृत रूपात त्या व्यक्त होत असल्याने साहित्यात त्यांना आस्वाद्यता लाभते, साधारणी करणामुळे साहित्यातील घटना - प्रसंग व्यक्तिरेखा या विषयीचा आपपरभाव नाहीसा होतो. आणि त्या कलाकृतीच्या भावनांशी रसिक समरस होतो. जेव्हा मनुष्याच्या मनातील स्थायीभाव साहित्यकृतीमुळे जागृत होतात, तेव्हाच रसनिष्पत्ती होते. म्हणूनच जे जे भाव अस्वाद्य होऊ शकतात ते ते `रस' मानता येतात, त्यामुळे रसांची संख्या व्याप्ती वाढविता - बदलता येऊ शकते, आचार्य मम्मट यांच्या `काव्य प्रकाश' आणि पंडित विश्वनाथ यांच्या `साहित्य दर्पण' ग्रंथात रसाचे विस्तारित वर्णन येते. मानसशास्त्राच्या उदयानंतर आधुनिक मानसशास्त्राच्या मदतीने रस तत्व परिपूर्ण व्हावे म्हणून अनेक अभ्यासकांनी प्रयत्न केले. मानवी मनोविकारांशी संबंधित ४९ भाव रस प्रक्रियेशी संवादी अथवा निश्चिती करणासाठी मानसशास्त्रीय पद्धतीने केलेले विवेचन उपयोगी ठरते.

मराठीत के. ना. वाटवे - रसविमर्श, रा. श्री. जोग - अभिनव काव्य प्रकाश, द. के. केळकर - काव्या लोचन, रा. शं. वाळिंबे - साहित्य मीमांसा, मा. गो. देशमुख - काव्यगंध, दि. के. बेडेकर - रस सिद्धांताचे स्वरूप हे अभ्यासक आणि त्यांचे रस चिकित्सा करणारे ग्रंथ रस विषयक भूमिका समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरतात.

## साहित्यातील रसाची आस्वाद्यता :

`रसा'चा शाब्दीक अर्थ आहे, `आनंद', साहित्याच्या वाचनाने जी आत्मिक आनंदाची अनुभुती होते, त्यालाच `रस` असे म्हणतात, रसाला साहित्याचा आत्मा किंवा प्राणतत्व मानले जाते. साहित्यकृतीतील कल्पना सौंदर्य, विचार सौंदर्य शब्दसौंदर्य समजून घेण्यासाठी रस संकल्पना महत्वाची ठरते. वाचक साहित्यकृतीतील घटना - प्रसंग व्यक्तिरेखा यांच्या वर्णनात रमून जातो. साहित्यानुकुल संवेदना वाचकांच्या - रसिकांच्या मनात निर्माण होतात. बाह्य जगताचा वाचकांना विसर पडतो. साहित्यातील भावना वाचकांच्या मनात निर्माण होऊन त्यात वाचक रममाण होऊन जातात. वाचकांच्या मनात अनुकुल संवेदना निर्माण करण्याचे सामर्थ्य रसामध्ये आहे, म्हणूनच साहित्यशास्त्रात रसाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

वाचक साहित्यकृतींचा अनुभव घेतात तेव्हा त्यात संवेदना विचार आणि भावना हे तीन ही घटक संमीलित झालेले असतात, या तिन्ही घटकांच्या एकत्रीकरणातून एक विशिष्ट अर्थ असलेली जाणीव व्यक्त होणे म्हणजेच अनुभव व्यक्त होणे. संवेदना जागृतीच्या यशस्वीतेवर कलाकृतीचे श्रेष्ठत्व ठरते. कलाकृती मधून रसिकांच्या मनातील संवदेनाजागृती भावनात्मकता निर्माण होते.

आपण निरनिराळ्या फळांचा आस्वाद घेतो प्रत्येकात गोडी असते पण तरी सर्वांची गोडी सर्वस्वी एक प्रकारची नसते, प्रत्येक फळाचे गुणधर्म -स्वरूप वेगवेवगळे असते तसे मानवी मनातील भाव - रस यांचे गुणधर्म - स्वरूप हे त्या त्या भाववृत्तीवर अवलंबून असतात.

साहित्य कृतीतील भावसौंदर्य उलगडून दाखवताना - त्यांचे समीक्षण करताना `रस विचार महत्त्वाचा ठरतो, साहित्यात लालित्य' कसे येते याचे विवेचन करताना साहित्यातील अंलकार, शब्दशक्ती, माधुर्य, ओज, प्रसाद, कल्पना या घटकाबरोबरच `रस` ही विचारात घेतला जातो.

साहित्याचा रसास्वाद वाचक कशा प्रकारे घेतात, याविषयी प्रा. रा. श्री. जोग म्हणतात, ``रसा स्वाद म्हणजे भावना जागृती वाचक साहित्य कृतीचा रसास्वाद घेतात म्हणजे ते कोणत्या तरी भावनेचा आस्वाद घेत असतात. दृष्यन्त शकुंतला यांचा शृंगार पाहून त्याची ही चित्तवृत्ती चलित होऊन त्यालाही काही प्रमाणात शृंगाराचा अनुभव येऊन सुख प्राप्त होत असते, रामायणातील राम - सीता यांच्या वियोग - दु:खाची भावना वाचकाला ही काही प्रमाणात होते. रसिकांच्या मनात भावजागृती व्हावयास साहित्यात त्या त्या भावनांचे चित्र चांगले व परिणाम कारक असे उतरावे लागते.''

मराठी साहित्यात अशा अनेक साहित्यकृतीतून वाचकांच्या अनुभूतीला येणाऱ्या रसास्वादाची कितीतरी उदाहरणे सांगता येतील. जसे -

ना. सी. फडके, चि. त्र्यं. खानोलकर, ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. ना. पेंडसे यांच्या कादंबरीतून प्रियकर प्रेयसीच्या उन्मादक शृंगारपूर्ण चित्रणातून शृंगार रसाची अनुभूती होते. तर शाहीरांच्या पोवड्यातून पराक्रम, शौर्य, धीरोदात्त प्रसंगातून रक्त उसळविणाऱ्या, पेटून उठविणाऱ्या, शौर्याची गाथा सांगणाऱ्या, बाजीप्रभु देशपांडे, तानाजी मालुसरे यांच्या पराक्रमाचे वर्णन करणाऱ्या पोवाड्यातून किंवा `गर्जा जयजयकार क्रांतीचा, उठा वीर हो, जिंकू किंवा मरू` या सारख्या जोशपूर्ण कविता ऐकणाऱ्याच्या मनात `वीर रसाचा` संचार करतात.

वि. वा. शिरवाडकरांच्या `नटसम्राट` नाटकामधून अप्पासाहेब बेलवलकरांची आर्त हाक, `राजहंस माझा निजला` या गोविंदाग्रज्यांच्या काव्यातून मानवी मनातील शोक, दु:ख वियोगामुळे असहाय्य परिस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या ह्य्दयद्रावक वर्णनातून वाचकांच्या मनात करूण रसाची भावना जागृत होते.

`कावळे प्रीतीने खाताती शेंबुड । विष्टा वाटे गोड डुकराशी' अशा किळस उत्पन्न करणाऱ्या काव्य ओळी वाचताना वाचकांच्या मनात घृणा किळसवाणे, ओंगळ, घाणेरडी, अभद्र अपवीत्र भावना उत्पन्न होते. तेव्हा बीभत्स रस उत्पन्न होतो.

भीती ही मानवी मनाची आदिम काळापासून मनात घट्ट रुजेली भावना, काही लेखक अशा भितीदायक भवतालच्या वातावरणाचा नेमका वापरकरून घटना - प्रसंगात पात्राचे गुढ - भयान्क वर्णन करतात. उदा. जी. ए. कुलकर्णीच्या `दूत' `अंजन' या कथा गहिरे पाणी, निर्मनुष्य या रत्नाकर मतकरींच्या कथा तसेच चेटकीण, मृत्युजाळ या नारायण धारप यांच्या भितीदायक गोष्टीं वाचताना भयानक रसाचा प्रत्यय वाचकांना येतो.

``डुम डुमत डमरू ये खणखणत शुल ये, शंख फुंकत ये येई रूद्रा, प्रलयघन भैरवा, करीत कर्कश रव, क्रुर विक्राळ घे क्रुद्ध मुद्रा।' ही भा. रा. तांबे यांनी गुंफलेली रौद्रावेशी कविता किंवा अहि नकुल या कुसुमा ग्रजांच्या ओळीतील भव्यता दिव्यता रौद्र रसाचा प्रत्यय घडवते.

अलीबाबा आणि चाळीस चोर, अल्लाऊद्दीन आणि जादूचा दिवा, जादूच्या गोष्टी, परीकथा अशा प्रकारच्या गोष्टीत आश्चर्यकारक विस्मयघटक, चमत्कारीक, अनपेक्षित घडणाऱ्या घटना प्रसंगाच्या वर्णनातून अद्भूत रसाची प्रचिती वाचकांना होते.

विसंगतीवर हसत खेळत वर्णन करणारे चि. वि. जोशींचे चिमणरावचे चऱ्हाट, आचार्य अत्रे यांच्या झेंडुची फुले हे विंडबन काव्य, मोरची मावशी हे नाटक पु. ल. देशपांडे यांच्या लेखनातील कोट्या वि. आ. बुवा यांचे बुवाबाजी रामदास आठवले यांचे असबद्ध भाषण, द. मा. मिरासदार रमेश मंत्री यांचे प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ विनोदी लेखन, वसंत सबनिसांचे विच्छा माझी पुरी करा, हे वगनाट्य हास्याचे फुलोरे निर्माण करते. जीवनातील ताणतणावांचा विसर पाडायला लावते, आणि हास्य रसाचे सुख वाचकांना प्राप्त होते.

सत् पुरुषांची चरित्रे वाचतांना, पवित्र वातावरणाचे वर्णन वाचतांना वाचकांना शांतरसाची अनुभूती प्राप्त होते.

शृंगारिक ते माधुर्य गाणे । हास्य ते विनोद करणे । कारूण्य ते कींव भाकणे ।
रौद्र उपजवणे ते धीर । वीर ते युद्धाच्या गाठी । शब्द मागे शब्द उठी ।
भयानक रस भय घाली पोटी । बीभत्स त्याहुनी कुष्टी उच्छृंखला । अद्भुत रस ते नवलावणे ।
जे का अचारचि बोलणे । शांत रस तो शुद्ध सात्विक विकार विवर्जित माजि विवेक
अशी नव रस लक्षणे निळोबाराय आपल्या अभंगातून सोप्या शब्दात सांगतात.

साहित्यकृतीच्या वाचनातून विविध भाव वाचकांच्या मनात जागृत होतात. त्या भावनाचा आस्वाद घेण्यात रसिक गुंगुन जातात रसाची म्हणजेच भावनेची आस्वाद्यता ही अशा प्रकारची असते आणि हेच रसकल्पनेचे स्वरूप असते.

## सारांश :

नव्या युगामध्ये रस संख्येचा विस्तार व्यापक होत आहे, त्यामुळे देश भक्ती, आई विषयक कविता, १९६० नंतर नव्याने उदयाला आलेल्या समाजातील विषमता अन्याय, अत्याचारा विषयी विद्रोह, प्रक्षोभ व्यक्त करणाऱ्या साहित्याचा समावेश क्रांती रसात केला जातो. त्यामुळे रस संख्येत वाढ होऊन भक्ती, वत्सल क्रांती या भावनांनाही रस म्हणून स्थान प्राप्त झाले आहे, डॉ. मा. गो. देशमुख यांनी त्यास `भावगंध' असे नाव दिले आहे, प्रा. स. रा. गाडगीळ यांनी, ``नव्या नव्या युगामध्ये जे जे भाव साहित्य विषय बनतील आणि आस्वाद्य बनतील ते सर्व रस व्यवस्थेत येऊ शकतील'' असे म्हटले आहे.

थोडक्यात असे म्हणता येईल की `रस' ही इंद्रधनुष्याप्रमाणे एक बहुरंगी भावना आहे, विविध रंग जसे आपल्या छटांनी मानवी जीवन समृद्ध करतात, मानवी जीवनात रंग भरतात, तसे साहित्यातले विविध रस वाचकांना एक अलौकिक अनुभुती देतात `रस` हा बौद्धीक आणि कलात्मक अभिव्यक्तीचे माध्यम आहे. रस ग्रहण क्षमता वृद्धींगत करण्यासाठी रसांची अस्वाद्‌यता लक्षात घ्यावी लागते. रस हा साहित्यशास्त्रातला मौलिक विचार आहे. संस्कृत साहित्यशास्त्राच्या अनुषंगाने साहित्य विचाराचे जे मंथन झालेले आहे. त्यावरचे नवनीत म्हणजे रस कल्पना होय. हे मत सार्थ आहे.

## संदर्भ :

१) रस : सिद्धांत आणि सिद्धी - डॉ. पद्माकर दादेगावकर
२) भारतीय साहित्य विचार - ग. त्र्यं. देशपांडे
३) काव्यशास्त्र प्रदीप - प्रा. स. रा. गाडगीळ
४) साहित्य विचार - अ. वा. कुलकर्णी
५) अभिनव काव्य प्रकाश - प्रा. रा. श्री. जोग

❖❖❖

# आंबेडकरी चळवळीतील आंतरिक घुसमट व सवर्ण पाटलांनी केलेल्या शोषणावर भाष्य करणारी 'तणकट' कादंबरी

प्रा. विक्रांत कृष्णराव मेश्राम
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती वत्सलाबाई महिला महाविद्यालय, पुसद
vikrantmeshram1976@gmail.com ८७८८७११४८४ / ९४०३४०५४९०

## १) सारांश –

'तणकट' कादंबरीच्या माध्यमातून लेखक राजन गवस यांनी आंबेडकरी चळवळ व हजारो वर्षापासून अर्थात बौध्द धम्मांतरपूर्व आणि बौध्दधम्म स्विकारल्यानंतर सवर्णानी गावातील पाटलांनी शोषित.. पिढीत अनुसुचित जातीकृअभावग्रस्त आंबेडकरी बांधवांवर केलेल्या अमानुष शोषणाचे तसेच आंबेडकरी समाजाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, आर्थिकतेवर भाष्य करणारी कादंबरी आहे.

## २) कादंबरी आवडण्यामागची भूमिका –

'तणकट' कांदबरी १९९८ साली प्रकाशित झाली. सन २००१ साली साहित्य क्षेत्रातील महत्वाचं साहित्य अकादमी पुरस्कार मिळविला. महत्वाचं १४ ऑक्टोंबर १९५६ ला महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्वत: बौध्द धम्माची दीक्षा घेउन व आपल्या अनुयांयाना म्हणजे या देशातील शोषित..पिढीत अभावग्रस्त बांधवांना बौध्द धम्माची दीक्षा दिली. बौध्द धम्म स्विकारल्यावर ६५ वर्षे उलटल्या नंतर ही अनुसुचित जाती – अभावग्रस्त बांधवाच्या अन्याय–अत्याचार शोषणात वाढच होत आहे. म्हारोडया, महारवाडा, मांगोडा–मांगवाडा या जातीवाचक नावाने संबोधले जाते. ग्रामीण व नागरी भागातील सवर्णाची व पाटलांची बौध्द बांधवाकडे पाहण्याचा विषमतावादी संकुचित दृष्टीकोन लेखकांनी कादंबरीच्या माध्यमातुन अधोरेखित केले.

## ३) कादंबरीबद्दल न आवडणारे चिंतन –

लेखन राजन गवस यांच्या 'तणकट' कादंबरीचे अनेक अभ्यासकांनी, समीक्षकांनी आपले मत व्यक्त करतांना, 'तणकट' कादंबरी कृषीजन्य संस्कृतिला व्यापणारी आहे. कादंबरी कृषीजन्य संस्कृतिवर अवलंबून आहे. अभ्यासक 'तणकट' कांदबरीला कृषीजन्य संस्कृतिशी जोडतात. हे पचण्यासारखे नसून तर अजिर्ण झाल्यासारखे मला वाटते. 'तणकट' कांदबरी ग्रामीण व शहरी माणसांच्या स्वभावाचा स्फोट घडवून आणते.

## ४) कादंबरी पुनरावलोकन –

'तणकट' कादंबरीचे शिर्षक अतिशय समर्पक आहे. अतिशय काबाड कष्ट करून रक्ताचं पाणी करून.. रात्रंदिवस राबून शेतकरी शेत हिरवेगार करतात. मात्र शेतातल्या तणकटाकडे दूर्लक्ष झाले की, उभं हिरवेगार शेतच तणकट उद्ध्वस्त करतो. मग शेतक–यांच्या वाटयाला नैराश्यता, वैफल्यग्रस्तता येते. माणासचं मनुष्यत्व नाकारणारं. .धर्मचावक, जातीवाचक सामाजिक विषमतावाचक.. राजकीय.. धार्मिक.. शैक्षणिक.. धार्मिक चवळीला व आंबेडकरी बांधवाच्या आंतरीक व्दंद निर्माण करणारा 'तणकट' गावात... शहरात वाढूच नये हा मौलीक विचार काबंदरीतून मांडला आहे.

'तणकट' कादंबरी वाचत असतांना प्रारंभी ग्रामीण भागातील म्हारोडा... मांगोडया ही जातीवाचक विशेषण दिसतात. कबीर सदाशिव कांबळे हा कादंबरीचा नायक तर बाळासाहेब शेडबाळे व गावातील सवर्ण–पाटील खलनायकाच्या भूमिकेत दिसतात. म्हारवाडयात एकटा शिक्षण घेणारा... कबीर... कांदबरीच्या माध्यमातून ग्रामीण भागातील अनुसुचित जाती व उच्चवर्णीय जातीतील व्दंद दिसून येतो. कबीर जेव्हा शेळी चारायला जातो. तेव्हा शेळी शिंदेच्या शेतात जाते. तेव्हा शिंदेची बायको कबीरला म्हणते, ''भाडया म्हार त्यो म्हार आनी बोलातेच बघ तालेवर'' गावातील म्हारांच्या वाटयाला किती अपमानास्पद जगणं येतं याचे वास्तव्य चित्र रेखाटले आहे.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा माझा मुलगा शिकला पाहिजे असे सदोबाला वाटते. म्हणून काही झाले तरी शाळा बुडवून माझा मुलगा कोणाच्याही शेतात राबणार नाही, कामाला जाणार नाही. मुलगा कबीर महाविद्यालयाचं शिक्षण घेत असतांना कशाला दुस—याच्या शेतात हमाली करणार...कारण शिक्षण न घेतल्याने माणसाची माती होते. स्मशान होते. हे शैक्षणिक सामाजिक आत्मसन्मानाच बळ व परिवर्तन हे डॉ.बाबासाहेबांच्या चळवळीतून मिळाले व शिक्षणामुळेच माणसात.. घरात... व समाजात परिवर्तन घडून येते. प्रा. अवचित भालेराव महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्र विचारावर व्याख्यानाचे आयोजन करतात. सत्यपाल धर्मरक्षी हे दलित महासंघातील प्रमुख कार्यकर्ते 'आंबेडकरांचे धर्मांतर' या विषयावर व्याख्यान देतात. या व्याख्यानाच्या माध्यमातून आंबेडकरी विद्यार्थ्यांत संघटनेविषयी समाज परिवर्तनाविषयी बळ मिळते. दलितांवर अन्याय थांबवायचे असतील तर संघटीत राहणे आवश्यक आहे. तालुक्यातील बोरवटटी गावात चाळीस वर्षाच्या महिलेवर बाष्विक बलात्कार होतो. त्याकरीता न्याय मागण्यासाठी एकत्र आले पाहिजे हा विचार आंबेडकरी आंदोलनातून मिळाला आहे.

'समाजावर होणा—या अन्याय अत्याचाराबद्यल संघर्ष करण्यासाठी एकत्र जमलो नाही, मतभेद करू लागलो तर तालुक्यात संपलो हे लक्षात घ्या.' या माध्यमातून डॉ.बाबासाहेबांचा समाजाला दिलेला शिका..संघटीत.. .व्हा व संघर्ष करा हा विचार दिसून येतो.

लेखकांनी केवळ सर्वण—पाटलांचे मतभेद मांडले नाही तर आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचे.... कार्यकर्त्यांचे आपशी मतभेद मांडलेत. न्याय मागण्यासाठी समाज एकत्र करणे...सभा घेणे, मोर्चा काढणे...घोषणा देणे...आमच्या आया—बहिणी आजही सुरक्षित नाही. ''आम्ही माणसाच्या देशात राहतो की, हैवानाच्या देशात'' असा उव्देश भाषणातून मांडणे. मोर्चा ही आमच्या आंदोलनाची सुरवात आहे. आम्हाला न्याय मिळाला नाही तर देश पेटवून टाकू. प्रा.सत्यपाल धर्मरक्षी आपल्या भाषणातून मांडतो. इतकेच नव्हे तर आंबेडकरी नेते मॅनेज कसे होतात हे देखिल मांडले आहे.

आंबेडकराचे नाव घेउन चळवळी करणरे... वर्गणीच्या नावाखाली पैसे खाणे, पोट भरणारे नेते असतांना देखिल चळवळ चुकिच्या दिशेने जात आहे. असा विचार करणारा कादंबरीतला नायक कबीर आहे.

१४ ऑक्टोंबर १९५६ ला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी तमाम अस्पृश्यांना बौध्द धम्माची दीक्षा दिली. तेव्हा आता आपली सर्वांची जबाबदारी वाढली. घरातील देव्हा—यातील देव व त्यांच्या प्रतिमा जाळून टाका, फेकून टाका, मेलेल्या ढोराचे मांस खाणे टाळा. गावातील अस्वच्छ कामे करणे टाळा. त्याचा परिणाम ग्रामीण व नागरी आंबेडकरी समाजात झाला. समाजपरिवर्तन होत आहे. हाच समाजपरिवर्तन 'तणकट' काबंदरीतून लेखकांनी मांडला.

'तणकट' की काबंदरी ग्रामीण—नागरी आंबेडकरी चळवळीवर भाष्य करणारी आहे. या काबंदरीचा परिघ कृषीजन्य संस्कृतिला व्यापाणारा तर आहेच पण त्याच बरोबर खेडेगावातील जातीव्यवस्था...धर्मव्यवस्था.... जातीवाचक संबोधन करणारा परिघ आहे. हाच परिघ लेखकांला मन:स्ताप देत आहे. तो त्यांनी काबंदरीच्या माध्यमातून चित्रित केला आहे. एका अर्थाने जाती... धर्मवाचक... सामाजिक विषमतावाचक सवर्ण... पाटलांकडून होणारा अन्याय—अत्याचाराचा तणकट उध्दवस्त झाला पाहिजे.

बाळासाहेब शेडबाळे नावाचा खलनायक म्हारांच्या घरात विज देतो. मात्र कबीरच्या घरामध्ये विज देत नाही. म्हारांच्या नावावर स्वत: कर्ज घेतो व एक दिवस तो आपल्या ठेवलेल्या स्त्री सोबत दवाखाण्यातून पळ काढतो. तो कायमचाच. म्हारांना बॅंकेच्या नोटीस येतात. तेव्हा त्यांच्या लक्षात येते की, आपली फसवणूक झाली. महारवाडयातील लोक कबीरकडे आशेने पाहतात व या घुसमट मधून कबीरच आपल्या सोडवू शकतो. कबीरच्या डोक्यात अनेक प्रश्न निर्माण होतात ते डोक्यातले प्रश्नाचे विार करत करत..त्याच्या डोळयावर अंधारी येते व शेवटी तो कुढाच्या मेढीला टेकला. पुढं काय झालं त्याचं त्यालाही कळलं नाही.

## ५) कादंबरीबद्दल सूचना —

इतर भाषेत अनुवाद होणे आवश्यक आहे.

## ६) निष्कर्ष/समारोप —

ग्रामीण व नागरी भागात आंबेडकरांचे नाव घेउन चळवळी करणारे, वर्गणीच्या नावाखाली स्वार्थ साधनाने, समाजाला चुकिच्या दिशेने मार्गदर्शन करणारे, आंबेडकरी कार्यकर्ते, पुढारी असतांना देखिल आंबेडकरी चळवळीला

आपला जीव की प्राण समजणारा, सामाजिक चळवळीचे भान असणारा, नैतिक मूल्य जोपासणारा, आलेल्या संकटात तटस्थ भूमिका घेणारा, सवर्ण, पाटलांच्या आमिषांना बळी न पडणारा, शिक्षण प्रामाणिकपणे घेणारा कबीर हा कादंबरी मानांकनात सर्वोत्कृष्ठ ठरते.

## संदर्भ –

१) आंबेडकर डॉ. बाबासाहेब – शुद्र पूर्वी कोण होते.
२) गवस राजन – तणकट काबंदरी
३) फडके भालचंद्र – दलित साहित्य वेदना व विद्रोह
४) मोरे सतेश्वर – निलपंख कवितासंग्रह प्रस्तावना
५) मोरे सतेश्वर – सरसंधान कवितासंग्रह प्रस्तावना
६) मोरे सतेश्वर – अध्यक्षीय भाषण, तिसरे आंबेडकरी युवासाहित्य संमेलन वर्धा
७) कांबळे उत्तम – जागतिकीकरण आणि दलितांचे प्रश्न

❖❖❖

# वैश्विक महामारीत तुकारामांचे मनोविज्ञान

**डॉ. रवींद्र बेम्बरे**

**वै. धुंडा महाराज देगलूरकर महाविद्यालय, देगलूर**

rvbembare@gmail.com 9420813185

**प्रस्तावना :-**

संत साहित्य म्हणजे शाश्वत सत्याचा एक अखंडित शोधआहे. ते कालनिरपेक्ष असल्यामुळे कोणत्याही विशिष्ट संकटाचे संदर्भ त्यात सापडत नाहीत.काही संतांनी ढोबळ मानाने संकटाचे तीन प्रकार सांगितले आहेत. एक दैविक संकट दोन दैहिक संकट आणि तिसरे भौतिक संकट आज आपल्या समोर उभे असलेले करोना महामारीचे संकट देहावरचे असल्यामुळे दैहिक संकट ठरते. भूकंप, महापूर, वादळ,अतिवृष्टी,अनावृष्टी अशा नैसर्गिक आपत्तींचा समावेश हा भौतिक संकटात होतो. मानवाच्या उत्पत्तीपासून संकट हे त्याच्या जीवनाचे अविभाज्य अंग राहिले आहे. म्हणून आज आपल्यासमोर आलेले करोना महामारीचे संकट पहिले आणि शेवटचे नाही. अशी कोणती ना कोणती आपत्ती सतत माणसासमोर आव्हान उभे करीत असल्याचे संतांनी सांगितले. अशा आव्हानांना सामोरे जाण्याची एक सम्यक दिशा आपल्या संतानी दाखवली आहे. याद्दष्टीने वर्तमानातील वैश्विक कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर संत तुकारामांच्या अभंगातील मनोविज्ञानाचा विचार प्रस्तुत लेखात करायचा आहे.

## विषय विवेचन :-

मराठी संत साहित्याचे अर्क ठरलेल्या संत तुकारामांच्या अभंगातील शब्दाशब्दातून शाश्वत वैश्विक सत्याचे सहज दर्शन घडते. म्हणून काळाच्या उदरातून वेळोवेळी उदभवलेल्या आव्हानाना सामोरे जाण्याचे बळ तुकारामांच्या अभंगातून मिळते. आज करोना महामारीने संपूर्ण जग हादरून गेलेले आहे. जगातला प्रत्येक माणूस धास्तावलेला आहे. विविध देशाचे शासन प्रशासन हतबल होऊन महामारीसमोर हात टेकत आहेत. करोना महामारीचा मुक्काम प्रदीर्घकाळ राहणार असल्याचे संकेत जागतिक आरोग्य संघटनेकडून मिळत आहेत. यामुळे करोना महामारीची धास्ती घेण्यापेक्षा त्याच्या सोबत जगायला शिकले पाहिजे, असे जगातील अनेक विचारवंतांचे सांगणे आहे. या पार्श्वभूमीवर तुकारामांच्या अभंगातून साकारलेल्या मनोविज्ञानाच्या प्रस्तुततेचा विचार सदर लेखातून करायचा आहे.

महामारीपेक्षा तिच्या अवास्तव धास्तीनेच अधिक लोक दगवल्याचा आजपर्यंतचा इतिहास आहे. याद्दष्टीने एक सुफी कथा उदबोधक ठरते. बगदाद शहराच्या प्रवेशद्वारा समोरील एका झोपडीत जुन्नेर नावाचा एक फकीर राहत होता. एका रात्री प्रवेशद्वारातून शहरात जाणाऱ्या काळ्याकुट्ट सावलीला त्याने रोखले आणि शहरात जाण्याचे प्रयोजन विचारले. तेंव्हा ती सावली आपण महामारी असून बगदाद मधील केवळ पाचशे लोकांना मारून परत जाणार असल्याचे सांगितले. त्या महामारीने पंधरा दिवस बगदाद शहरामध्ये जे धुमाकूळ माजवले, त्यात तब्बल पाच हजार लोकांचा मृत्यू झाला. ती महामारी आपले कार्य पारपाडून पंधरा दिवसांनी परत जावू लागली, तेंव्हा जुन्नेरने तिला पुन्हा रोखून पाचशे ऐवजी पाच हजार लोकांच्या मृत्यूबद्दल जाब विचारला. त्यावेळी ती महामारी म्हणाली, मी ठरल्याप्रमाणे केवळ पाचशे लोकांनाच निवडून मारले. बाकीची साडेचार हजार लोक मरणाच्या धास्तीने आपोआपच मेली. ही कथा काल्पनिक असली तरी यातून महामारीच्या काळातील भयग्रस्त मानसिकतेचे दर्शन घडते.

'कुछ हैजेसे तो कुछ हैबतसे मरे' या लोकोक्तीप्रमाणे मरण्यासाठी आजारापेक्षा धास्तीच अनेकांना पुरेशी असते. म्हणून महामारीत औषधी एवढेच मनोबल महत्त्वाचे ठरते. मनोबल वाढवण्यासाठी जगाच्या

बाजारात कोणतेही औषध उपलब्ध नाही. यासाठी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलला पाहिजे. ज्या गोष्टी आपल्या हाताबाहेरच्या आहेत, त्याबद्दल उद्वेग करण्यापेक्षा शांत मनाने त्याचा स्वीकार करणे अधिक हिताचे ठरते. उद्वेगातून दुःखच पदरी येते आणि स्वीकारातून मनाची सकारात्मक ऊर्जा वाढते. **'ठेविले अनंते तैसेची राहावे । चित्ती असू द्यावे समाधान । वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणे ते फळ संचिताचे ।।'** असे तुकाराम सांगतात. वरवर पाहणाऱ्यांना या अभंगात दैववाद दिसत असला, तरी यात जे मनोविज्ञान दडले त्यातून आज महामारी सोबत जगण्याची एक सम्यक दिशाच मिळते. मानवी जीवनातील पर्वताएवढ्या अटळ दुःखाची जाणीव तुकारामांनी वेळोवेळी करून दिली. येथे जन्मलेल्या प्रत्येकाला मरण अटळ असेल तर त्याला घाबरण्याची गरजच काय? असा प्रश्न तुकारामांनी उपस्थित केला. तुकारामांच्या भूमिकेतून दुःख आणि मरणाची अटळता स्वीकारली तर कोणत्याही महामारीस घाबरण्याचा प्रश्नच येत नाही.

अनेक वेळा दुःख संकटाच्या काल्पनिक भीतीनेच गर्भगळीत होऊन लोक मानसिक संतुलन हरवून बसतात. घाबरल्याने छोटेशे संकट पर्वतापेक्षा मोठे बनते आणि धैर्य बाळगल्यास पर्वतापेक्षा मोठे संकट देखील अगदी छोटे होते. संकटसमयी श्रद्धेचे एखादे अधिष्ठान आत्मिक जे बळ देते त्यातून आपले मनोबल उंचावत असते. म्हणून देवावर श्रद्धा ठेऊन संकटाला सामोरे जाण्याचा मार्ग तुकाराम दाखवतात. **'आलिया भोगासी असावे सादर । देवावरी भार घालुनिया ।।'** जीवनात आलेले संकट कितीही मोठे असले तरी परमेश्वर नावाची अलौकिक दिव्यशक्ती आपल्या पाठीशी असल्याने काहीही वाईट होणार नाही, या निर्धाराने संकटास सामोरे गेले तर त्यातून आपण अगदी सहज बाहेर पडू शकतो असा विश्वास तुकाराम देतात. **'भयाचियापोटी दुःखाचीया रासी। शरण देवासी जाता भले ।।'** संकटाची अवास्तव धास्ती घेतल्यास दुःखच पदरी येते. अशा कसोटीच्या प्रसंगी आपले आत्मबल जागवण्यासाठी परमेश्वराला शरण गेले पाहिजे असे ते सांगतात.

करोना महामारीची झळ जगातील प्रत्येकाला कमीअधिक बसणारच आहे. या पार्श्वभूमीवर अनेक प्रकारचा मार सहन करण्याची मानसिक तयारी ठेवलीच पाहिजे. **'होणार होऊनी गेले । मिठा आता खंती रे ।।'** जे व्हायचं ते होऊन गेलं असेल, तर त्याबद्दल खेद करीत बसल्यास त्यातून मनस्ताप पदरी येतो. दुःखाला कवटाळून बसल्यास त्याचे पर्यवसान नैराश्यात व्हायला वेळ लागत नाही. **'शोके शोक वाढे । हिमतीचे धीर गाढे ।। येथें केले नव्हे काई । लंडीपण खोटें भाई ।।'** तळमळीने तळमळ आणखी वाढते आणि धीर धरला तर धीरानं धैर्य बळकट होत असते, असा तुकारामांचा दावा आहे**. 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस'** या उक्तीप्रमाणे संकटाच्या भीतीने लांब पळणाऱ्यांच्या जीवनात संकटे सतत पाटलाग करतात. **'डगमगी तो वायां जाय। धीर नाही गोता खाय ।। ढळों नये जरी। लाब घरिचिया घरीं।।'** जो डगमगला घाबरला तो वाया जातो. ज्याच्यात धीर नाही तो संकटात पुन्हा पुन्हा गटांगळ्या खातो. कोणत्याही परिस्थितीत घाबरत नाही आणि कोणत्याही आजारास डगमगत नाही त्याचा आजार घरच्या घरी सुद्धा बरा होतो, असा तुकारामांचा ठाम विश्वास आहे.

मागील दोन महिन्यापासून लागू झालेल्या टाळेबंदीमुळे प्रत्येकाला एक मोकळा अवकाश लाभला आहे. या अवकाशात मोकळे मन भरकटण्याचीच शक्यता अधिक असते. याबाबत तुकारामांचा हा अभंग उद्बोधक ठरतो. **'मोकळे हे मन कष्ट । करी नष्ट दुर्जन।।'** आज जगातील सर्व माध्यमे करोना महामारींनी व्यापली आहेत. मिळालेल्या रिकाम्या वेळेत आपण सतत करोनाच्या बातम्या पाहत मनात सदैव त्याचाच जप चालू ठेवला, तर हा करोना आपल्या अंतर्मनात घर करून बसतो. अंतर्मनाची शक्ती अफाट असल्यामुळे हळूहळू काल्पनिक आजार बळावतो. त्याचे दूरगामी परिणाम आरोग्यावर होतात. **'ज्याचें जया ध्यान । ते चि होय त्याचें मन ।।'** असे तुकारामांचे मनोविज्ञान सांगते. यास्तव मिळालेल्या अवकाशात सतत टी.व्ही. आणि मोबाईल वरील बातम्या पाहून काळजीत पडून उपयोगाचे नाही. आपल्या

ध्येयाला अनुसरून रचनात्मक विचारात मनाला गुंतवत आपणच आपल्या स्तरावर मानसिक स्वास्थ्याचा नवा मार्ग शोधणे आज नितांत गरजेचे आहे. **'आपुले आपण जाणावे स्वहित । जेणें राहे चित्त समाधान।।'** आपल्या प्राचीन उपचार पद्धतीत शरीर आणि मनाचे अद्‌वैत सांगितले. मनच रोगट असेल तर शरीर स्वस्थ राहूच शकत नाही. म्हणून तुकाराम म्हणतात, **'म्हणोनि आयुक्तपण मनाचे। तें चि सर्वस्व दुःखाचें ।।'** मनाची अस्थिरता हेच दुःखाचे कारण होय. मनच दुःखी असेल तर बाहेरच्या सर्व गोष्टी जीवनात अर्थहीन ठरतात. **'मनाच्या तळमळे । चंदनही अंग पोळे।।'** जर भावनिक नियोजन उत्तम असेल तर त्याचा सकारात्मक प्रभाव आपल्या रोगप्रतिकारक शक्तीवर होतो,असा तुकारामांचा दृष्टिकोन आहे.

मन:स्थितीचा परिणाम रोगप्रतिकारक पांढऱ्या पेशीवर होतो. म्हणून मन प्रसन्न ठेवणे हे नितांत गरजेचे ठरते. यादृष्टीने **'मन करा रे प्रसन्न । सर्व सिद्धीचे कारण।।'** या अभंगात खूप मोठे मनोविज्ञान तुकारामांनी मांडले आहे. सर्व शक्तीचे आणि ऊर्जेचे मूलस्रोत म्हणून तुकाराम मानवी मनाकडे पाहतात. रोगप्रतिकारक शक्तीचे आणि मनाचे अंगभूत नाते आहे. मन अस्थिर बनले तर Noradrenaline, dopamine,Serotonin अशा जीव रसायनांमध्ये असंतुलन होऊन त्याचा परिणाम रोगप्रतिकारक शक्तीवर होतो. अशा काळात कोणताही संसर्ग आला, तर त्याचा प्रभाव होण्याची शक्यता जास्त असते. आजार रोगजंतूमुळे होणारा असो की विषाणूद्‌वारे होणारा असो रोग प्रतिकारक शक्ती वाढवणं हेच महत्त्वाचे ठरते. 'संताचिया संगती । मनोमार्ग गती।।' या अभंगातून ज्ञानेश्वरांनी संत संगतीतून मनास सदगती लाभत असल्याचे सांगितले. मानसिक स्थैर्यासाठी तुकारामांना संतसंगती नितांत महत्त्वाची वाटते. **'करिसील तो करीं संतांची संगत । आणीक तो मात नको मना।।'** असे ते म्हणतात. ऑक्सफर्ड विद्‌यापीठात सलग दहा वर्ष प्रयोग करून पुढील मौलिक निष्कर्ष मांडण्यात आला. सकारात्मक वृत्तीच्या मंगलदायक विचार करणाऱ्या व्यक्तीच्या जवळ गेल्यानंतर लगेच पंधराशे पांढऱ्या पेशी शरीरात वाढतात. नकारात्मक अमंगल विचार करणाऱ्या माणसाजवळ गेल्यानंतर लागलीच रक्तातील सोळाशे पांढऱ्या पेशी कमी होतात. ऑक्सफर्ड विद्‌यापीठाच्या या निष्कर्षातून तुकारामांचे मनोविज्ञानच प्रतिध्वनीत झाले आहे. म्हणून अस्वस्थ वर्तमानात चांगल्या लोकांची संगत आरोग्याच्या दृष्टीने हिताची ठरते.

मानसिक हानी ही लवकर भरून न निघणारी असते. **'भंगलिया चित्ता । ना ये काशाने सांधिता।।'** असे तुकाराम सांगतात. आर्थिक मंदीतून बाहेर पडणे जेवढे अवघड त्यापेक्षाही मानसिक धक्क्यातून सावरणे अधिक अवघड असते. आपल्या मनावर विजय मिळवलेला माणूस जीवनातील प्रत्येक संकटावर विजय मिळवू शकतो. **'तुका म्हणे मना पाहिजे अंकुश। नित्य नवा दिस जागृतीचा।।'** मनावर नियंत्रण असेल तर संकट काळातही येणारा प्रत्येक दिवस हा नवजागृतीचा ठरतो. महामारीच्या धास्तीने हवालदील होण्यापेक्षा त्यावर मात करण्याचं दृढनिश्चय आज आवश्यक आहे. **'निश्चयाचे बळ । तुका म्हणे तेचि फळ।।'** पराभव डोळ्यासमोर दिसत असला तरी आपल्या सामर्थ्यावर दृढ विश्वास असेल, तर पराभव कधीच होणार नाही. विजय दिसत असूनही आपल्या मनात त्याबद्दल विश्वास नसेल, तर आपण कदापि जिंकू शकणार नाही. 'तेहतीस कोटी देवावर तुमचा विश्वास असेल व स्वत:वर विश्वास नसेल तर तुम्ही नास्तिक आहात.' असे स्वामी विवेकानंद म्हणतात. महामारीत संपूर्ण जगच हादरले आहे, म्हणून स्वतःच्या मनाची ताकद ओळखून आपला तोल आपणच सावरण्याचा हा काळ आहे. यादृष्टीने या वैश्विक महामारीत स्वतःला सावरण्यासाठी विश्वातील प्रत्येक मानवाला तुकारामांचे मनोविज्ञान प्रत्येक पावलावर उपयुक्त ठरते.

## निष्कर्षात्मक समारोप :-

मानवी जीवनातील संकट आणि दुःखाची अटळता प्रतिपादित करून त्या संकटाला धैर्याने सामोरे जाण्याची दिशा संत तुकारामांनी दिली आहे. संकट काळात आपल्या हातात नसलेल्या गोष्टीबद्दल उद्वेग केल्यास संकटाची तीव्रता अधिकच वाढत असते. म्हणून महामारीतून उद्भवलेल्या परिस्थितीचा स्वीकार करून त्याला सामोरे जाण्याचा संदेश संत तुकाराम देतात. कोणत्याही महामारीपेक्षा तिच्या धास्तीनेच अधिक लोक दगावल्याचा इतिहास आहे. त्यामुळे महामारीची धास्ती न घेता परमेश्वरावर विश्वास ठेवून धैर्याने सामोरे जाण्याची दिशा संत तुकाराम दाखवतात. घाबरल्यास आजाराची तीव्रता वाढत असल्याचे ते सांगतात. महामारीनेने अपरिहार्यपणे जीवनात दुःख येत असले तरी त्या दुःखावर मात केलेच पाहिजे. दुःख विसरलेच पाहिजे. असे न करता केवळ दुःखालाच कवटाळून बसणे मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने घातक असल्याचे संत तुकाराम सूचित करतात. महामारीत जो घाबरतो त्याचे मानसिक संतुलन ढासळून त्याच्यावरचे सर्व उपचार निरर्थक ठरतात. ज्याच्या मनात धर्य आहे त्याचा आजार मात्र घरच्या घरीही बरा होऊ शकतो असा विश्वास संत तुकाराम देतात. महामारीत कोणत्याही आजाराबद्दल अनावश्यक विचार करू नये कारण ज्या गोष्टीचा आपण ध्यास घेतो, त्या गोष्टी हळूहळू आपल्या अंतर्मनात जाऊन बसतात आणि नसलेल्या आजाराची लक्षणे जाणवू लागतात. म्हणून अशा काळात माणसाने सकारात्मक विचार केला पाहिजे, चांगल्या गोष्टीवर ध्यान केंद्रित केले पाहिजे असे संत तुकाराम सांगतात. मन जर अस्थिर बनले तर त्याचा परिणाम माणसाच्या रोगप्रतिकारक क्षमतेवर होतो. म्हणून संकटकाळात आपले मन स्थिर ठेवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला पाहिजे, मन प्रसन्न ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मन प्रसन्न असेल तर माणसाच्या शरीरातील रोगप्रतिकारक पांढऱ्यापेशी वाढत असतात म्हणून संत तुकारामांनी प्रसन्न मन हे सर्व सिद्धीचे कारण असल्याचे सांगितले आहे. दृढ निश्चयाने कोणत्याही संकटास सामोरे जाण्याचा जो संदेश संत तुकारामांनी आपल्या अभंगातून दिला तो आजच्या कोरोना महामारीवर मात करण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त ठरतो.

## संदर्भ ग्रंथ :-

१. संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या अभंगांचा गाथा श्रीक्षेत्र देहू जि. पुणे.

२. मराठी संतांचे सामाजिक कार्य, डॉ. वि.भि.कोलते,लोकवाड्मय गृह, मुंबई , प्रथमावृत्ती २०१४.

३. मध्ययुगीन संत साहित्य काही आयाम, डॉ.वू.म.पठाण, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती२०१६.

४. संत आणि सायन्स, मा.का.देशपांडे, सुगावा प्रकाशन, पुणे, द्वितीयावृत्ती २००३.

५. संत तुकारामांचा जीवन विचार, डॉ. निर्मलकुमार फडकुले, सुविद्या प्रकाशन सोलापूर, द्वितीयावृत्ती २००२

६. समग्र तुकाराम दर्शन, डॉ.किशोर सानप, विजय प्रकाशन नागपूर. प्रथमावृत्ती २००८.

❖❖❖

# आदिवासी साहित्य: निर्मिती, प्रेरणा आणि वाटचाल

प्रा. डॉ. संदीप रतन कांबळे
मराठी विभाग,
इंद्रायणी महाविद्यालय, तळेगाव–दाभाडे,
ता. मावळ, जि. पुणे
Mail ID: sandipk07@gmail.com मोबा. ९८२३८०८७३६

## गोषवारा :

आदिवासी साहित्यप्रवाह हा सन १९७५ नंतरचा स्वतंत्र वाङ्मयीन प्रवाह म्हणून उदयास आला. आदिवासी साहित्याला मूळ निसर्गप्रेरणा असून त्याचबरोबर इतरही प्रेरणांची पार्श्वभूमी लाभली आहे. आदिवासी साहित्याची चळवळ आज जोरकसपणे प्रवास करत असून आदिवासींचे समाजविश्व केंद्रस्थानी ठेवून या साहित्याची निर्मिती होत आहे. निसर्ग, धर्म, संस्कृती, इतिहास, शिक्षण तसेच सामाजिक, राजकीय चिंतन या वळणांना स्पर्श करीत आदिवासी साहित्य प्रवास करत आहे.

आदिम जीवन, विविध जमाती, वंश, परंपरा, चालीरीती, याच्या विरोधात अंधश्रद्धा नष्ट करून स्थानिक समाजव्यवस्थेतील प्रवाहात सामील होण्यासाठी आदिवासी समूह सज्ज झाला आहे. नव्हे तर या साहित्याने मराठी साहित्याला आपली नोंद घेणे भाग पाडले आहे. आदिवासी साहित्याचे स्वरूप दीर्घ असून त्याचे ठळक विशेष दिसून येतात.

## बीजशब्द:

आदिवासी, साहित्य, बोलीभाषा, संस्कृती, दलित, ग्रामीण, जनवादी, प्रादेशिक, स्त्रीवादी, डार्विन, कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन, ललितगद्य, स्फुटलेखन, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, लुटारू, नरभक्षक, राजस्थान,चांद भैरव, तिलका मांझी, तंट्या भिल्ल, खाजा नाईक, झलकारी राणी, क्रांतीवीर, बिरसा मुंडा, भागोजी नाईक, पत्रकार, अभ्यासक.

## प्रस्तावना :

सन १९६० नंतर सामान्यत: दलित साहित्यप्रवाह उदयास आला आणि मराठी साहित्याला साहित्यविश्वात एक वेगळा वाङ्मयप्रवाह म्हणून त्याची दखल घ्यावी लागली. नंतर पुढे ग्रामीण साहित्य चळवळ आणि त्यानंतर आदिवासी साहित्य चळवळ यांनी मराठी वाङ्मयप्रवाह सशक्त केला. खऱ्या अर्थाने सन १९७५ नंतर आदिवासी साहित्याचा प्रवाह नावारूपाला आला. आदिवासी साहित्याचा इतिहास पाहता स्वातंत्र्यपूर्व कालखंडात आदिवासी साहित्याची परंपरा मौखिक स्वरूपाची असल्याचे आपल्याला दिसून येते. स्वातंत्र्योत्तर कालखंडात ज्या नवीन वाङ्मयीन प्रवाहांचा उदय झाला त्यात दलित, ग्रामीण, जनवादी, प्रादेशिक, स्त्रीवादी इत्यादींचा समावेश होतो. या सर्व प्रवाहांच्या केंद्रस्थानी समाजपरिवर्तनाचा विचार होता. या वाङ्मयीन प्रवाहांची दृष्टी घेऊन आदिवासी साहित्यिकांना आपला वेगळा साहित्यप्रवाह निर्माण करण्याची दिशा मिळाली.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात नवनवीन विचारवंतांच्या विचारांची दिशा दलित, आदिवासी, ग्रामीण, भटक्या–विमुक्त, नवशिक्षित तरूणांना लाभली. त्यांच्या विचारांनी भारावून जाऊन आदिवासी तरूण आपल्यावरील अन्याय–अत्याचार, जुलूम, जबरदस्ती यांच्या विरोधात आपले कलम घेऊन वैचारिक युद्धास सज्ज झाला. १९७५ नंतर खऱ्या अर्थाने मराठी साहित्यात आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याच्या दिशेने आदिवासी साहित्यप्रवाहाने इतर वाङ्मयीन प्रवाहांप्रमाणे वाटचाल सुरू केल्याचे ठळकपणे लक्षात येते. कविता, कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र, आत्मकथन, ललितगद्य, स्फुटलेखन इत्यादी वाङ्मयप्रकारात ही साहित्यनिर्मिती झाली आहे.

आदिवासी म्हणजे कोण? आदिवासी साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा कोणत्या? आदिवासी साहित्याचे स्वरूप कसे आहे? विविध साहित्यप्रकारांतील वाटचाल व एकंदरीतच आदिवासी साहित्याची वैशिष्ट्ये कोणती? या अंगाने विद्यापीठ पातळीवर सखोल संशोधन झाले आहे, होत आहे ही अभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

## विषय विवेचन :

## आदिवासी म्हणजे कोण?

आर्यांचे हिंदुस्थानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी या देशाचे मूळ रहिवासी होते. ते या मूळ भूमीचे आदी पुत्र होते. त्यांच्या विकसित बोली भाषाही होत्या आणि त्या बोलीभाषेतील लिपीबद्ध साहित्यही होते. एकूणच हे आदिम जीवन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीयदृष्ट्या समृद्ध आणि पुढारलेले होते. प्रत्येकाने आपापल्या आकलनाच्या पातळीवर संशोधक व अभ्यासक या दृष्टिकोनातून आदिवासी कोण? याची नेमकी व्याख्या करण्याचा प्रयत्न केला. आशय, अभिव्यक्ती, स्वरूप, वैशिष्ट्ये, प्रेरणा यांना स्पर्श करणाऱ्या या व्याख्या आहेत.

पाश्यात्त्य अभ्यासकांमध्ये डब्ल्यू जे पेरी म्हणतात, ''समान बोली भाषा बोलणाऱ्या व एकाच समान भू–प्रदेशावर वास्तव्य करणारा समूह म्हणजे आदिवासी समाज होय.''[१]

डार्विनने आपला जीवन विकासाचा सिद्धांत सन १८५९ साली मांडला. डार्विनच्या उत्क्रांतीच्या सिद्धांताचा विचार केल्यास 'शरीराने मानव जातीपर्यंत विकास पावलेले, उत्क्रांत पावलेले, पण मनाने, बुद्धीने इतर माणसांच्या तुलनेत अविकसित राहिलेले लोक म्हणजे आदिवासी होय.'[२] असे विवेचन केलेले दिसते.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे कोशवाङ्मयात म्हणतात की, 'नागर संस्कृतीपासून दूर व अलिप्त राहिलेले प्रदेशातील मूळचे रहिवासी म्हणजे आदिवासी होय.'[३]

आदिवासींची व्याख्या करताना सर्व प्राथमिक, भौगोलिक तसेच सांस्कृतिक, वाङ्मयीन, धार्मिक अशा सर्वांगाना स्पर्श करणाऱ्या व्याख्या विचारात घेता त्यातून आदिवासी शब्दाची उकल होते. थोर साहित्यिक डॉ. गोविंद गारे म्हणतात, ''आर्यांचे हिदुस्थानात आगमन होण्यापूर्वी आदिवासी हे या देशाचे मूळ रहिवासी होते. ते टोळ्याने राहत होते. त्यातील काही टोळ्या पराभूत होऊन तर काही टोळ्या स्वतःचे अस्तित्व टिपण्यासाठी दऱ्या–खोऱ्यांत व जंगलाच्या आश्रयाला जाऊन राहिल्या. भारतातील आदिवासींना त्यामुळे 'गिरीजन' असे म्हटले जाते. मूळचे ते याच भूमीवरचे असल्यामुळे त्यांना 'भूमिजन' किंवा 'भूमिज' असे देखील म्हणतात. अरण्यात राहणारे म्हणून 'अरण्यक' असेही त्यांना संबोधण्यात येते. भारतीय संविधानाने त्यांना अनुसूचित जमाती म्हणजेच आदिवासी किंवा आदिम जमाती असे संबोधले आहे.''[४]

रामायन, महाभारताच्या जुन्या वाङ्मयात आदिवासींचे वर्णन 'कावळ्यापेक्षा काळे', 'धरतीचे पापी प्राणी', 'खुजे', 'चपट्या नाकाचे', 'लुटारू', 'राक्षस', 'नरभक्षक' वगैरे उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते. असे असले तरी साधारणतः असे विवेचन आदिवासी समाजबांधवाविषयी केलेले आढळून येते.

## आदिवासी साहित्यनिर्मितीमागील प्रेरणा :

आदिवासी हा साठोत्तरी वाङ्मयीन साहित्यप्रवाह आहे. कोणताही वाङ्मयप्रवाह निर्मितीमागे किंवा उदयामागे काही विशिष्ट प्रयोजने, उद्दिष्टे किंवा प्रेरणा या कारणीभूत असतात. साहित्यनिर्मितीसाठी प्रेरणा ही आवश्यक असते. यात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, ऐतिहासिक, राजकीय, वाङ्मयीन अशा विविधांगी प्रेरणा असतात. आदिवासी साहित्यातील कवी भुजंग मेश्राम आदिवासी प्रेरणेबाबत सांगतात की, ''आदिवासी समाज व संस्कृतीची मर्मस्थळे, या समाजात होणारे बदल, समाजपरिवर्तनाची दिशा, आदिवासी जीवनाची घालमेल, स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित करण्याची धडपड, अन्याय–अत्याचाराला प्रतिकार करण्याची, संघर्ष व संघटना तयार करण्यासाठीची धडपड व शोषणाचे नवे रूप चितारणारे आदिवासी साहित्य निर्माण होऊ शकते आणि याच आदिवासी साहित्याच्या मूळ प्रेरणा आहेत.''

असे असले तरी जल, जंगल आणि जमीन हे आदिवासी साहित्याची मूलभूत प्रेरणास्त्रोत आहेत. त्यात निसर्ग, संस्कृती व धर्म, ऐतिहासिक वीर पुरूषांचे कर्तृत्व, वीर पुरूषांचे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक योगदान, वैज्ञानिक किंवा आधुनिक प्रेरणा, म. फुले व डॉ. आंबेडकरांचा विचार यांचा विचार करावा लागतो. त्याचबरोबर बोलीभाषा व कार्ल मार्क्सचा वर्गसंघर्षवादी विचार आदी प्रेरणा सांगता येऊ शकतील, याचाही बारकाईने विचार करता येतो.

नवशिक्षितांच्या नागरीकरणामुळे आदिम समाजाच्या जीवन जाणिवांवर परिणाम होत असल्यामुळे त्यांच्या जीवनसंघर्षाचे व प्रेरणांचे स्वरूप बदलणे स्वाभाविक आहे. म्हणजेच काळानुरूप त्या प्रेरणा बदलतात. काही जुने जाऊन काही नवे स्वीकारण्याची क्षमता आदिवासी साहित्यात आहे, खऱ्या अर्थाने ते परिवर्तनीय आहे.

## १. निसर्ग:

आदिवासी निसर्गातील प्रत्येक घटकाला दैवत्व बहाल करून आपली उपजीविका करतो. निसर्गापासून आदिवासींचे जीवनसर्वस्व वेगळे नाही. आदिवासींच्या सर्वांगातून म्हणजेच सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, ऐतिहासिक आणि वाङ्मय यातून निसर्ग आपण वजा करू शकत नाही.

*उदा.*

*'बामणाच्या जल्मा जाशी त लिखून लिखून मरशी,*
*मारवाडी होशी त तोलून तोलून मरशी,*
*चमार होशी त नाड्या जोती करून मरशी,*
*पण...*
*वारल्याच्या जल्माला जाशी त जंगलचा राजा होशी'*

अशी आदिवासींची व्यापक जीवनदृष्टी आहे, जीवनानुभूती आहे. म्हणूनच निसर्ग हे त्यांचे जीवन सर्वस्व असल्याने निसर्ग ही त्यांची पहिली प्रेरणा ठरते.

त्याची कला ही निसर्गाभिमूखच असते. निसर्गातील घटनांचे अर्थ आदिवासी आपल्या कल्पनेनुसार लावतो. आदिवासींच्या कलानिर्मितीच्या प्रेरणा निसर्गातूनच त्याला मिळतात. आदिवासी विचारवंतांचा, अभ्यासकांच्या विचारांचा परामर्श घेता असे स्पष्ट होते की, निसर्ग ही आदिवासी साहित्याची प्रमुख, प्रथम मूळ प्रेरणा आहे.

## २. सांस्कृतिक वारसा:

सांस्कृतिक वारसा ही आदिवासी साहित्याची दुसरी प्रेरणा सांगता येते. आदिवासींना अर्थपूर्ण व समृद्ध संस्कृती आहे. याबाबतीत डॉ. सरोजिनी बाबर म्हणतात की, ''आदिवासींची दुनिया ही अद्भूताचे पंख ल्यालेली गंधर्वकन्या आहे. ती देखणी तसेच मोहमयी आहे.''[५] आणि ते खरेही आहे. आदिवासी दुनियेतील सर्वात देखणे दालन व सुंदर स्थळ जर कोणते असेल तर ते आहे, आदिवासी संस्कृती.

आदिवासी या समूह चेतनेला बळ देणाऱ्या अनेक देवदेवता, रीतीरिवाज, कुलगोत्रपद्धती, जीवनविषयक तत्त्वज्ञान, निसर्गविषयक संकल्पना, त्यांच्यातील थोरपुरूषांचे आचारविचार, जीवनमार्ग आणि त्यांच्या दैनंदिन व्यवहारांना नियंत्रित करणारी समूह जाणीव या सर्वांनी मिळून आदिवासींची संस्कृती बनलेली आहे. अनेक अंधश्रद्धा व रूढीही या संस्कृतीने जोपासल्या आहेत. आदिवासी साहित्यातील संस्कृतीच्या अंत:प्रवाहाचा शोध आदिवासी साहित्यातून प्रकट होत असल्याने ही सांगता येते.

## ३. ऐतिहासिक प्रेरणा:

आदिवासींना वैभवशाली गौरवी इतिहास आहे, आदिवासींचा खराखुरा इतिहास लुप्त होणे शक्य नाही. आदिवासी साहित्य हे काळाच्या प्रवाहात आपली भक्कम पायवाट निर्माण करून वाटचाल करत आहे. ज्येष्ठ पत्रकार व अभ्यासक उत्तम कांबळे म्हणतात की, ''आदिवासींनी आत्मसन्मानाची लढाई लढताना इतर दु:खितांच्या, पीडितांच्या हातात हात घालून प्रस्थापितांविरोधीची लढाई जोरकसपणे लढण्याची गरज आहे... त्यासाठी आदिवासींनी प्रथम आत्मसन्मानाचा इतिहास शोधला पाहिजे.''[६] म्हणजेच आदिवासींना आपला इतिहास मूळापासून शोधावयाचा आहे. त्याचे प्रतिबिंब आदिवासी साहित्यातून प्रकट होत आहे.

## ४. धर्म व संस्कृती:

आदिवासींचा मूळ 'आदिवासी' धर्म आहे. धर्माचे तत्त्वज्ञान आदिवासींच्या विविध जमातीत विखुरलेले आहे. त्या तत्त्वज्ञानाचा जाणिवपूर्वक अभ्यास होण्याची आज गरज आहे. कारण धर्माचे तत्त्वज्ञान मुळी

आदिवासींच्या जीवनव्यवहाराची खरीखुरी प्रेरणा आहे. आदिवासींचा स्वत:चा धर्म असतानाही आजचा आदिवासी तरूण आपल्याधर्माविषयी बोलताना दिसत नाही. आज यामुळे आदिवासी धर्म स्थापनेसाठी चळवळी होत आहेत.

डॉ. शरच्चंद्र गोखले (संपादक दै. केसरी, पुणे) यांनी मोठ्या मार्मिकपणे सूचवले आहे की, ''दलितांभोवती समृद्ध संस्कृतीची चौकट आहे तर आदिवासी संस्कृतीला मातीचा सुगंध आहे.''[७] आदिवासींचा धर्म हा निसर्गावर आधारित निसर्गधर्म आहे. आदिवासी धर्म जाती व वर्गव्यवस्थेला नकार देणारा आहे. आदिवासींचा धर्म विशाल, विस्तृत धारेचा आहे. त्यात मानवतावादी संस्कृती आहे. ती मुळातून प्रतिबिंबित होण्याची गरज आहे.

## ५. वीरपुरूषांचे ऐतिहासिक कर्तृत्व:

आदिवासी चळवळींना संघर्षांच्या विविध छटा आहेत. एकाच प्रकारच्या सामाजिक जाचातून त्यांचा विद्रोह जन्माला आलेला नाही. काही आदिवासी जमातींनी आत्मसन्मानाच्या चळवळी राबविल्या. काहींनी आपल्या धर्मसंस्कृतीवर होणारे परकीयांचे आक्रमण थोपविण्यासाठी उठाव केले. तर काहींनी शोषणाविरूद्ध, विषमतेविरूद्ध लढे उभारले आहेत.

आदिवासी साहित्यप्रवाहाला गौरवशाली इतिहास आहे. भारतीय स्वतंत्र लढ्यात अनेक आदिवासी वीरांनी आपल्या प्राणाची बाजी लावली आहे. त्यात राजस्थान, मेवाडचा राणा, सिंधू कान्हू, चांद भैरव, तिलका मांझी, तंट्या भिल्ल, खाजा नाईक, झाशीची झलकारी राणी, क्रांतीवीर बिरसा मुंडा, भागोजी भांगरा, राघोजी भांगरे, भागोजी नाईक इत्यादी वीरांचा समावेश होतो. त्यांचे कार्यकर्तृत्व हे वाङ्मयाच्या इतिहासात मोलाची भर घालणारे आहेत. या शूरवीरांच्या कर्तृत्वाच्या कार्यांची दिशा, चेतना घेऊन आपण नवीन साहित्यनिर्मिती केली पाहिजे, हा विचार नवआदिवासी युवकांना प्रेरणादायी ठरणारा आहे.

याबाबतीत शरणकुमार लिंबाळे म्हणतात की, ''आदिवासी जमातींचा धर्म व आदिवासी वीरपुरूषांचे ऐतिहासिक कर्तृत्व व बंडखोरी इंग्रजी सत्तेच्या विरोधातील प्रचंड बंड व त्यांच्या मुक्तीसंग्रामाची लढे, त्यांचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक योगदान हे सारे आदिवासी साहित्याची प्रेरणा होऊ शकेल असे वाटते.''[८] याबाबतीत कवी दशरथ मडावी म्हणतात की,

*''बिरसाई एक बिरसा दे, लढाईचा वारसा दे,*
*टोकदार तीर दे, आदिमांचे वीर दे,*
*तंट्या मामा भाला दे, शंकरशहा तलवार दे,*
*हातांना या धार दे...''[९]*

त्या दृष्टीने ही बोलकी उदाहरणे आहेत.

## ६. वैज्ञानिक किंवा आधुनिक प्रेरणा :

जागतिकीकरण आणि नागरीकरण यांच्या रेट्यामुळे आज आदिवासी साहित्यात परिवर्तन होताना दिसत आहे. आधुनिक किंवा वैज्ञानिक प्रेरणेच्या बाबतीत आदिवासी संशोधक, अभ्यासक पितांबर कोडापे म्हणतात की, ''आदिवासी साहित्य हे कोणत्याही प्रेरणेचे नसून ते स्वप्रेरित आहे. स्वतंत्र बाण्याचे व स्वयंभू आहे, तर कोणत्याही साहित्याची स्पष्ट नक्कल वा अनुकरण नाही. सामाजिक व शैक्षणिक, वैचारिक अस्तित्वाची व अस्मितेची लढाई करणारे साहित्य आहे.''[१०] म्हणजेच आदिवासी समाजबांधवाने २१व्या शतकातील वैज्ञानिक दृष्टिकोन समोर ठेवून साहित्यनिर्मिती केली पाहिजे. त्याअर्थाने कवी तुकाराम धांडे यांच्या कविता खूप बोलक्या आहेत. मार्मिक आहेत.

## ७. महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार :

१९व्या शतकात ज्या वाङ्मयीन चळवळी उदयाला आल्या त्यामागे परिवर्तनाची भूमिका होती. समाजात परिवर्तन व्हावे, यासाठी अनेक समाजसुधारकांनी आंदोलने, चळवळी उभारलेल्या आपणास ज्ञात आहेत. महात्मा फुल्यांनी स्त्रीशिक्षण, बालविवाह, विधवाविवाह याबाबतीत संघर्ष करून क्रांती घडवून आणली आहे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे 'शिका–संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे विचार आजच्या साहित्याला प्रेरक ठरले आहेत. स्पष्टपणे सांगायचेच झाले तर 'दलित साहित्य' आजचे क्रांतिविज्ञान ठरत आहे. याची एक दिशा आदिवासी

साहित्याला लाभली हे नाकारून चालणार नाही. म्हणूनच आदिवासी साहित्याचे अभ्यासक प्रा. विनोद कुमरे आज महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिवर्तनशील व विधायक सामाजिक चळवळी याच 'आदिवासी साहित्या'च्या प्रेरणास्त्रोत मानतात.

## निष्कर्ष / तात्पर्य:

महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन थोर विचारवंतांचे, समाजसुधारकांचे प्रेरणादायी कार्यकर्तृत्व, जीवनसंग्राम विचार हे आदिवासी साहित्याला प्रेरणादायी आहेत.

## संदर्भग्रंथ :

१. नाडगोंडे गुरूनाथ, 'भारतीय आदिवासी', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे– ३०, प्र. आ. १९७९, पृ. क्र. ०२.
२. मेश्राम गोकुळदास, 'आदिवासी सिंधू संस्कृतीचे वारसदार व त्यांचा धम्म', सुगावा प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००६, पृ. क्र. १२६.
३. जोशी लक्ष्मणशास्त्री, 'मराठी विश्वकोश– खंड– १', महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई. प्र. आ. १९७६, पृ. क्र. २८.
४. गारे गोविंद, 'भारतीय आदिवासी समाज आणि संस्कृती', आदिम साहित्य, पुणे. प्र. आ. १९७५, पृ. क्र. ०१.
५. तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्य: स्वरूप आणि समीक्षा', विजय प्रकाशन, नागपूर. प्र. आ. १९९४, पृ. क्र. ०६.
६. गारे गोविंद, 'आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ', सुगावा प्रकाशन, पुणे. प्र. आ. २०००, पृ. क्र. १४५.
७. गारे गोविंद (संकलन), 'आदिवासी साहित्य संमेलने अध्यक्षीय भाषणे', सुगावा प्रकाशन, पुणे. प्र. आ. २००५, पृ. क्र. १०८.
८. लिंबाळे शरणकुमार (संपा.), 'मराठी वाङ्मयातील नवीन प्रवाह', मधुराज पब्लिकेशन्स, प्रा. लि. पुणे. प्र. आ. १९९३, पृ. क. १४५.
९. तुमराम विनायक, 'आदिवासी साहित्य: स्वरूप आणि समीक्षा', विजय प्रकाशन, नागपूर. प्र. आ. १९९४, पृ. क्र. ०६.
१०. रोंगटे तुकाराम (संपा.), 'आदिवासी साहित्य विशेषांक', एप्रिल २००७, पृ. क्र. १४.

❖❖❖

# मातृभाषेतून शिक्षण देणारे राष्ट्र - इस्रायल

# Mother Tongue: The Medium of Instruction in Israel

डॉ. पवन मांडवकर
प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१
अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद
E mail: pavanmandavkar@hotmail.com भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८

**गोषवारा**

लहानसे क्षेत्रफळ असलेला इस्रायल देश मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांनी वेढलेला एकमेव यहुदी देश म्हणून ओळखला जातो. 1948 मध्ये इस्रायल एक राष्ट्र म्हणून उदयास आले. सर्वच क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन, उच्चतंत्रज्ञानातील त्यांची प्रगती देदीप्यमान आहे. झायनिस्ट चळवळीआधी हिब्रू भाषा ही फक्त त्यांच्या धार्मिक पुस्तकांपुरती मर्यादित होती. इस्रायलच्या निर्मितीनंतर झायनिस्ट चळवळीतील ज्यूंचा सन्मान करण्यासाठी विविध शैक्षणिक संस्था, विमानतळ, रस्ते, शासकीय इमारती यांना त्यांची नावे दिली गेली. इस्रायली अभ्यासक्रमात झायनिस्ट चळवळीची ध्येयधोरणे प्रकर्षाने दिसून येतात. इस्रायलमध्ये बहुतेक सर्व शिक्षण हिब्रू माध्यमातच असते. चांगल्या शिक्षण पद्धतीमुळेच जागतिक क्रमवारीत हा द्वितीय क्रमांकाचा उच्चशिक्षित देश म्हणून गणला जातो. शाळांचे आणि अभ्यासक्रमांचे गरजेनुसार विविध प्रकार आणि सर्वसमावेशकता हे त्यांच्या शिक्षणप्रणालीचे वैशिष्ट्य आहे. विविधतेच्या गुंत्यातून एकतेकडे जाताना हिब्रू या मातृभाषेतून शिक्षण देणे हा त्यांचा केंद्रबिंदू आहे. लष्करी शिक्षणाच्या अनिवार्यतेमुळे नागरिकांमध्ये देशाविषयी प्रेम आणि श्रद्धा वृद्धिंगत होण्यास वाव मिळाला आहे. भारताने इस्रायलच्या शिक्षणपद्धतीतून बरेच काही घेण्यासारखे आहे.

## Abstract

Israel, a small country, is the only Jewish country in the Middle East surrounded by Arab nations. Israel emerged as a nation in 1948. Innovative research in all fields, their advancement in high technology is brilliant. Before the Zionist movement, the Hebrew language was limited to their religious books. After the creation of Israel, various educational institutions, airports, roads, and government buildings were named after them, in honor of those who involved in Zionist movement. The goals of the Zionist movement are reflected in the Israeli curriculum. In Israel, almost all education is in Hebrew. It is considered as the second most educated country in the world due to its good education system. The variety and inclusiveness of schools and curricula as per their needs is a feature of their education system. Their focus is on teaching in their mother tongue, Hebrew, as they move from diversity to unity. The compulsion of military education has given rise to love and faith in the country among the citizens. India has a lot to learn from Israel's education system.

**बीजशब्द :** इस्रायल, अरब, यहुदी, मातृभाषेतून शिक्षण, हिब्रू, ड्रूझ, ज्यू, झायनिस्ट चळवळ

**प्रस्तावना**

1948 मध्ये इस्रायल एक राष्ट्र म्हणून उदयास आले. भारतातील केरळपेक्षा लहान क्षेत्रफळ असलेला इस्रायल देश मध्यपूर्वेतील अरब राष्ट्रांनी वेढलेला एकमेव यहुदी देश म्हणून ओळखला जातो. येथे निम्म्यापेक्षा जास्त वाळवंटी प्रदेश आहे, तरी तिथे तेलाचे साठे नाहीत. लहानसा देश तरी आज

त्याची गणना ही अतिशय प्रगत राष्ट्रांत होते. इस्रायलकडे जागतिक स्तरावरील क्रमांक एकचे लष्कर आहे. सर्वच क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधन, उच्चतंत्रज्ञानातील त्यांची प्रगती वाखाणण्याजोगी आहे. जगातील सर्वोत्तम शक्तिशाली गुप्तहेर संघटना मोसाद इस्रायलचीच आहे. जगभरातून या देशात स्थलांतरित झालेल्या यहुदी लोकांमुळे येथे खूप वांशिक, धार्मिक आणि सांस्कृतिक गुंता आहे. कमीत कमी संसाधनांची उपलब्धता आणि सामाजिक आव्हाने तसेच अरब-यहुदी संघर्ष या सगळ्याला सांभाळून त्यांनी इतक्या कमी कालावधीत प्रगतीची जी झेप घेतली, त्याची पाळेमुळे त्यांच्या इतिहासात, यहुदी व्यक्तिमत्त्वात आणि त्यांच्या सर्वसमावेशक शिक्षण पद्धतीत सापडतात. स्थापनेपासून आजतागायत इस्रायलमध्ये मातृभाषेतून शिक्षण दिले जाते आणि संशोधन केले जाते. त्यांनी निर्माण केलेली शिक्षणपद्धती जगातील एक उत्कृष्ट शिक्षणपद्धती म्हणून ओळखली जाते.

## विषय विवेचन

यहुदी इतिहास पाहिला तर लक्षात येते की त्यांची स्थलांतरे आणि वांशिक व धार्मिक संघर्षाने भरलेला एकूण चार हजार वर्षांचा इतिहास त्यांना आहे. विविध आक्रमणांमुळे त्यांना त्यांच्या मूळ भूमीतून म्हणजे सध्याच्या इस्रायलमधून जगभरात स्थलांतरित व्हावे लागले; पण भारताचा अपवाद सोडला तर त्यांना कुठेही भूमीपुत्र म्हणून मान्यता मिळाली नाही. त्यामुळे जगण्यासाठी, उपजीविकेसाठी त्यांना व्यापार आणि इतर व्यवसायांवरच अवलंबून राहावे लागले.

स्वतःची संस्कृती आणि भाषा टिकवून ठेवण्यासाठी पूर्वी ते घरीच आपल्या मुलांना हिब्रू भाषेचे शिक्षण देत असत. यहुदी हे शिक्षणाचे महत्त्व असलेले सुशिक्षित लोक आहेत. इस्लामच्या उदयानंतर विरोधी विचारधारा वाढल्याने ज्यूंचा भारत वगळता सर्वत्र छळ झाला. या छळापासून त्यांना वाचवण्यासाठी झायनिस्ट चळवळीची सुरुवात झाली. या झायनिस्ट चळवळीतून ज्यूंच्या मूळ भूमीत ज्यू राज्याची पुनर्स्थापना करणे, त्यांचा धर्म, संस्कृती आणि हिब्रू भाषेचे संरक्षण व संवर्धन करणे, मूळ भूमीत कृषिप्रधान देश तयार करणे आणि नव्या यहुदी देशाच्या संरक्षणासाठी ज्यू लोकांना लष्करी प्रशिक्षण देणे असे नियोजन आखण्यात आले होते.

'झायनिस्ट चळवळीआधी हिब्रू भाषा ही फक्त त्यांच्या धार्मिक पुस्तकांपुरतीच मर्यादित होती. हिब्रूचा व्यावहारिक तसेच सर्व विषयांतील शब्दकोश निर्माण करून तिच्या पुनरुज्जीवनाचे कार्य झायनिस्ट चळवळीने केले. हिब्रू भाषेतून शिक्षण देणे याबाबत ते खूपच आग्रही होते. त्यामुळेच 1912 साली हैफा शहरात टेक्निऑन या पहिल्या तंत्रशिक्षण संस्थेचे शिक्षणाचे माध्यम हे हिब्रूच ठेवले होते.'[1] आजही इस्रायलमध्ये संभाषण व्यवहार आणि नर्सरी ते उच्च शिक्षण, अगदी वैद्यकीय शिक्षणदेखील हिब्रू भाषेतूनच होते. संशोधनाचे प्रबंधदेखील हिब्रू भाषेतूनच लिहिले जातात. इस्रायलमध्ये येणाऱ्या सर्वांना हिब्रू भाषा शिकावीच लागते, म्हणून त्यांनी अत्यंत वेगवान पद्धतीने तसेच परिणामकारक अशी हिब्रू भाषा शिकविण्यासाठी 'हिब्रू उल्पान' ही पद्धत विकसित केलेली आहे. यामध्ये हिब्रू संभाषण, वाचन-लेखन यांवर भर दिलेला आहे. 1918 साली जेव्हा जेरुसलेम मध्ये हिब्रू विद्यापीठाची स्थापना केली, तेव्हा सर्वप्रथम त्यांनी तिथे ग्रंथालय आणि प्रयोगशाळा बांधल्या. यातून त्या लोकांची संशोधनासाठी असलेली कळकळ दिसून येते.

अमेरिकेत ज्यूंची संख्या फक्त दोन टक्के असली तरी तेथील सर्व ज्यू हे अतिशय प्रभावशाली आहेत आणि म्हणूनच इस्रायलला अमेरिकेची मदत नेहमीच मिळत असते. नोबेल पारितोषिक विजेत्यांमध्ये 226 हे ज्युईश आहेत आणि त्यातील 12 इजरायली आहेत. त्याचप्रमाणे गणितातील प्रतिष्ठेचे फिल्ड्स पारितोषिक आतापर्यंत 15 ज्युईश लोकांना मिळालेले आहे आणि त्यातील एक इस्रायलचा आहे. एकंदरीत ज्यू लोकांचा आणि पर्यायाने इस्रायलचा जागतिक स्तरावरील संशोधन आणि

इतर क्षेत्रात दबदबा दिसून येतो. इस्रायलमध्ये पूर्वीपासून राहत असलेले अरब, मुसलमान, ख्रिश्चन, ड्रूझ आणि जगभरातून स्थलांतरित झालेले अश्कनाजी व सफार्दी ज्यू यांच्यामुळे एक प्रकारचा धार्मिक, सांस्कृतिक गुंता तयार झालेला आहे. यातून इस्रायलने एक पंचसूत्री अवलंबली. यातील पहिले सूत्र म्हणजे ज्यू धर्म व संस्कृतीचा अवलंब करून ती वृद्धिंगत करणे. दुसरे सूत्र म्हणजे बोली भाषा, व्यवहाराची भाषा, ज्ञानभाषा आणि राजभाषा म्हणून हिब्रू भाषेचाच वापर करणे. तिसरे सूत्र म्हणजे देशाच्या आर्थिक उभारणीसाठी कृषी, व उद्योगावर आधारित किबुत्सिम आणि मोशाव्हिम यांचा उपयोग करणे. चौथे सूत्र होते, प्रत्येकाच्या इच्छा व आवडीवर आधारित सर्वसमावेशक अशी शिक्षण पद्धती वापरणे. देशाच्या सुरक्षिततेसाठी तसेच सदैव सज्ज राहण्यासाठी अनिवार्य लष्करी शिक्षण हे पाचवे सूत्र होते.

## झायनिस्ट चळवळीच्या ध्येयधोरणांवर आधारित अभ्यासक्रमाची सहा तत्त्वे

'इस्रायली अभ्यासक्रमात झायनिस्ट चळवळीची ध्येयधोरणे प्रकर्षाने दिसून येतात. त्यांच्या अभ्यासक्रमाची सहा तत्त्वे अशी -

1. मुळे - यात ज्यूईश लोकांचे इस्रायलच्या भूमीशी असलेले नाते, त्यांची पाळेमुळे समजून घेणे यावर भर दिला जातो.

2. पुनर्जन्म - यामध्ये झायनिस्ट चळवळीची गरज, त्याची माहिती, हिब्रू भाषेचे पुनरुज्जीवन कसे केले गेले, इस्रायलचा स्वातंत्र्यासाठीचा संघर्ष, स्थापना व स्वातंत्र्य यांवर भर दिलेला आहे.

3 नवीन भूमी - यामध्ये इस्रायलच्या सीमारेषांविषयी माहिती घेणे, त्यांचे नकाशे तयार करणे, मध्यपूर्वेतील इस्रायलचे स्थान कसे आव्हानात्मक आहे यावर भर दिलेला आहे.

4 समकालीन समाज - यात समकालीन इस्रायली समाज कसा तयार झाला, ज्यूईश संस्कृती, इस्रायलमधील ऐतिहासिक, धार्मिक ठिकाणे, इस्रायली कला आणि संगीत, इस्रायली लोक यांविषयी माहिती देणे, देशातील नवीन संशोधने आणि हायटेक इस्रायलची निर्मिती, साहित्यिकांच्या दृष्टिकोनातून आपला देश कसा आहे, या सगळ्यांची माहिती दिली जाते.

5 महत्वाची तत्वे - यात अरब ज्यू संघर्ष, इस्रायलचे संरक्षण, इस्रायलची न्यायव्यवस्था, इस्रायली संसद, इस्रायलचे लोकशाहीसाठीचे प्रयत्न आणि इस्रायलमधील शिक्षण या माहितीवर भर दिलेला आहे.

6 माझा इस्रायल - यामध्ये इस्रायली तसेच ज्युईश म्हणून ओळख म्हणजेच इस्रायलशी एकनिष्ठ असणे यावर भर दिलेला आहे.'[2]

इस्रायली अभ्यासक्रमाची ही सहा तत्त्वे पाहिली की लक्षात येते की, शिक्षण तज्ज्ञांनी इस्रायली अभ्यासक्रमाचा अतिशय दूरदृष्टीने विचार केला आहे. धर्म तसेच संस्कृती आणि इस्रायल एक देश म्हणून त्याविषयी प्रेम निर्माण करणे याचा विचार केला आहे. देशाविषयी एक महत्त्व निर्माण करणे, त्यावर एक प्रकारचा मालकी हक्क निर्माण करणे, यासाठी शिक्षणाचा उपयोग करून घेतलेला आहे.

इस्रायलच्या निर्मितीनंतर झायनिस्ट चळवळीतील सर्व नेते आणि देशाच्या निर्मितीमध्ये योगदान देणाऱ्या सर्व ज्यूंचा सन्मान करण्यासाठी विविध शैक्षणिक संस्था, विमानतळ, रस्ते, शासकीय इमारती यांना त्यांची नावे दिली गेली.

## इस्रायलमधील शालेय शिक्षणाचा आराखडा

इस्रायलमध्ये सर्व शिक्षण हिब्रू माध्यमातच असते. शालेय शिक्षणाचा शैक्षणिक आराखडा बघितला तर लक्षात येते की प्रायमरी प्राथमिक शिक्षण पहिली ते सहावी आणि वयोगट सहा ते बारा वर्षे, सेकंडरी सातवी ते नववी आणि वयोगट 12 ते 14 वर्षे हायस्कूल किंवा उच्च माध्यमिक शिक्षण दहावी ते

बारावी आणि वयोगट 14 ते 19 वर्षे असे आहे. हायस्कूल पूर्ण केल्यानंतर पदवी शिक्षण चालू करण्यापूर्वी 80 टक्के विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण अनिवार्य आहे. त्यासाठी वयोमर्यादा 21 वर्षे इतकी आहे.

## इस्रायलमधील उच्च शिक्षणाचा आराखडा

लष्करी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी उच्च शिक्षण घेतात. त्यात फर्स्ट डिग्री (बॅचलर्स), सेकंड डिग्री (मास्टर्स), थर्ड डिग्री (प्रोफेशनल कोर्सची पदवी किंवा पीएच.डी.) उच्च शिक्षणासाठी मात्र वयोमर्यादेच्या बंधन नसते. इस्रायलमध्ये उच्च शिक्षणाचे माध्यम देखील हिब्रूच आहे. इंटरडिसिप्लिनरी अभ्यासक्रमांस सेकंड डिग्रीमध्ये महत्त्व आणि प्रोत्साहन दिले जाते. म्हणजे एखाद्याची फर्स्ट डिग्री शिक्षण शास्त्रात असेल तर दुसरी डिग्री ती व्यक्ती संगणक क्षेत्रात किंवा मानसशास्त्रातदेखील करू शकते. नंतर पीएच.डी. म्हणजे थर्ड डिग्री पूर्ण करताना या दोन्हींचे उपयोजन करू शकते. त्यामुळे नवीन संशोधनास प्रोत्साहन मिळते.

## इस्राईलमधील शाळांचे विविध प्रकार

इस्राईलमध्ये शाळांचे विविध प्रकार आहेत. यात मुख्यतः ज्यू लोकांसाठी ज्यूईश शाळा आणि अरब लोकांसाठी अरब शाळा आहेत. ज्यूईश शाळा हिब्रू माध्यमाच्या आहेत तर अरब शाळा या अरबी माध्यमातून आहेत.

ज्यूईश शाळांचे चार विविध प्रकार आहेत - कर्मठ धार्मिक, स्टेट रिलीजस, स्टेट सेक्युलर आणि चौथा प्रकार म्हणजे डेमोक्रॅटिक किंवा स्पेशल स्कूल्स. अरब शाळांचे तीन प्रकार आहेत - मुसलमान अरब, ख्रिस्ती अरब, ड्रूझ अरब.

इस्रायलमधील सर्व अरबी आणि ज्यूईश शाळा या सरकारी शाळा आहेत आणि शिक्षण हे सर्वांना अनिवार्य आहे. कर्मठ धार्मिक शाळा या धार्मिक शिक्षणावर खूप भर देतात तर स्टेट रिलीजस शाळांमध्ये धार्मिक शिक्षणाबरोबरच आधुनिक विज्ञान, गणित यांचेही शिक्षण दिले जाते. या दोन्ही प्रकारच्या धार्मिक शाळांमध्ये कोएज्युकेशन नसून मुलांसाठी आणि मुलींसाठी स्वतंत्र वर्ग आहेत. स्टेट सेक्युलर शाळांमध्ये धार्मिक शिक्षण कमी आणि सगळा भर हा आधुनिक विज्ञान, गणित, तंत्रज्ञान यांच्यावर असतो. स्पेशल स्कूल्समध्ये एका विशिष्ट उद्दिष्टावर अधिक भर असतो. या दोनही प्रकारच्या शाळा कोएज्युकेशनच्या आहेत. अरबी शाळांमध्ये त्या त्या धर्माच्या धार्मिक शिक्षणावर अधिक भर असतो. सर्व अरबी शाळांमध्ये मुलांचे आणि मुलींचे वर्ग स्वतंत्रपणे भरवले जातात.

याव्यतिरिक्त इस्रायलमध्ये इंटरनॅशनल स्कूल्स आहेत, ज्यात सगळे शिक्षण इंग्रजी माध्यमातून दिले जाते. या शाळा मुलामुलींसाठी एकत्रित आहेत. या शाळा खाजगी आहेत.

## शाळांमधील अभ्यासक्रम आणि शिक्षण

शाळांमधील अभ्यासक्रमात पहिली ते बारावी सहा विषय अनिवार्य आहेत. या सहा विषयांमध्ये हिब्रू भाषा, इतिहास, इंग्रजी, हिब्रू बायबल, साहित्य (हिब्रूमधून आंतरराष्ट्रीय साहित्य) आणि नागरिक शास्त्र यांचा अंतर्भाव आहे. गणित हा विषय कर्मठ धार्मिक शाळा सोडल्या तर बाकी सर्व शाळांना अनिवार्य आहे. भूगोल हा विषयदेखील इयत्ता नववीपर्यंत अनिवार्य असून पुढे मात्र ऐच्छिक आहे. धार्मिक शाळा सोडल्या तर इतर शाळांमध्ये विज्ञान, फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी, टेक्नॉलॉजी, रोबोटिक्स इत्यादी इयत्ता नववीपर्यंतचे विषय अनिवार्य असतात आणि पुढे ऐच्छिक असतात. स्पोर्ट्स आणि कला हे इयत्ता नववीपर्यंत अनिवार्य असते आणि पुढे ऐच्छिक असते; पण या दोन्ही विषयांची परीक्षा घेतली जात नाही.

शालेय शिक्षणात सरकारतर्फे दोन मुख्य परीक्षा घेतल्या जातात. पहिली परीक्षा साधारणपणे पाचवी ते सहावी दरम्यान घेतली जाते. या परीक्षांत शाळेतर्फे ग्रेड दिल्या जातो. पण सगळे रेकॉर्ड्स सरकारी दस्तऐवजात जातात. दुसरी परीक्षा म्हणजे 'बगरूत'. ही शालान्त परीक्षा असते. ही उत्तीर्ण होण्यासाठी दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना अनिवार्य विषयांव्यतिरिक्त दोन अधिक विषय घ्यावे लागतात.

सर्व शिक्षण हे हिब्रू माध्यमात असते; पण फर्स्ट डिग्री आणि सेकंड डिग्रीआधी प्रत्येकाला इंग्रजीची एक परीक्षा द्यावी लागते. ही परीक्षा त्यांचे इंग्रजी भाषेचे ज्ञान कितपत आहे हे समजण्यासाठी घेतली जाते. जे इंग्रजीच्या परीक्षेत उत्तीर्ण होतील, त्यांना पुढे इंग्रजी भाषा शिकावी लागत नाही. ज्यांना इंग्रजी एक भाषा म्हणून पुढे शिकायचे असेल तर ऐच्छिक भाषा म्हणून शिकू शकतात. अभ्यासक्रम बनविणारी केंद्रीय समिती साधारणपणे दर दहा वर्षांनी अभ्यासक्रम बदलते. अभ्यासक्रम बदलला तरी त्याच्या मूळ तत्वांपासून दूर जात नाही.

कर्मठ धार्मिक ज्यूईश शाळांमध्ये सर्वाधिक भर हा बायबल आणि ज्यूईश पोथ्या शिकण्यावर दिलेला असतो आणि या शाळांमध्ये सहावीच्या पुढे गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, रोबोटिक्स हे विषय शिकवत नाहीत. शाळांमधील विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण संपल्यावर लष्करी शिक्षण असते.

स्टँडर्ड धार्मिक शाळांमध्येही बायबलच्या शिक्षणावर भर असतोच पण गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, संगणक शास्त्र, रोबोटिक्स विषय शिकवतात. या शाळांमध्ये लष्करी शिक्षण मुलांना अनिवार्य असते तर मुलींना लष्करी शिक्षण किंवा सोशल सर्विस असे दोन पर्याय उपलब्ध आहेत.

स्टेट सेक्युलर शाळांमध्ये धार्मिक शिक्षणावर भर नसला तरी बारावीपर्यंत बायबल शिकवणे अनिवार्य आहे आणि त्याचप्रमाणे आधुनिक गणित, विज्ञान, तंत्रज्ञान, रोबोटिक्स या विषयांवर अधिक भर असतो. या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना लष्करी शिक्षण अनिवार्य आहे.

स्पेशल स्कूल्स या एक विशिष्ट शैक्षणिक उद्दिष्ट ठेवून चालविल्या जातात. त्यांना 70 टक्के जनरल अभ्यासक्रम असतो आणि तीस टक्के अभ्यासक्रम हा त्यांच्या विशिष्ट उद्दिष्टांनुसार ठेवण्याची मुभा असते. हिब्रू व अरब शाळांमध्ये ज्यूईश तसेच आंतरराष्ट्रीय इतिहास शिकवला जातो तर अरब शाळांमध्ये इस्लामी इतिहासदेखील शिकवला जातो. अरब शाळांमध्ये ज्यूईश बायबल न शिकवता ज्या धर्माची ती शाळा असेल, त्या धर्माचा धर्मग्रंथ शिकवला जातो.

आता ज्यूईश आणि अरब मुलांना एकत्र शिकण्याचा प्रयोग करणाऱ्या दोन शाळाही काढलेल्या आहेत. त्यात सर्वांचा इतिहास आणि सर्व धर्मांविषयी शिकवणे असा उपक्रम चालू झालेला आहे.

सेक्युलर शाळा आणि स्पेशल स्कूल्समध्ये शिक्षकांना अधिक स्वतंत्र असते तर धार्मिक शाळांमध्ये नसते. काही शाळांमध्ये अध्यापन पद्धती, अध्ययन प्रक्रिया, मुख्याध्यापक कोण असावा या निर्णयप्रक्रियेमध्ये पालकांचा सक्रिय सहभाग असतो. शाळांची वेळ सहा तास असते; पण ॲडव्हान्स गणित, ॲडव्हान्स रोबोटिक्स, ॲडव्हान्स फिजिक्स इत्यादी घेतलेल्या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांना दहा तासांची शाळा असते. त्यातच प्रॅक्टिकल, प्रॉब्लेम सॉल्व्हिंग वगैरे समाविष्ट असते. एक शैक्षणिक तास सुमारे 45 मिनिटांचा असतो आणि एका वर्गात तीस ते चाळीस विद्यार्थी संख्या असते. इतक्या प्रकारच्या शाळा आणि त्यांच्या अभ्यासक्रमांतील थोडेथोडे बदल यामुळे पाठ्यपुस्तकांची निर्मिती करण्याचे काम स्थानिक मुनिसिपल कार्पोरेशनचा शैक्षणिक विभाग पाहतो.

## इस्रायलमधील शिक्षणप्रणालीसंबंधी इतर माहिती

सार्वजनिक वाचनालयांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत सदस्यत्व मिळते आणि त्यामुळे शालेय अभ्यासक्रमाव्यतिरिक्त देखील विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचन संस्कृती वाढते. शाळांमध्ये आधुनिक

तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. वैयक्तिक टॅब्ज, लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम स्मार्ट बोर्ड वगैरे असतात आणि self-assessment, ज्ञानरचनावाद, प्रकल्प आधारित, अनुभवाधारित अध्ययन, ओपन लर्निंग अशा अत्याधुनिक अध्ययन तंत्रांचा वापर केला जातो.

काही शाळांमध्ये नववीमध्ये मुलांना जर्मनी, पोलंड, ऑस्ट्रिया या ठिकाणी असलेल्या हॉलोकॉस्टमधील ज्यूंसाठीच्या छळछावण्यांच्या स्मारकाला भेट देण्याचा उपक्रम देखील राबवतात. यातही अनेक विद्यार्थी स्वखर्चाने सहभागी होतात.

हैफासारख्या शहरांमध्ये पाठ्यपुस्तकांचा पुनर्वापर होत असतो. इस्राईलमध्ये सेकंड हॅन्ड वस्तूंचा वापर कशाचीही लाज न बाळगता लोक करत असतात. शिक्षण जरी सर्वांना विनामूल्य असले तरी काही शैक्षणिक उपक्रम राबविण्यासाठी शुल्क आकारले जाते.

इस्रायल हे ज्यू किंवा यहुदी राष्ट्र म्हणून जगात प्रसिद्ध असले तरी ते धर्मांध नाहीत. देशातून किंवा देशाबाहेरून काम करणाऱ्या इस्रायली शास्त्रज्ञांनी देशाची निर्मिती झाल्यापासून आतापर्यंत विविध क्षेत्रात मिळून एकूण 104 नाविन्यपूर्ण शोध लावले आहेत. आजमितीला इस्राईलमध्ये 6400 स्टार्ट-अप्स आणि 362 मल्टिनॅशनल कंपन्या कार्यरत आहेत. येथे सध्या 30 पेक्षा जास्त तंत्रज्ञानातील कंपन्या असून त्यांची किंमत एक बिलियन अमेरिकन डॉलर पेक्षाही जास्त आहे. ही किंमत सगळ्या युरोपमधील कंपन्या एकत्र केल्या तरी त्यापेक्षा जास्त होईल. या देशातील 40 टक्के निर्यात होणारी उत्पादने हायटेक सदरात मोडतात तर 60 टक्के निर्यात सेवा या तंत्रज्ञान क्षेत्रातील आहेत.

प्राध्यापिका मिरिअम अमित सांगतात, 'आमचा देश आकाराने एक लहानसा देश आहे. देशात साधनसंपत्ती फारशी नाही. सर्वत्र वाळवंट, शेतीसाठी योग्य अशी अगदी थोडीशीच जमीन उपलब्ध आहे. खनिज संपत्ती बेताचीच, तेलसाठा असून नसल्यासारखाच. त्यामुळे मुले हीच आमची संपत्ती आहे. त्यांचा विकास करूनच आम्ही देशाची प्रगती करू शकतो, याची आम्हाला चांगली जाणीव आहे. म्हणूनच आम्ही मनुष्यबळ विकासावर लक्ष केंद्रित केले. त्यासाठी योग्य शिक्षणप्रणाली विकसित केली. त्याचीच फळे आता आम्ही चाखतो आहोत.'[3]

त्यांच्या प्रगत शिक्षण पद्धतीमुळे इस्रायल जागतिक क्रमवारीत द्वितीय क्रमांकाचा उच्चशिक्षित देश म्हणून गणला जातो.

## समारोपीय निष्कर्ष

इस्रायल हे राष्ट्र धर्मांध नाही, पण त्यांच्या शिक्षणपद्धतीत धार्मिक शिक्षण महत्त्वाचे आहे. शाळांचे आणि अभ्यासक्रमांचे गरजेनुसार विविध प्रकार आणि सर्वसमावेशकता हे त्यांच्या शिक्षणप्रणालीचे वैशिष्ट्य आहे. विविधतेच्या गुंत्यातून एकतेकडे जाताना हिब्रू या मातृभाषेतून शिक्षण हा त्यांनी स्वीकारलेला सर्वात महत्त्वपूर्ण प्रगतीचा मार्ग आहे. लष्करी शिक्षणाच्या अनिवार्यतेमुळे नागरिकांमध्ये देशाविषयी प्रेम आणि श्रद्धा वृद्धिंगत होण्यास वाव मिळाला आहे.

इस्रायलच्या शिक्षण पद्धतीचा अभ्यास करताना आपल्याला त्यातून नेमके काय घेता येईल, तर मातृभाषेतून दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देता येईल. हिब्रू उल्पानच्या धर्तीवर विविध राज्यांतील भाषा शिकण्यासाठी विविध वर्गांचे आयोजन करता येईल. सर्व राज्यांचा आणि भारताचा वैविध्यपूर्ण इतिहास आपल्या शालेय विद्यार्थ्यांना शिकवता येईल. परिणामी भारतीय संस्कृती आणि परंपरा या विषयी माहिती मिळेल आणि विद्यार्थ्यांना त्याविषयी अभिमान वाटेल. गरजांनुसार विविध उपक्रम आणि विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करता येतील. शिक्षण व्यवस्थेचा भविष्यातील गुंतवणूक या दृष्टिकोनातून स्वीकार करून शिकून बाहेर पडलेल्यांचे देशाच्या उभारणीत किती योगदान घेता येईल, याचा विचार करून योग्य तिथे प्राधान्य देता येईल. शाळा-महाविद्यालयांमध्ये काही प्रमाणात लष्करी प्रशिक्षण किंवा

शारीरिक प्रशिक्षणावर जोर देता येईल. शालेय स्तरावर उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी इनोव्हेशन अँड आंत्रोप्रिनॉरशिपसारखे अभ्यासक्रम ठेवता येईल. प्रत्येक क्षेत्रातील संशोधनाला महत्त्व प्राप्त करून देता येईल. आधुनिकतेची कास धरताना शिक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने कसा करता येईल, यावर भर देता येईल.

## संदर्भ

1. लळिंगकर, (डॉ.) अपर्णा, 'मातृभाषेतून शिक्षण व संशोधन तसेच लष्करी प्रशिक्षणाला प्राधान्य - इस्रायल', शिक्षण संक्रमण, संपा. डॉ. अशोक भोसले आणि इतर, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे, वर्ष दहावे, अंक चौथा, ऑक्टोबर 2021, पृ.10

2. उनि.पृ. 11, 12

3. आगरकर, (प्रा.) सुधाकर, 'नवे प्रवाह', दै. लोकसत्ता, मुंबई, google.com/amp/s/www.loksatta.com या संकेतस्थळावरील दि. 23 सप्टेंबर, 2013 च्या लेखावरून उद्धृत

## संदर्भ संकेतस्थळे

1. https://www.nuffic.nl
2. https://www.techlearning.com
3. https://education.stateuniversity.com

❖❖❖

# नवकथेच्या दुसऱ्या पर्वातील लेखिका

**प्रा.डॉ.सौ. वीरा पवन मांडवकर**
**सहायक प्राध्यापक**
**इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ**
**इ मेल** veeramandavkar18@gmail.com **भ्रमणध्वनी 9403014885**

## गोषवारा :

स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणामुळे मोठ्या प्रमाणावर स्त्रीकथालेखिका लेखन करू लागल्या. 1960 नंतर बदलत्या सामाजिक व वाङ्मयीन विश्वाचे प्रतिबिंब तिच्यात उमटले. पुढे स्त्रीलेखिकांनी स्त्रीजीवनातील अचूक बारकावे टिपून कथा अधिक भावपूर्ण केली. वसुंधरा पटवर्धन, वसुधा पाटील, सरिता पदकी या लेखिकांनी कथेच्या क्षेत्रात आपले स्थान निर्माण केले. त्यांना कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे यांच्याइतकी लोकप्रियता लाभलेली नसली तरी, त्यांच्या कथा उल्लेखनीय ठरल्या. नवकथेने केवळ किडलेल्या मनाची विरुपताच वाचकांसमोर ठेवली नाही तर मानवी जीवनाच्या मूलभूत अंगांना तेवढ्याच तटस्थ भक्कमपणाने चित्रित करण्याची मार्मिकता दाखविली. वसुंधरा पटवर्धन आपल्या कथांतून स्त्रीमनाच्या त्यागाच्या, समर्पणाच्या, प्रीतीच्या, सोशिकपणाच्या विविध छटा समरसून रंगवितात. वसुधा पटवर्धनांच्या कथा स्त्रीजीवनाचे दुःख प्रभावीपणे मांडतात. सरिता पदकी यांची कथा आटोपशीर आणि चिमुकल्या आकाराची आहे. बदलत्या काळासोबत स्त्री लेखिकांच्या लेखनाने मराठी कथावाङ्मय बहरले आहे.

**बीजशब्द :** नवकथा, घटना, स्त्रीमन, आत्मप्रत्यय, परंपरा, समस्या, नवविचार, चित्रण, प्रवाह

## प्रस्तावना :

1958 ते 1960 च्या दरम्यान मराठी कथा आवर्तात सापडली होती. फडके युगातील तंत्रबद्धतेपासून मुक्त होऊन ती मनोविश्लेषणात रमली आणि तेथेच घुटमळली. दुसऱ्या महायुद्धानंतर जीवनातील परंपरागत विविध निष्ठांना तडा गेला. युद्धातील भेसूरता प्रतीत झाली. अर्थशून्यता व वैफल्यग्रस्तता यांचे पडसाद सगळीकडे उमटू लागले. बाह्य जगताचे व्यक्तीमनावर होणाऱ्या परिणामाचे प्रतिबिंब नवकथेत उमटले. नवकथेने केवळ किडलेल्या मनाची विरुपताच वाचकांसमोर ठेवली नाही तर मानवी जीवनाच्या मूलभूत अंगांना तेवढ्याच तटस्थ भक्कमपणाने चित्रित करण्याची मार्मिकता दाखविली. नवकथेच्या प्रांतात लेखिकांनीही आपली प्रतिभा आजमावली. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या प्रचारातून सुशिक्षित स्त्रियांची पिढी निर्माण झाली. विविध तऱ्हेच्या मासिकांची संख्या वाढली. यांतूनच मोठ्या प्रमाणावर स्त्रीकथालेखिका लेखन करू लागल्या.

## विषय विवेचन :

मराठी कथाङ्मयाच्या विकास प्रवाहाचा विचार करताना अव्वल इंग्रजी कालखंडापासून नवकथा कालखंडापर्यंत कथेच्या समृद्धीचे अनेक टप्पे पडतात. 1960 नंतर बदलत्या सामाजिक व वाङ्मयीन विश्वाचे प्रतिबिंब तिच्यात उमटले. पुढे स्त्रीलेखिकांनी स्त्रीजीवनातील अचूक बारकावे टिपून कथा अधिक भावपूर्ण केली. स्त्रीची अगतिकता, अबला संबोधून तिची होणारी उपेक्षा व शोषण, तिची दुःखद जीवनजाणीव, तिच्या कसर लागलेल्या विकल जीवनातील तडफड, शिक्षणाच्या संस्कारातून तिच्या जागवलेल्या इच्छा आकांक्षा व पारंपरिक पुरुषप्रधान संस्कृतीची सर्वंकषता यांचे चित्रण करताना स्त्रियांच्या कथा फुलतात. येथे अशा लेखिकांचा विचार केला गेलेला आहे, ज्यांनी कथेच्या क्षेत्रात आपलेही स्थान निर्माण केले आहे. त्यांना कमल देसाई, गौरी देशपांडे, सानिया, आशा बगे यांच्याइतकी लोकप्रियता लाभलेली नसली तरी, त्यांच्या कथा एका विशिष्ट काळापुरत्या का होईना, लोकप्रिय म्हणून गणल्या गेल्या.

## वसुंधरा पटवर्धन :

वसुंधरा पटवर्धन यांचे 'शोध', 'अंतरपाट', 'अद्‌भुत', 'भाग्य', 'प्रतिबिंब', 'सती', 'सल', 'तपश्चर्या', 'विधुर', 'साधक', 'साळू', 'ग्लानी' हे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांच्या कथा वाचल्यानंतर लक्षात येते की, या कथांद्वारा लेखिकेने जीवनातील काही अद्‌भुत असाधारण घटनाचमत्कृतीकडे

विशेषत्वाने लक्ष वेधलेले आहे. त्यांच्या कथांतील पात्रे ही दिसायला सामान्यच असतात. पण या सामान्यातील असामान्यत्व क्रमाक्रमाने वसुंधराबाई उलगडत जातात. विविध घटनांतून ही व्यक्तिमत्त्वे प्रस्फुरित होतात. व्यक्तिमनाची पकड घेतात. त्यांच्या ऐसपैस कथावस्तूतून मानवी मनाचे अनाकलनीय संकेत भूत वर्तमानातल्या चमत्कृतीपूर्ण घटनाबाहुल्यातून भवितव्याचा वेध घेतात. कथा ऐसपैस असली तरी तिचे एकंदर स्वरूप नीटनेटके, रेखीव आहे. 'कसलाही आक्रोश न करता, उरबुडवी भाषा न वापरता, लालित्यपूर्ण साध्या शब्दांत, जीवनातील प्रखर सत्यावर या कथा एक झोत टाकून जातात तेव्हा एक करूण सत्य साकारते. म्हणून त्यांच्या कथा जीवनमूल्ये साकारणाऱ्या आहेत.'[1] कथावस्तूच्या प्रवाहात अनेकविध बारीक सारीक घटनांचा उपयोग कथा फुलविण्याकरिता व परिणामकारक करण्याकरिता त्या करतात. इतर मराठी कथालेखिकांप्रमाणे वसुंधरा पटवर्धन यांनीही स्त्रियांची विविध दुःखे, त्यांच्या भावभावना, बदलते विश्व यांचे प्रामुख्याने चित्रण केले. त्यांची पुरुषपात्रे गौण आहेत. स्त्रीपात्राच्या अनुषंगाने ती येतात. त्यांचे चित्रणही पुरेसे स्पष्ट होत नाहीत.

वसुंधराबाईंची कथा स्त्रीपात्रांचे दुःख वर्णन करताना विशेष प्रवाही होते. स्त्रीमनाच्या त्यागाच्या, समर्पणाच्या, प्रीतीच्या, सोशिकपणाच्या विविध छटा त्या समरसून रंगवितात. स्थिर वृत्तीने दुःखाला सामोरे जाणारी 'साधक' कथेतील अंबिकाबाई, वडिलांच्या निधनानंतर कुटुंब सांभाळण्यासाठी स्वतःच्या प्रियकराच्या लग्नाच्या मागणीला नकार देणारी, पण पुढे जीवन प्रवासात अनेक वर्षांनी गतजीवनातील प्रियकर त्याच्या पत्नीसमवेत दिसल्याबरोबर निसर्गसूलभ भावना उफाळून येऊन दुःखी होणारी 'ग्लानी' कथेतील विमल पाठक, नवऱ्यावर निःसीम प्रेम करणारी व त्याच्या निधनानंतर दुःखातिरेकाने आत्महत्या करण्याचा विचार करणारी व अखेर जणू स्थितप्रज्ञवृत्तीने जीवन जगणारी 'घेणेकरी' कथेतील माई, नवऱ्याने टाकून दिलेली 'हेलपाटे' कथेतील परित्यक्त्या चंपुताई, त्याच नवऱ्याच्या खोलीवर त्याचे मन वळविण्यासाठी जन्मभर जात राहातात. खोट्या आशेवर चंपुताई जगतात. इतक्या वर्षानंतरही त्या इरसाल माणसाचे अस्सल रूप त्यांना ओळखू येत नाही याचे वाचकांना आश्चर्य वाटते. पण परंपरागत मूल्ये जोपासणारी त्यांची वृत्ती त्यांना असे वागण्यास बाध्य करते. वसुंधराबाई चंपुताईंच्या रूपात स्त्रीजीवनाचे एक अगतिक, निर्व्याज निष्ठेचे चित्र वाचकांसमोर उभे करतात.

अशा स्त्री जीवनाच्या विचित्र तऱ्हा, त्यांची दुःखे, त्याच्या चित्रणातून स्त्रीमनाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतात. 'पाठी येऊन छळणाऱ्या, पोटी येऊन छळणाऱ्या, नवरा होऊन छळणाऱ्या गतजन्मीच्या अनेक घेणेकऱ्यांचे कर्ज चुकवीत या स्त्रिया जगतात.

वसुंधरा पटवर्धन ज्या आदर्शांची पाठराखण करतात, ते केवळ कल्पनागम्य नाही. समाज सरोवरातील विविध प्रकृतीधर्माची पात्रे लेखिकेच्या जागत्या आत्मप्रत्ययातून अधिक वस्तुनिष्ठ, अधिक टवटवीत वाटायला लागतात. अधूनमधून प्रसंगानुरूप त्या भाष्य करतात. पात्रांच्या बारीक सारीक हालचाली टिपत असतात. 'कथेची नीटनेटकी बांधणी, विविध घटना—प्रसंगांतून टप्प्याटप्प्याने होत जाणारा कथावस्तूचा विकास हे सारे सात्त्विक सोज्वळ वातावरण मनावर बिंबविणारे आहे. वसुंधराबाईंची कथा भाव्यांच्या परंपरेतली आहे.'[2] वसुंधराबाईंच्या कथांना फॉर्म आहे, पण तंत्राचा बडेजाव नाही. उलट अनेक जुन्या—नव्यांचा त्या संयोग साधीत जातात. गतकालीन परंपरा जोपासताना अर्वाचीन स्त्रीजीवनाच्या समस्या, स्त्रियांची होणारी पारध तर कधी त्यांचे बदलते विश्व तेवढ्याच सूक्ष्मपणे व अचूकपणे त्या टिपतात.

## वसुधा पाटील :

1960 नंतरच्या नवकथा कालखंडातील काही मोजक्या स्मरणीय कथालेखिकांपैकी वसुधा पाटील या एक होत. 'जमुनाके तीर', 'वेगळी' या दोन्ही संग्रहांत काही नवीन जाणीव बाळगून त्या लिहिताना दिसतात. त्यांची निवेदन पद्धत जुनीच आहे. मध्यमवर्गीय बदलत्या स्त्री जीवनाचे अंतरंग बोलके करण्याचा प्रयत्न या कथासृष्टीत दिसतो. पुरुषाकडून स्त्रीची होणारी अवहेलना व अधिक्षेप हे जुनेच असले तरी तिची उमटणारी प्रतिक्रिया ही पारंपरिकतेहून भिन्न आहे. येथेच त्यांच्या कथेतील स्त्रीपात्रांचे वेगळेपण जाणवते.

'जमुनाके तीर' या कथासंग्रहातील याच शिर्षकाची कथा अर्थपूर्ण अनुभूतीचा आविष्कार करून जाते. गिरीजा या धंदेवाईक स्त्रीच्या सहवासात आलेला पुरुषोत्तम हा पौरुष गमावलेला असतो. त्याला समजून घेणारी कुणीतरी स्त्री हवी असते. गिरीजेच्या रूपात ती त्याला सापडते आणि इतके वर्षाचे नसलेले पौरुष त्याला गिरीजेच्या मिठीत क्षणात प्राप्त होते. यातून एक काव्यात्म नीतीनिरपेक्ष रूपबंध साकारतो.

त्यांची स्त्रीपात्र विलक्षण, करारी, निग्रही, तरीही फसलेली, फसवली गेलेली आहेत. एकीकडे तोल सावरण्याचा आब राखताना दुसरीकडे ती ढासळलेली असतात. डोळ्यांत एक विलक्षण तेज असलेली, सदैव अभ्यासू, नेमस्त जीवन जगून नोकरी करणारी 'मनू' या कथेतील मनू स्वतंत्र विचारांची असते. ज्याच्याशी लग्न करायचे त्याला पूर्णपणे पारखण्यासाठी त्याच्यासोबत सहा महिने एकत्र राहते. आणि एक दिवस विश्वाचा वेध घ्यायला निघालेली मनू लग्न न करताच गरोदर होऊन परत येते. परदेशातील 'लिव्ह इन रिलेशनशिप' हा प्रकार भारतातही रूजणार की काय? असा प्रश्न ही कथा वाचताना वाचकांना पडतो.

'स्त्री' या कथेत इंदिरेने आपल्या थोरल्या विधवा बहिणीची वासनेने अनावर झालेली अवस्था पाहून तिच्या शारिरिक वासना शमविण्याची आपल्याच नवऱ्याला केलेली विनंती यात धाष्ट्र्य व विलक्षणता आहे. 'मानिनी' या कथेतली निर्मला घटस्फोटाने नवऱ्यापासून दूरावलेली आहे. तिला जगण्याचा एकमेव आधार म्हणजे लहानगा दिलिप. पण त्याच्या मृत्यूनंतर ती एकाकी होते. एक भकास पोकळी तिच्या जीवनात निर्माण होते. त्याचवेळी आपल्या गतजीवनातील पती असलेल्या विभाकरला पत्र पाठवून ती पुत्रप्राप्तीची आशा करते. तिला संसार थाटायचा नाही. पण केवळ जीवनाला एक दिशा मिळावी, या उद्देशाने ती नवऱ्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करते. 'वेगळी या कथासंग्रहात मध्यमवर्गीय जीवनाचे असेच पडसाद उमटले आहेत. पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रीजगतावर लादलेले अवमानित जीवन हे केवळ अपघात म्हणून त्यांच्या वाट्याला आलेले नसून बुद्ध्याच लादले आहे. स्त्रिया या स्वभावजन्य व परिस्थितीजन्य म्हणून ते सोशीत आहेत.

वसुधाताईंच्या कथा स्त्रीजीवनाचे दुःख प्रभावीपणे मांडत असल्या तरी त्यांच्या कथांमध्ये, त्यातील वर्णनांमध्ये तोचतोचपणा जाणवतो. कोणत्याही गोष्टीचे अती वर्णन केल्यामुळे कथेतील घाट हरवून जातो. स्त्री जीवनातील निहित विसंवाद, उद्ध्वस्तता व विविध ताण तणाव समन्वित करताना त्यांना वाहक रूप प्राप्त होत नाही. कधी स्त्रीजीवनाच्या वैयर्थ्याचे दोषारोपण दैवावर केले जाऊन विविध समस्यांचे मूळ न शोधता बौद्धिक चिकित्सेला फाटा देऊन सुटसुटीत आटोपशीरपणा अवलंबिला जातो. एकुणच वसुधा पाटील यांचे कथाविश्व गुणवत्तेच्या बाबतीत मर्यादित आहे.

## सरिता पदकी :

सरिता पदकी यांची कथा आटोपशीर आणि चिमुकल्या आकाराची आहे. जे सांगायचे आहे, ते थोडक्यात सुटसुटीतपणे मांडलेले आहे. इतर स्त्री लेखिकांप्रमाणेच या कथा स्त्रीजीवनावर आधारित अशा संसारकथा आहेत. स्त्रीजीवनातील विविध दुःखे, पुरुषांची हावरट वृत्ती, कधी आंधळा तर कधी डोळस स्वार्थ, स्त्रीने आपल्या अंकित राहावे हा पारंपरिक पुरुषी अहंकार यांतून स्त्रीच्या विस्कळीत भावना व परिस्थितीजन्य नवविचारांची पायमल्ली यांचे बहुविधतेने रेखीव चित्रण 'बारा रामाचे देउळ' या संग्रहातील कथांत दिसून येते. 'स्त्रीच्या दुःखाच्या विविध परी दर्शवित असताना सरिताबाई दुःख स्वीकाराची भूमिका घेतात.'[3] 'अर्धा दिवस सुट्टी' या कथेत सुशीला या नर्सचे, एका कुमारिकेचे दुःख चित्रित केलेले आहे. तिच्या लग्नासाठी वरस्थळ शोधण्यात सततची पायनीट करून थकलेले वडील, जिव्हारी झोंबणाऱ्या वहिनीच्या कटू शब्दांनी व्यथित अंतःकरणाने तिचे आपल्या बालमैत्रिणीकडे जाणे, पण बदलत्या स्थलकालावरून मैत्रिणीच्या स्वभावात झालेले स्थित्यंतर, शेवटी दोन मैत्रिणींनी इतक्या वर्षात एकमेकींना खरे ओळखलेलेच नसणे, असे अनेकविध ताण मनाला स्पर्शून जातात. प्रत्येकजण शेवटी एक दुसऱ्याला किती फसवत असतो. ही अंतर्मुख करणारी जाण येथे अव्याहत आहे. लेखिकेने अत्यंत साध्या व सोप्या शब्दांत हे मनोगत सूचित केलेले आहे. मैत्रिणीपासून दूर गेल्यानंतर तिला सभ्यपणाचा बुरखा धारिलेल्या पण अंतर्यामी वासनांनी बरबटलेला एक पुरुष भेटतो. वरून सभ्य, सुशील भासणाऱ्या पण त्याच्या अंतरंगात निघृणता, रितेपणा, वखवखलेल्या वासनांचा आगडोंब खदखदत असतो. खरेच शेवटी माणसे कशी ओळखावी, हा एक प्रखर प्रश्न निर्माण होतो. सरिता पदकी यांनी अत्यंत अलिप्ततेने याचे चित्रण केलेले आहे. स्त्रीत्वाविषयी त्यांना सहानुभूती असली तरी तीत कसलाही हळवेपणा नाही. स्त्रीजगताची तरफदारी म्हणून डोकावणारा अभिनिवेश नाही. म्हणूनच ही कथा एकटया सुशीला या एकाकी कुमारिकेच्या दुःखद जीवनाची न राहता अखिल स्त्रीजीवनाच्या दुःखाची व्यापकता तिला प्राप्त होते. विविध पातळीवरील स्त्रियांच्या दुःखाचा वेध घेणाऱ्या या कथा आहेत. लग्नापूर्वी पाशवी बलात्काराने संपूर्ण जीवनच उद्वस्त झालेल्या दुर्दैवी मुलीचे दारुण दुःख (पुनर्जन्म), हव्या असलेल्या पुरुषाशी जवळीक न साधता आल्यामुळे जीवनात पसरलेले औदासिन्य, काही पुरुषांत स्वामीत्व व हेकेखोर वृत्ती व अहंकारीपणातुन उद्वस्त झालेल्या विविध मनांची चित्रणे

वाचकांना हबकून टाकणारी आहे. केवळ स्वतःचा मुलगा महत्त्व देत नाही म्हणून खंत बाळगणारे पण 'ट्रीप' मधून आल्यावर त्यांचे उदास चेहेऱ्याचे फोटो पाहून आतल्या आत स्वतःचे मोठेपण जोपासले गेल्याच्या खोटया अहंकाराने सुखावलेले आईबाप (ट्रीप), कुसुम भावे या सरळ सुस्वभावी गृहिणीच्या सुखी मनाला तिच्या मैत्रिणीचे सुख ना साहवून तिला दुःखी कसे करता येईल या विचारांत रमणारी आणि ती दुःखी झाल्यावर असुरी आनंद होणारी तिची मैत्रिण (दंश) जणू मानवी मनातील क्षुद्रतेलाच हात घालतात.

सरिता पदकी यांनी 'बारा रामाचं देऊळ' या अठरा कथा असलेल्या संग्रहात रचनातंत्रात विविधतेचा वापर केला. त्यांच्या काही कथा फारच आटोपशीर आहेत. 'रात्र', आटापिटा', या कथा संवादात्मक 'सुटका' ही स्वगतपर, 'बारा रामाचं देऊळ' ही एकपात्री नाट्यछटेच्या धर्तीवर जाणारी कथा आहे. काही कथा अतिशय साध्या, सूटसुटीत शैलीने वठवलेल्या आहेत. त्यांच्या कथावस्तूतील अधोरेखित प्राप्त परिस्थितीनुरूप असहायपणे जगणारी पात्रे करुणरम्य वाटतात. जीवनातील दुःखाची ही रेखाटने मनाला स्पर्शून जातात. तर काही कथांना कसलेही विशेष, उत्कट कथानक नसते. सामान्य घटनेवर आधारित कथेची वीण केलेली असते. उदा. 'सुटका' व 'चटका' या दोन कथा. 'सुटका' ला कथानक नाही तर 'चटका' ही केवळ एक घटना आहे. त्याही आकाराने फार मोठ्या नाही. तरीही या कथा आटोपशीर आणि आकर्षक वाटतात.

सरिता पदकी यांच्या कथेतील दुःख हळुवारपणे प्रवेशते पण संपूर्ण जीवनाला व्यापून राहाते. लेखिकेच्या अलिप्ततेच्या वृत्तीतून ही दुःखे मग कोणत्याही एखाददुसऱ्या स्त्रीची दुःखे वाटत नसून संपूर्ण जीवनभर दुःखेच भोगणाऱ्या संयमी, सोशीक, अवमानित, मर्यादाशील अखिल स्त्रीमनाचे प्रातिनिधिक रूप धारण करतात. या दुःखाचे स्वरूप लयाकार, हळूवार, पण व्यापक आहे. मात्र लेखिकेच्या मनात या पात्रांविषयी अलिप्ततापूर्ण अनुकंपा असली तरी जिव्हारी झोंबणाऱ्या या दुःखाविषयीची अथांगता कथावस्तूत येत नाही.

एकुणच स्त्रियांच्या पारंपरिक कथालेखनात एकांगीपणा जाणवतो. शिवाय हे लेखन आत्मकेंद्रित, काहीसे धुसर व पुसटसे वाटते. स्त्रिया मोठ्या प्रमाणात लेखन करू लागल्यामुळे कथावाङ्मयात संख्येची भर घातली गेली पण मोलाची भर घातली असे म्हणता येणार नाही.

## निष्कर्ष :

१. नवकथेने केवळ किडलेल्या मनाची विरुपताच वाचकांसमोर ठेवली नाही तर मानवी जीवनाच्या मूलभूत अंगांना तेवढ्याच तटस्थ भक्कमपणाने चित्रित करण्याची मार्मिकता दाखविली.

२. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शिक्षणाच्या प्रचारातून सुशिक्षित स्त्रियांची पिढी निर्माण झाली.

३. स्त्रीलेखिकांनी स्त्रीजीवनातील अचूक बारकावे टपून कथा अधिक भावपूर्ण केली.

४. वसुंधराबाई पटवर्धन आपल्या कथांतून स्त्रीमनाच्या त्यागाच्या, समर्पणाच्या, प्रीतीच्या, सोशिकपणाच्या विविध छटा त्या समरसून रंगवितात.

५. सरिता पदकी यांची कथा आटोपशीर आणि चिमुकल्या आकाराची आहे.

६. स्त्रिया मोठ्या प्रमाणात लेखन करू लागल्यामुळे कथावाङ्मयात संख्येची भर घातली गेली पण मोलाची भर घातली असे म्हणता येणार नाही.

## संदर्भ :

1. कुळकर्णी, दा. वि., '**मराठी कथा स्वरूप व आस्वाद**', स्वाध्याय, पुणे, प्रथमावृत्ती, 1976, पृ. 388

2. शेवडे, डॉ. इंदुमती, '**मराठी कथा : उगम आणि विकास**', सोमैया प्रकाशन, मुबई, प्रथमावृत्ती 1973, पृ. 414

3. फडके, डॉ. भालचंद्र, '**मराठी लेखिका : चिंता आणि चिंतन**', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1980 पृ. 56

## संदर्भग्रंथ :

1. गाडगीळ गंगाधर, '**खडक आणि पाणी**', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 1960

2. हातकणंगलेकर, म.द. '**मराठी कथा :रूप आणि परिसर**', सुपर्ण प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती, 1986

3. पाटील गंगाधर, '**पु.शि. रेगे वाङ्मयदर्शन**', मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, प्रथमावृत्ती, 1969

❖❖❖

## Form IV

(See Rule 8)

**Statement about ownership and other particular about the Journal**

**मराठी प्राध्यापक संशोधन पत्रिका (MPSP)**

| | | |
|---|---|---|
| 1. Place of Publication | - | **Dr. Bhau Mandavkar Research Centre,** Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 2. Periodicity | - | **Annual (January)** |
| 3. Printer's Name | - | **Seva Prakashan**, Vijay Colony, Amravati 444606 (M.S.) |
| 4. Publisher's Name | - | **Dr. Mrs. Veera Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal 445401 |
| 5. Editor's Name | - | **Dr. Pavan Mandavkar** |
| Nationality | - | **Indian** |
| Address | - | Principal, Indira Mahavidyalaya, Kalamb, Dist. Yavatmal |

**We, Dr. Pavan Mandavkar & Dr. Mrs. Veera Mandavkar hereby declare that the particulars given above are true to the best of our knowledge and belief.**


Dr. Y.M. Donde Sarwajanik Shaikshanik Trust's (1974)

**INDIRA MAHAVIDYALAYA**

KALAMB, DIST. YAVATMAL, MAHARASHTRA 445401





☎ 07201-226147, 226129 (Fax)

Web.: www.indiramahavidylaya.com

www.researchjournal.net.in

e mail: imvkalamb@yahoo.co.in

indiram414@sgbau.ac.in

For RJI: researchjournalofindia@gmail.com

For MPSP: marathipradhyapak@gmail.com

Permanently Affiliated to SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY, AMRAVATI

RECOGNIZED BY UGC UNDER 2 F & 12 B

NAAC RE-ACCREDITED WITH 'B+' GRADE

Multi-Faculty College Estd. in 1983


| | | | |
|---|---|---|---|
| **Annual Subscription** | - | **Individual / Institutional** | **₹ 500/-** |
| **Account Details : Bank** | - | **Bank of Maharashtra** | |
| **Branch** | - | **Azad Maidan Road, Yavatmal** | |
| **IFSC code** | - | **MAHB0000047** | |
| **MICR coe** | - | **445014001** | |
| **A/c No.** | - | **60175373000** | |
| **A/C Name** | - | **Director, Dr. Bhau Mandavkar Research Centre** | |


**(All rights are reserved with the Publisher & Editorial Board. The opinion expressed are of the authors & the association advisory board, editorial board as well as the peer committee does not hold any responsibility for any of the views expressed. Judiciary matter in Kalamb Court only.)**



p-ISSN 2454-7409

9 772454 740009

e-ISSN 2582-5305

9 772582 530008